# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक 22.03.2011 रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

मंगळवार दिनांक 22-3-2011 रोजी मा.सभापती श्री.राजू रामराव शिंदे यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील मलीक अंबर स्थायी समिती सभागृह येथे सकाळी 11-50 वाजता वंदेमातरम् या गिताने सुरू झाली सभेला मा..आयुक्त श्री.पुरूषोत्तम भापकर भा.प्र.से. तसेच नगरसचिव श्री.एम.ए.पठाण यांचेसह संबधीत अधिकारी तसेच खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

01. स. श्री.सुर्यकांत सुभानराव जायभाये
02. स. श्री.विजय लक्ष्मणराव वाघचौरे
03. स. श्री.जगदीश कन्हैय्यालाल सिध्द
04. स. श्री.आगा खान मिया खान
05. स. श्री.विकास रतनलाल जैन
06. स. श्री.रेणुकादास (राजू) दत्तोपंत वैद्य
07. स. श्री.महेश शिवाजीराव माळवतकर
08. स. सौ.साधना गणेश सुरडकर
09. स. श्री.अमित सुधाकर भुईगळ
10. स. श्री.नासेरखॉन अब्दुल रहेमानखान
11. स. श्री.अब्दुल साजेद अ.सत्तार
12. स. श्री.मधुकर दामोधर सांवत
13. स. श्री.जुबेर गाझी असीर अहमद

**विषय क्र. 213 :** (दि. 14/03/2011 रोजीच्या सभेतील स्थगित करण्यात आलेला विषय क्र. 163)

मा. आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद शहर हे ऐतिहासिक आणि पर्यटन दृष्टया महत्वाचे शहर असून हे शहर मराठवाड्याची राजधानी आहे. या शहरात औद्योगिक प्रकल्प मोठया प्रमाणात आहेत त्याच प्रमाणे मोठमोठे औद्योगिक प्रकल्प या शहरात येत आहेत. अनेक शैक्षणिक संस्था आणि सांस्कृतिक उपक्रमांमुळे या शहराचे महत्व दिवसेंदिवस वाढत चालले आहे. शैक्षणिक, औद्योगीक, सांस्कृतिक, वैद्यकीय सेवा सुविधा आणि पर्यटन स्थळांमुळे या शहराची झपाट्याने वाढ होत चालली असून आजुबाजूचे जिल्हे/परिसरातुन मोठ्या प्रमाणात लोक या शहरात स्थलांतरीत होत आहेत परिणामी नवनविन वसाहती उदयास येत आहेत.

सबब या शहरासाठी सध्या अस्तित्वात असलेली पाणी पुरवठा योजना ही अत्यंत कमी पडत असून नागरिकांना पुरेशा प्रमाणात महानगरपालिका पाणी पुरवठा करु शकत नाही. तसेच सध्या नव्याने विकसित झालेल्या वसाहती आणि पुढील किमान ३० वर्षात (वर्ष २०४१ पर्यंत) अस्तित्वात येणाऱ्या नविन वसाहती यांचेकरीता या शहरासाठी नविन वाढीव पाणी पुरवठा योजनेचे नियोजन करणे क्रमप्राप्त ठरते. त्यामुळे या शहराचा दर्जा उंचावण्यासाठी औरंगाबाद शहराची पाणी पुरवठा व्यवस्था सुधारण्याचे नियोजन प्राधान्याने हाती घेतले आहे. सध्या शहराचे दरडोई पाणी परिमाण प्रति व्यक्ती प्रति दिन ८० ते १०० लि. असे आहे. Central Public Health & Environmental Engineering Organization (CPHEEO) मानकानुसार हे प्रमाण १३५ लि.प्रति व्यक्ती प्रति

दिन असणे आवश्यक आहे. औरंगाबाद पाणी पुरवठा योजने अंतर्गत १०.०० द.ल.ली. प्रति दिन क्षमतेची (हर्सूल) पाणी पुरवठा योजना, ५६.०० द.ल.ली. प्रति दिन क्षमतेची (जायकवाडी) जुनी पाणी पुरवठा योजना व १०० द.ल.ली. प्रति दिन क्षमतेची (जायकवाडी) नविन पाणी पुरवठा योजना या तिन योजना अनुक्रमे सन १९५४, सन १९७५-७६ व सन १९९२ साली राबविण्यात आलेल्या आहेत.

जायकवाडी जलाशयातुन पाणी उपसा होत असलेल्या दोन्ही योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळाने ०१ एप्रिल १९९८ रोजी महानगरपालिकेकडे हस्तांतरीत केलेल्या आहेत. त्यामुळे १९९८ पासून या योजनांची देखभाल-दुरुस्ती व संचलनाचे काम महानगरपालिकेतर्फे करण्यात येत आहे. या दोन्हीही योजनांद्वारे प्राप्त होणारे एकूण निव्वळ पाणी परिमाण १२२ ते १२४ द.ल.ली. प्रति दिन इतके आहे. शहराची आजची लोकसंख्या अंदाजे ११.५० लक्ष असून, रस्त्यातील ग्राहक व वितरण व्यय वजा जाता शहरास निव्वळ पाणी परिमाण १८० द.ल.ली. प्रति दिन प्राप्त होणे गरजेचे आहे. तोकडे पाणी परिमाण व वितरण व्यवस्थेमधील त्रुटी यांमुळे सन २००१ पासुन शहरास एक दिवसाआड पाणी पुरवठा करावा लागत आहे. सबब उपरोक्त कारणांमुळे महानगरपालिकेने समांतर पाणी पुरवठा योजनेचे नियोजन हाती घेतलेले आहे.

## समांतर पाणी पुरवठा योजना

औरंगाबाद महानगरपालिकेने शहराच्या वाढीव पाणीपुरवठ्यासाठी सन २००५-०६ मध्ये समांतर जलवाहिनी योजनेचे नियोजन व संकल्पन केले. केंद्र शासनाच्या Urban Infrastructure Development Scheme for Small & Medium Towns (UIDSSMT) या योजनेतुन अनुदान मिळण्यासाठी महानगरपालिकेने रुपये ३५९.६७ कोटीचा प्रस्ताव सन २००६ मध्ये शासनास सादर केला होता. मा. संचालक, नगर परिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांनी दिनांक २०.०६.२००९ रोजी पत्र देऊन केंद्रशासन पुरस्कृत UIDSSMT योजने अंतर्गत औरंगाबाद शहर समांतर पाणीपुरवठा योजनेच्या प्रस्तावाला मंजुरी प्राप्त झाल्याचे महानगरपालिकेस कळविले. महानगरपालिकेने समांतर पाणीपुरवठा योजनेचा रुपये ३५९.६७ कोटीचा प्रस्ताव UIDSSMT योजने अंतर्गत शासनाकडे सादर केला तेव्हा प्रकल्पाची एकुण किंमत काढण्यासाठी सन २००५-०६ ची तत्कालीन दरसुची वापरण्यात आली होती. या प्रस्तावास / योजनेस मंजुरी मिळणे करीता सन २००६ पासुन ते वर्ष २००९ साधारणत: ३ वर्षांचा कालावधी लागला.

योजनेच्या सविस्तर प्रकल्प अहवालाचे मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, पुणे यांनी तांत्रिक मुल्यांकन केले असून प्रकल्पाची सन २००८-०९ दरसुचीनुसार एकुण किंमत अंदाजे रक्कम रुपये ५११.३१ कोटी इतकी येते. सदरची कार्यवाही प्रकल्पाच्या वाढीव रकमेच्या ५०% रक्कम राज्य शासनाकडुन पुरक अनुदान मिळण्यासाठी करण्यात आली.

मंजुर झालेल्या मुळ रक्कम रुपये ३५९.६७ कोटीच्या प्रस्तावामध्ये शहरातील भागश: वितरण व्यवस्थे करीता ढोबळ मानाने तरतुद ठेवण्यात आली होती. तथापि आज रोजी संपुर्ण पाणी पुरवठा योजनेचे काम Public Private Partnership (PPP) तत्वावर करण्यात येत असल्याने व पुढील २० वर्षे योजनेचे संचलन व देखभाल दुरुस्ती (Operation & Maintenance) हे विकासक (Concessionaire) करणार असल्याने मंजुर प्रस्तावानुसार शहरातील भागश: वितरण व्यवस्थेच्या कामांऐवजी संपुर्ण वितरण व्यवथेची कामे करणे आवश्यक असल्याने त्यानुसार PPP Model अंतर्गत वितरण व्यवस्थेची कामे प्रस्तावीत करण्यात आली आहेत.

## योजनेचा आर्थिक आकृतीबंध

| | | |
|---|---|---|
| **UIDSSMT योजने अंतर्गत मंजुर योजना** | | |
| — केंद्र शासन अनुदान (८०%) | :- | रु. २८७.७४ कोटी |
| — राज्य शासन अनुदान (१०%) | :- | रु. ३५.९७ कोटी |
| — महानगरपालिकेचा सहभाग (१०%) | :- | रु. ३५.९७ कोटी |
| | | **एकुण रु. ३५९.६७ कोटी** |

| अ.क्र. | अंतर्भुत कामे | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| अ | **जलवहन व्यवस्था (Transmission System)** | |
| १ | सर्वेक्षण व उद्भव | रु. ५६९.५७ लक्ष |
| २ | अशुद्ध जल पंपींग मशिनरी | रु. ५८५.५२ लक्ष |
| ३ | अशुद्ध जल उद्धरण वाहिनी (लांबी -२७ किमी.) (पोलादी २२०० मि.मी. व्यास, १४ मि.मी. जाडी) | रु. १४६५७.३१ लक्ष |
| ४ | जलशुध्दीकरण केंद्र (टप्पा -१, क्षमता १९० द.ल.ली.) | रु. ११६७.१० लक्ष |
| ५ | शुद्ध जल पंपींग मशिनरी | रु. ७४१.३१ लक्ष |
| ६ | शुद्ध जल उद्धरण वाहिनी (लांबी -१२.१२ किमी.) (पोलादी २२०० मि.मी. व्यास, १८ मि.मी. जाडी) | रु. ७६१०.४९ लक्ष |
| ७ | संतुलीत जलकुंभ | --- |
| ८ | कर्मचारी निवासस्थाने व इतर | --- |
| | **एकुण अ** | **रु. २५३३१.३० लक्ष** |
| | | **रु. २५३.३१ कोटी** |
| ब | **वितरण व्यवस्था** | |
| ९ | शुध्द जल गुरुत्व वाहिनी व वितरण प्रणाली | |
| | (i) शुध्द जल गुरुत्व वाहिनी | रु. ३०५८.१८ लक्ष |
| | (ii) वितरण प्रणाली, लांबी ४५५ कि.मी. | रु.७५८४.१० लक्ष |
| | **एकुण ब** | **रु. १०६३६.१८ लक्ष** |
| | | **रु. १०६.३६ कोटी** |
| | **एकुण अ+ब** | **रु. ३५९.६७ कोटी** |

| | | |
|---|---|---|
| | **PPP अंतर्गत प्रस्तावीत योजना** | |
| अ.क्र. | अंतर्भुत कामे | अंदाजपत्रकीय रक्कम |
| अ | **जलवहन व्यवस्था (Transmission System)** | |
| १ | सर्वेक्षण व उद्भव | रु. ९०८.९१ लक्ष |
| २ | अशुद्ध जल पंपींग मशिनरी | रु. ८६८.५६ लक्ष |
| ३ | अशुद्ध जल उद्धरण वाहिनी (लांबी - २७ किमी.) (पोलादी २००० मि.मी. व्यास, १६ मि.मी. जाडी) | रु. १९३६४.४० लक्ष |

| | | |
|---|---|---|
| ४ | जलशुध्दीकरण केंद्र<br>(टप्पा -१, क्षमता १९२ द.ल.ली.) | रु. १४६१.१४ लक्ष |
| ५ | शुद्ध जल पंपींग मशिनरी | रु. १२५०.२२ लक्ष |
| ६ | शुद्ध जल उद्धरण वाहिनी (लांबी - १२.१६ किमी.)<br>(पोलादी २००० मि.मी. व्यास, २० मि.मी. जाडी) | रु. १०३३८.०५ लक्ष |
| ७ | संतुलीत जलकुंभ (क्षमता १० द.ल.ली.) | रु. २७९.२८ लक्ष |
| ८ | कर्मचारी निवासस्थाने व इतर | रु. १५१.४१ लक्ष |
| | **एकुण अ** | **रु. ३४६२१.९६ लक्ष** |
| | | **रु. ३४६.२२ कोटी** |
| **ब** | **वितरण व्यवस्था** | |
| | मुख्य जलवाहिन्या<br>(Trunk & Feeder Mains) | **रु. ६९.१७ कोटी** |
| **क** | **वितरण व्यवस्था लांबी १२८९ कि.मी. + ११ जलकुंभ** | **रु. ३२०.१८ कोटी** |
| **ड** | **जलमापक यंत्र बसविणे** | **रु. ५६.६३ कोटी** |
| | **एकुण अ+ब+क+ड** | **रु. ७९२.२० कोटी** |

| | | |
|---|---|---|
| • महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने दरसुची सन २००८-०९ नुसार केलेल्या तांत्रिक मुल्यांकनानुसार प्रकल्पाची येणारी किंमत. | :- | रु.५११.३१ कोटी |
| • पी.पी.पी. तत्वावर योजना राबविण्यासाठी लागणारा वाढीव खर्च (रु. ७९२.२० कोटी - रु.३५९.६७ कोटी) | :- | रु.४३२.५३ कोटी |
| • वरील योजनेतील एकुण अपेक्षित केंद्र शासन अनुदान. | :- | रु.२८७.७४ कोटी |
| • वरील योजनेतील एकुण अपेक्षित राज्य शासन अनुदान. | :- | |
| ➢ मुळ मंजुर योजनेनुसार (१०%) | | रु.३५.९७ कोटी |
| ➢ दिनांक ३१.०८.२००९ चा शासन निर्णय क्र. एनयुआर-२००९/ प्र.क्र.१२७/०९ नवि-३३ नुसार प्रकल्पाच्या वाढीव किंमतीच्या ५०% राज्य शासनाचे पुरक अनुदान (अपेक्षित)<br>(रु.५११.३१ कोटी -रु.३५९.६७ कोटी)<br>२ | :- | रु.७५.८२ कोटी |
| **एकुण शासन अनुदान रु.३९९.५३ कोटी** | | |
| • उपरोक्त एकुण रु. ३९९.५३ कोटी शासन अनुदानापैकी केंद्र शासनाकडुन अपेक्षीत रु. २८७.७४ कोटी पैकी ५०% म्हणजेच रु. १४३.८६ कोटी चा पहिला हप्ता प्राप्त झाला आहे. | | |
| • वरील पी.पी.पी. योजनेतील महानगरपालिकेचा एकुण सहभाग { (रु. ४३२.५३ कोटी - रु. ७५.८२ कोटी)+रु. ३५.९७ कोटी} {महानगरपालिकेचा हिस्सा रक्कम रु. ३९२.६८ कोटी हा PPP Operator या योजनेत टाकणार आहे.} | :- | रु.३९२.६८ कोटी |

वरील प्रमाणे नमुद आर्थिक आकडेवारी व औरंगाबाद महानगरपालिकेची सद्य आर्थिक स्थिती पाहता UIDSSMT योजनेअंतर्गत मंजुर रुपये ३५९.६७ कोटीचा निधी संपुर्णपणे PPP Model ला जोडुन जायकवाडी पासुन औरंगाबाद शहरापर्यंत पाणी पुरवठा योजनेच्या उपांगांची कामे व संपुर्ण वितरण व्यवस्थेचे काम एकाच विकासकाकडुन PPP तत्वावर करुन घेण्याबाबत व योजना स्वयंपुर्ण होण्यासाठी आवश्यकतेनुसार पाणीपट्टीमध्ये दरवाढ करणे तसेच योजना PPP तत्वावर राबविणे बाबत दिनांक ३०.०७.२००९ रोजी मा.सचिव-२, नगर विकास यांचे दालनात मा. महापौर, मा. आयुक्त आणि इतर पदाधिकारी यांच्या बैठकीत चर्चा होऊन निर्णय झाला. त्यानुसार शहराची पाणी पुरवठा योजना PPP तत्वावर राबविणे व सदर वाढीव पाणी पुरवठा योजना कार्यान्वीत झाल्यानंतर पाणी पट्टीमध्ये दरवाढ करण्याबाबतच्या प्रस्तावास ठराव क्र.५५४ अन्वये दिनांक १८.०८.२००९ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेने सर्वानुमते मान्यता दिलेली आहे.

पाणी पुरवठा योजना PPP तत्वावर राबविणे अंतर्गत निविदा कार्यवाही करण्यासाठी वित्त मंत्रालय, Department of Economical Affairs (DEA) तर्फे भारत सरकार यांच्या India Infrastructure Project Development Fund (IIPDF) योजने अंतर्गत एशियन डेव्हलपमेंट बँक (ADB) यांच्या सहकार्याने क्रिसील रिस्क ॲण्ड इन्फ्रास्ट्रक्चर सोल्युशन लि. (Crisil) मुंबई यांची नेमणुक Transaction Adviser म्हणून करण्यात आलेली आहे. त्यानुसार Crisil च्या साह्याने व मार्गदर्शनानुसार PPP तत्वावर योजना राबविण्यासाठी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार निविदा कार्यवाही दोन टप्प्यात राबविण्यात येत आहे.

**<u>Stage - 1 Request for Qualification (RFQ)</u>**

Request for Qualification (RFQ) ची निविदा सुचना दिनांक २०.०८.२००९ रोजी देशपातळीवरील वृत्तपत्रांतुन प्रसिध्द करण्यात आली. दिनांक ०२.१२.२००९ रोजी सदर निविदा उघडण्यात आल्या असता एकुण ११ निविदा प्राप्त झाल्या. त्यापैकी दोन निविदाधारक (१) **IVRCL-KIPL - SMC-CHETAS Consortium** आणि (२) **Ashoka Buildcon Limited** हे अपात्र ठरले. तसेच उर्वरित ९ निविदाधारक पात्र ठरले. पात्र निविदाधारकांची यादी खालीलप्रमाणे

1. **Veolia Water (India) Pvt. Ltd.**
2. **United Phosphorus Limited (UPL)** Pratibha Industries
   Salcon Engineering Berhad
3. **Subhash Project Marketing Limited, (SPML)**
   National water and sewerage Corporation (NWSC)
   Va tech Wabog Ltd.
4. **Mahindra Lifespace Developers Ltd. (MLDL)**
   Suez Environmetn.
5. **IL&FS Water Ltd.**
   M/s Puncak Niaga Holdings Berhad (PNHB)
6. **EA Infrastructure Operations Pvt. Ltd. (CASCALNV)**
   Nagarjuna Construction Compny Ltd. (NCC)
7. **Ranhill Utilities – Lead Member**
   JUSCO – Consortium Member
8. **Jindal Water Infrastructure Ltd.**
   Hindustan Construction Company (HCC)
   Manila water company
9. **JMC Projects India Ltd.**
   Metito Berlinwasser Ltd.
   SREI Infrastructure Finance Ltd.

## Stage – 2 Request for Proposal (RFP)

या अतंर्गत Crisil Risk And Infrastructure Solution Ltd. संस्थेने Concession Agreement चे Draft Term Sheet (Concession Agreement मधील अटी व शर्ती चे विवरण) महानगरपालिकेकडे दिनांक ०८.१२.२००९ रोजी सादर केले. या प्रकरणी दिनांक २१.१२.२००९ (दिनांक ०८.१२.२००९ ची तहकुब सभा) रोजी संपन्न झालेल्या सर्व साधारण सभेने ठराव क्र.७७५ अन्वये Concession Agreement च्या Draft Term Sheet ला तसेच Request for Proposal (RFP) Document ला मान्यता दिलेली आहे. त्यानुसार मंजूर Draft Concession Agreement तसेच RFP document नुसार निविदा कार्यवाही सुरु करण्यात आली.

टप्पा -२ Request for Proposal (RFP) ची निविदा कार्यवाही प्रगती पथावर असून दिनांक ३०.११.२०१० रोजी निविदा दाखल करण्याच्या अंतिम वेळे पर्यंत पात्र ९ निविदाधारकांपैकी खालीलप्रमाणे दोन निविदा औरंगाबाद महानगरपालिकेस प्राप्त झाल्या.

1. **Subhash Project Marketing Limited (SPML)**
   National water and sewerage Corporation (NWSC)
   Va tech Wabag Ltd.
2. **IL&FS Water Ltd.**
   M/s Puncak Niaga Holdings Berhad (PNHB)

दिनांक ०१.१२.२०१० रोजी RFP निविदे च्या Technical Bid उघडण्यात आल्या. दरम्यान दोन्ही निविदांच्या तांत्रिक Bid ची तपासणी केल्यानंतर संबंधीत निविदाधारकांनी त्यांच्या Approach, Methodology & Business Plan संदर्भाने दिनांक १४.१२.२०१० रोजी दुपारी ३.०० वाजता महानगरपालिके अंतर्गत गठीत पी.पी.पी. सेल समोर सविस्तर सादरीकरण केले आणि त्याच दिवशी सर्व पी.पी.पी. सेलच्या सदस्यांसमक्ष व संबंधीत Bidders च्या प्रतिनिधींसमक्ष Financial Bid उघडण्यात आले. त्यात दोन्ही निविदाधारकांनी Annual Operational Support Grant (AOSG) मागीतलेली असून त्याचा तपशील खालीलप्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | **Subhash Project Marketing Limited (SPML)**<br>National water and sewerage Corporation (NWSC)<br>Va tech Wabag Ltd. | :- | पहिल्या वर्षा करीता रुपये ६३ कोटी |
| 2. | **IL&FS Water Ltd.**<br>M/s Puncak Niaga Holdings Berhad (PNHB) | :- | पहिल्या वर्षा करीता रुपये ११२.९० कोटी |

**Subhash Project Marketing Limited (SPML)** यांनी Annual Operational Support Grant (AOSG) म्हणुन प्रथम वर्षा करीता रुपये ६३ कोटी एवढी रक्कम मागितलेली आहे. या AOSG च्या रकमेची **IL&FS Water Ltd.** ने मागीतलेल्या AOSG च्या रुपये ११२.९० कोटी या रकमेशी तुलना करता SPML यांनी मागीतलेली AOSG ची रक्कम रुपये ४९.९० कोटी इतकी कमी आहे. तसेच **IL&FS Water Ltd.** यांनी सादर केलेल्या Financial Bid मध्ये अटी व शर्ती नमुद असल्याने त्यांची निविदा Non Responsive Bid ठरते.

## योजनेच्या ठळक बाबी :

१. **योजनेचा कालावधी:-**

- **Concession period - 20 Years**
  (From Appointed Date)
- **Preparatory Period - 6 Months**

(From Execution of Concession Agreement to Appointed Date)

- **Construction & Rehabilitation Period - 3 years**
  (Appointed Date to Commercial Operation Date )
- **Operation & Maintenance Period - 17 years**
  (Commercial Operation Date to last day of the concession period )

२. निविदेच्या अटी व शर्तीनुसार Collection Account, Water Payment Account, Water Payment Reserve Account तसेच Independent Engineer आणि Independent Auditor यांच्या वार्षीक देयकांची रक्कम जमा करण्यासाठी वेगवेगळी स्वतंत्र बँक खाती Appointed date च्या वेळी महानगरपालिकेला उघडावी लागणार आहेत.

- **<u>Collection Account:-</u>** या स्वतंत्र खात्यात विकासकाने ग्राहकांकडून जमा केलेली पाणीपट्टीची रक्कम (User Charges) भरणा केली जाईल. या भरणा केलेल्या रकमेतुन योजनेचे विद्युत देयक, पाटबंधारे खात्याला द्यावयाचे पाणी खरेदीचे देयक व प्रतिनियुक्ती वर असलेल्या महानगरपालिका कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते इ. रक्कम प्रत्येक महिन्याला कपात केली जाईल व उर्वरीत रक्कम विकासकाला देण्यासाठी Water Payment Account मध्ये दरमहा Transfer केली जाईल.
- **<u>Water Payment Account:-</u>** या खात्यामध्ये विकासकाला महानगरपालिकेने द्यावयाची AOSG ची रक्कम प्रत्येक तिन महीन्याला (Quarterly) जमा करावयाची आहे. निविदा अटी व शर्तीनुसार 75% Fixed Payment तिमाहीच्या (Quarter च्या) सुरुवातीला व 25% Variable Payment तिमाहीच्या शेवटी विकासकाला द्यावयाचे आहे. विकासकाला द्यावयाचे २५% Variable Payment हे विकासक देणार असलेल्या सेवा व सुविधांचा स्तर (Service Level Parameters) विचारात घेऊन द्यावयाचे आहे. Service Level Requirment आणि त्यानुसार विकासकास द्यावयाचे २५% Variable Payment याची कार्यपद्धती (Mechanism) सोबतच्या परीशिष्ट "अ" मध्ये दर्शविलेली आहे.
- **<u>Water Payment Reserve Account:-</u>** निविदा अटी व शर्तीनुसार विकासकास, महानगरपालिकेकडुन Payment Security मिळावी या करीता हे बँक खाते महानगरपालिकेस उघडावे लागणार आहे. या खात्यामध्ये (1.5 x AOSG) एवढी रक्कम नेहमी करीता Deposit ठेवणे महानगरपालिकेस बंधनकारक राहणार आहे.
- **<u>Independent Engineer and Independent Auditor यांच्या वार्षीक देयकांची रक्कम जमा करणेसाठी स्वतंत्र बँक खाते</u>** :- निविदा अटी व शर्तीनुसार Independent Engineer करीता बांधकाम कालावधी मध्ये 2.35% of Project Cost + Service Tax आणि संचलन /देखभाल दुरुस्ती कालावधीमध्ये 0.25% of Project Cost + Service Tax तसेच Independent Auditor करीता संपुर्ण Concession Period मध्ये 0.10% of Project Cost + Service Tax याप्रमाणे वार्षिक देयके द्यावी लागणार आहेत. या देय रकमांच्या ५०% रक्कम महानगरपालिकेने व उर्वरीत ५०% रक्कम विकासकाने Independent Engineer आणि Independent Auditor यांना द्यावयाची असून प्रत्येक वर्षाच्या सुरुवातीला सदर रक्कम महानगरपालिका आणि विकासक यांनी स्वतंत्र संयुक्त बँक खात्यामध्ये

जमा करावयाची आहे. महानगरपालिकेने यापूर्वीच मा.सर्वसाधारण सभा दिनांक २०.०८.२००८ मधील ठराव क्रमांक २६६ आणि मा.स्थायी समिती बैठक दिनांक ०४.०७.२००९ मधील ठराव क्रमांक ३० नुसार मे.युनिटी कन्सलटंट, पुणे यांची नेमणुक प्रकल्पाचे सल्लागार म्हणुन केलेली आहे. मे.युनिटी कन्सलटंट हेच पहिली तीन वर्षे प्रकल्पाचे Independent Engineer म्हणुन काम पाहणार आहेत. त्याच प्रमाणे विकासकाशी Concession Agreement झाल्यानंतर Appointed Date पूर्वी Independent Auditor ची नेमणुक करण्यात येईल.

३. **<u>Project Milestones and Project Grant:-</u>** योजनेची अंदाजपत्रकीय किंमत रु.७९२.२० कोटी एवढी असून त्यापैकी Project Grant म्हणून एकुण शासन अनुदान रु.३९९.५३ कोटी विकासकास तीन वर्षाच्या बांधकाम कालावधीत 12 Quarterly Milestones मध्ये द्यायचे आहेत. विकासकाला Equity (स्वत:च्या सहभागाची रक्कम) and Debt (कर्ज) च्या स्वरुपात रुपये ३९२.६८ कोटी रक्कम प्रकल्प उभारणीसाठी टाकावयाची आहे. सदर रक्कम विकासक एकुण 12 Quarterly Milestones मध्ये टाकणार आहे. या 12 Milestones बद्दलची म्हणजेच प्रत्येक Mile Stone मध्ये विकासक स्वत:ची किती रक्कम टाकेल व त्यात त्यास अपेक्षीत Project Grant किती असेल याची सविस्तर माहिती विकासक Preparatory Period दरम्यान महानगरपालिकेस सादर करणार आहे. बांधकाम कालावधीमध्ये द्यावयाची Project Grant ची रक्कम Annual Operational Support Grant च्या व्यतीरिक्त असेल. Project Grant देतांना प्रत्येक वेळी या रकमेच्या ५% रक्कम Contingency Reserve म्हणुन महानगरपालिकेतर्फे कपात केली जाणार आहे. सदरची रक्कम बांधकाम कालावधी पूर्ण झाल्यानंतर (योजना कार्यान्वीत झाल्यानंतर) चार तीमाही (Quarter) मध्ये समान हप्त्यात महानगरपालिकेने विकासकास परत द्यावयाची आहे.

महानगरपालिका Appointed Date च्या वेळी विकासकाला पहिल्या माईलस्टोनची Project Grant आगाऊ (Advance) स्वरुपात देईल. विकासक त्याचा Equity and Debt चा हिस्सा त्यामध्ये टाकेल. पहिल्या माईलस्टोनचे कमीत कमी ८५% काम पुर्ण झाल्यानंतर विकासक दुसऱ्या माईलस्टोनसाठी Project Grant ची मागणी करु शकेल. पहिल्या माईलस्टोन अंतर्गत केलेले काम Independent Engineer तपासुन प्रमाणीत करेल. त्यानंतरच दुसऱ्या माईलस्टोनसाठी Project Grant देय राहील. समजा जर पहिल्या माईलस्टोनचे काम ९०% पूर्ण झाले असेल तर दुसऱ्या माईलस्टोनसाठी 90% Project Grant आगाऊ स्वरुपात देय राहील.

दुसऱ्या माईलस्टोनचे कमीत कमी ८५% काम पूर्ण झाल्यानंतर व पहिल्या माईलस्टोनचे १००% काम पूर्ण झाल्यानंतरच विकासक तिसऱ्या माईलस्टोनसाठी Project Grant ची मागणी करु शकतो. पहिल्या माईलस्टोनचे १००% काम पुर्ण झाले नसेल तर कोणत्याही परिस्थितीत तिसऱ्या माईलस्टोन करीता Project Grant देय होणार नाही. दुसऱ्या माईलस्टोनचे किमान ८५% काम पुर्ण व पहिल्या माईलस्टोनचे १००% काम पुर्ण झाले तरच तीसऱ्या माईलस्टोन करीता आधिच्या माईलस्टोनचे राहीलेले 10%+85% of Third Milstone एवढी रक्कम Project Grant म्हणुन देय राहील. या पध्दती प्रमाणे पुढील प्रत्येक माईलस्टोनसाठी Project Grant देय राहील. ही कार्यवाही कशा प्रकारे करावयाची आहे या संबंधीची तरतुद Concession Agreement मध्ये करण्यात आलेली आहे.

४. विकासकाला पहिल्या वर्षी AOSG म्हणून रुपये ६३ कोटी रक्कम दयावयाची आहे. निविदा अटी व शर्तीनुसार विकासकाने पहिल्या वर्षी मागीतलेल्या AOSG रकमेवर प्रतिवर्ष ६% Escalation प्रमाणे पुढील २० वर्ष AOSG ची रक्कम द्यावी लागणार आहे. तसेच Water Payment Reserve Account मध्ये 1.5 x AOSG i.e. 1.5 x Rs.63 कोटी = रु.94.50 कोटी एवढी रक्कम पहिल्या वर्षी Deposit करावी लागणार आहे. ही रक्कम प्रत्येक वर्षीच्या AOSG (6% Escalation) नुसार त्या त्या प्रमाणात Water Payment Reserve Account मध्ये वाढवुन भरावी लागणार आहे. या प्रमाणे रुपये ६३ कोटी + रुपये ९४.५० कोटी = रुपये १५७.५० कोटी एवढी रक्कम महानगरपालिकेला Appointed Date ला उभारावी लागणार आहे. महानगरपालिकेचे इतर स्त्रोत जसे जकात, मालमत्ता कर, नगररचना विभागाकडून प्राप्त होणारी रक्कम इत्यादी रकमेमधून ही AOSG ची आणि Water Payment Reserve Account ची रक्कम उभारावी लागेल. तसेच त्यासाठी महानगरपालिकेला दरवर्षी अर्थसंकल्पात प्राधान्याने तरतुद करावी लागणार आहे. Appointed date ते Concession period संपण्याची तारीख्र अशा एकुण २० वर्षात दरवर्षी किती AOSG द्यावी लागेल तसेच Water Payment Reserve Account मध्ये त्या-त्या वर्षी (एकुण २० वर्षांच्या कालावधीत) किती रक्कम जमा ठेवावी लागेल याचा तपशील सोबत परिशिष्ठ “ब” मध्ये दिला आहे.

५. निविदा अटी व शर्ती नुसार Concession Period -20 वर्ष आहे. या कालावधीमध्ये महानगरपालिकेच्या वतीने विकासक पाणीपट्टीची वसुली करणार आहे. दर तिन वर्षांनी २५% दराने पाणीपट्टीचे दर वाढविण्यास सर्वसाधरण सभेने ठराव क्र.-५५४ दिनांक १८.०८.२००९ अन्वये मान्यता दिली आहे. त्यानुसार पुढील २० वर्षांकरीता पाणीपट्टीचे दर अंतीम केलेले आहेत. योजना कार्यान्वीत झाल्यानंतर हे दर अंमलात येतील. या वाढीव दराने पाणीपट्टीची वसुली विकासकास महानगरपालिकेने जर करु दिली नाही तर निविदा अटी व शर्तीनुसार पाणीपट्टीच्या फरकाची रक्कम स्वत:च्या मिळकती मधुन महानगरपालिकेला विकासकासाठी उघडलेल्या Collection Account मध्ये भरावी लागेल. अग्निशमन सेवा वगळता इतर कोणत्याही कारणासाठी, कोणत्याही संस्था, व्यक्ति यांना नि:शुल्क पाणी पुरवठा करता येणार नाही. जर महानगरपालिकेच्या आदेशानुसार असा नि:शुल्क पाणी पुरवठा विकासकास करावा लागला तर अशा पाणी पुरवठ्याचे देयक प्रचलित दरानुसार महानगरपालिकेस विकासकास द्यावे लागेल.

६. Appointed Date नंतर विकासक महानगरपालिकेच्या वतीने पाणीपट्टी वसुली करणार आहे. त्यात पाणीपट्टीच्या देयकांचे संगणकीकरण आणि वसुलीची कार्यक्षम यंत्रणा उभारणेचा समावेश आहे. Appointed Date च्या आधीची थकीत पाणीपट्टीची रक्कम (Arrears) निविदा अटी व शर्तीनुसार विकासकाला Incentive देऊन विकासका मार्फत वसुली करुन घेण्यात येणार आहे. सदर Incentive देण्याबाबतची कार्यपद्धती Concession Agreement मध्ये नमुद असून, सोबत परिशिष्ठ “क” मध्ये नमुद करण्यात आली आहे.

७. विद्युत देयकामध्ये दरवर्षी १०% वाढ व पाटबंधारे खात्याला द्यावयाच्या पाणी खरेदी देयकामध्ये दरवर्षी १५% वाढ होईल असे निविदेमध्ये गृहीत धरलेले आहे. ही वाढीव रक्कम

विकासकानेच भरणे बंधनकारक आहे. जर या पेक्षा अधिक दर (१०% आणि १५% पेक्षा जास्त) वाढल्यास त्यावरील फरकाची रक्कम महानगरपालिकेला भरावी लागणार आहे.

८.

- जर शासनाकडुन मिळणारे प्रकल्पाचे अनुदान उशीरा प्राप्त झाले व Project Milestone नुसार Project Grant देण्यास महानगरपालिकेस उशीर झाला तर अशा परिस्थितीमध्ये विकासक प्रकल्पासाठी स्वत: रक्कम उभारेल व प्रकल्पाच्या कामांमध्ये खंड पडणार नाही याची दक्षता घेईल. विकासकाने उभारलेल्या अशा रकमेसाठी विकासकास १५% व्याज देणे महानगरपालिकेला बंधनकारक राहील.
- एखाद्या परिस्थितीमध्ये शासनाकडुन पुढील अनुदान मिळाले नाही तर अशी रक्कम विकासक स्वत: उभारेल. अशा रक्कमेची परतफेड करण्यासाठी महानगरपालिका विकासकाला प्रत्यक्ष रक्कम देईल किंवा पाणीपट्टीचे दर वाढवुन देईल किंवा Concession Period वाढवुन देईल. मात्र वाढीव Concession Period हा जास्तीत जास्त दहा वर्षापेक्षा अधिक असणार नाही.
- या निविदे मध्ये समाविष्ट असलेल्या कामांव्यतीरीक्त Additional Work करणे आवश्यक असेल तर महानगरपालिकेच्या मान्यतेने विकासक Change in Scope नुसार असे काम करु शकतो. अशा कामांसाठी येणारा खर्च निविदा अटी व शर्तीनुसार महानगरपालिकेने त्या त्या वर्षीच्या दरसुची नुसार / बाजार भावानुसार (ज्या बाबी दरसुची मध्ये समाविष्ट नसतील त्या बाबींसाठी) विकासकाला देणे बंधनकारक आहे.

९. क्रिसील या Transaction Adviser च्या शुल्काची रक्कम वित्त मंत्रालय, Department of Economical Affairs (DEA), भारत सरकार व एशियन डेव्हलपमेंट बँक (ADB) हे ७५%: २५% या प्रमाणात अनुक्रमे रुपये ९२,०४,०००/- आणि रुपये ३०,८१,१२०/- अशी एकुण रुपये १,२२,८५,१२०/- अदा करीत आहेत. यापैकी DEA, भारत सरकार यांच्या हिश्याची रक्कम IIPDF योजनेच्या अटी व शर्ती नुसार त्यांना परत करणे महानगरपालिकेवर बंधनकारक आहे. RFP निविदेच्या अटी व शर्तीनुसार विकासक उपरोक्त प्रमाणे रुपये ९२,०४,०००,/- एवढी रक्कम Concession Agreement च्या वेळेस DEA, वित्त मंत्रालय, भारत सरकार यांना परत करणार आहे. तसेच मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, पुणे यांनी योजनेचे तांत्रिक मुल्यांकन केलेले असून, मुल्यांकन तपासणी शुल्क रुपये ८२,४६,०००/- ही रक्कम RFP निविदेच्या अटी व शर्ती नुसार विकासक Concession Agreement च्या वेळेस महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, पुणे यांना देणार आहे. असे एकुण रक्कम रुपये १,७४,५०,०००/- Concessionaire कडुन महानगरपालिकेत प्रथम जमा करुन घेण्यात येतील व तद्नंतर त्या-त्या शासकीय यंत्रणेस परत करण्यात येतील.

१०. Concession कालावधीमध्ये नागरिकांकडुन जमा केली जाणारी पाणीपट्टीची संपूर्ण रक्कम व Annual Operational Support Grant या दोन्ही बाबी २० वर्षाच्या Concession कालावधीमध्ये विकासकास देय आहेत. विकासक बांधकाम कालावधीमध्ये शहरातील अस्तित्वातील सर्व ग्राहकांच्या नळजोडण्या Medium Density Poly Ethelene (MDPE) पाईपने बदलणार आहे आणि नविन जोडण्या देणार आहे तसेच प्रत्येक नळजोडणीला स्वतंत्र जलमापक यंत्र (Consumer Meter) बसविणार आहे. योजना

कार्यान्वीत झाल्या नंतर सदरचा खर्च विकासक ग्राहकांकडुन पुढील पाच वर्षांमध्ये समान हप्त्यात वसुल करणार आहे. याबाबतची कार्यपद्धती Concession Agreement मध्ये समाविष्ट केलेली आहे.

११. केंद्र शासनाच्या UIDSSMT योजने अंतर्गत महानगरपालिकेने शासना सोबत करारनामा केलेला असून शासनाच्या मार्गदर्शक सुचना व अटी - शर्तीनुसार महानगरपालिकेस विविध सुधारणा (Reforms) राबविणे बंधनकारक आहे. शासनाकडुन महानगरपालिकेस या प्रकल्पासाठी पुढील उर्वरित अनुदान मिळण्यासाठी या सुधारणा प्राधान्याने राबविणे महानगरपालिकेस बंधनकारक आहे. औरंगाबाद महानगरपालिकेस ज्या सुधारणा (Reforms) राबविणे बंधनकारक आहे त्याची थोडक्यात माहिती परिशिष्ट "ड" वर दर्शविण्यात आली आहे.

१२. पी.पी.पी. औरंगाबाद वाढीव पाणी पुरवठा योजने अंतर्गत राबविण्यात येत असलेल्या प्रकल्पाची अंदाजपत्रकीय रक्कम रुपये ७९२.२० कोटी एवढी आहे. मुळ DPR मध्ये वितरण व्यवस्थे करीता DI पाईपची मान्यता असल्याने पी.पी.पी. योजने अंतर्गत DI पाईप गृहीत धरुन अंदाजपत्रक केलेले आहे. सध्या आधुनीक तंत्रज्ञानाने विकसीत High Density Poly Ethelene (HDPE) पाईपचा वापर इतर शहरांमध्ये पाणी पुरवठा वितरण व्यवस्थेकरीता सुरु झालेला आहे. या पाईपच्या वापरामुळे गळत्यांचे प्रमाण लक्षणिय रित्या कमी होऊ शकते. निविदा अटी व शर्ती नुसार वितरण व्यवस्थेमध्ये DI पाईप ऐवजी Combination of HDPE + DI Pipe वापरण्यास 'केंद्र व राज्य शासनाकडुन आवश्यक ती मान्यता प्राप्त करणे, अशा बदलामुळे महानगरपालिकेस कोणताही आर्थिक भार सोसावा न लागणे, विकासकाने द्यावयाच्या सेवा सुविधांचा स्तर हा Service Level Requirment नुसार असणे आणि शासनाने अशा बदलास मान्यता न दिल्यास वितरण व्यवस्थेत फक्त DI पाईप वापरणे' अशा अटींवर विकासकास मुभा देण्यात आलेली आहे.

१३. **प्रकल्पासाठी भुसंपादन करणे.:-** जायकवाडी पासून औरंगाबाद शहरापर्यंत मुख्य जलवाहिनी टाकण्यासाठी भुसंपादन करण्याची कार्यवाही सुरु करण्यात आली आहे. या अंतर्गत एकुण ३८.५० किलोमीटर पैकी ३२.५० किलोमीटर लांबी मध्ये संयुक्त मोजणी सर्वेक्षण (JMS) चे काम पुर्ण झालेले आहे. भुसंपादन करुन जागा विकासकाच्या ताब्यात प्रकल्पाच्या वेळापत्रकानुसार देणे महानगरपालिकेला बंधनकारक आहे. निविदा अटी व शर्तीनुसार भुसंपादन करुन जागा विकासकाच्या ताब्यात देण्यास उशीर झाल्यास महानगरपालिकेस आर्थिक बोजा सोसावा लागेल. या बाबतची कार्यपध्दती Concession Agreement मध्ये दर्शविली आहे. भुसंपादना करीता साधारणत: रुपये ३० कोटी रकमेची आवश्यकता असून या रकमेची तरतुद अर्थसंकल्पात प्राधान्याने करणे अत्यंत आवश्यक आहे.

१४. समांतर पाणी पुरवठा योजनेची कामे लवकरच सुरु होणार असल्याने या पुढे महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पात पाणी पुरवठयाची कोणतीही कामे प्रस्तावीत करता येणार नाहीत तसेच ज्या कामांचे कार्यादेश अद्याप झालेले नाहीत अशी कामे रद्द करणे आवश्यक आहे. जेणे करुन महानगरपालिकेचे आर्थिक हित जोपासले जाईल. या कार्यवाहीस देखील मान्यता व्हावी.

१५. दिनांक १४.०१.२०११ रोजी Subhash Project Marketing Ltd. (SPML) यांनी दाखल केलेल्या निविदा दरा संदर्भाने Negotiation करण्यासाठी महानगरपालिके अंतर्गत असलेल्या PPP Cell च्या सर्व सदस्यांच्या व निविदाधारकांचे प्रतिनिधी यांचे उपस्थितीत

बैठक संपन्न झाली. बैठकीत SPML यांनी भरलेल्या दराबाबत सविस्तर चर्चा झाली व दर कमी करावेत अशा सुचना देण्यात आल्या. त्यावर SPML यांनी त्यांच्या Financial Model संदर्भाने सविस्तर माहिती दिली. त्याच सोबत उपांगनिहाय तुलनात्मक किंमतीचे विवरण सादर केले. या PPP Model अंतर्गत मोठया प्रमाणात Business Risk असुन २० वर्षां पर्यंत प्रकल्प चालविण्याची जबाबदारी असल्याने निविदे अंतर्गत सादर केलेले दर योग्य असल्याने AOSG ची रक्क म कमी करणे शक्य नसल्याचे SPML यांनी बैठकीत सांगीतले. याप्रकल्पाचे Transaction Advisor क्रिसील या संस्थेने तसेच युनिटी कन्सलटंट प्रा. लि., पुणे यांनी SPML यांची निविदा मान्य करण्यास हरकत नसल्याचे लेखी स्वरुपात कळविलेले आहे.

१६. Concessionaire ला द्यावयाची AOSG ची रक्क म व Water Payment Reserve Account मध्ये ठेवावयाची रक्कम महानगरपालिका कशी उभारेल याबाबत मुख्य लेखाधिकारी यांच्याकडे विचारणा केली असता सदर संक्षिप्त तपशिल मुख्य लेखाधिकारी यांनी कळविल्या प्रमाणे खालीलप्रमाणे आहे.

- सन २०१०-११ या वर्षाचा अर्थसंकल्प रुपये ४०० कोटी चा असून प्रत्यक्ष संभाव्य प्राप्ती / उत्पन्न सुमारे २६५ कोटी रुपये राहील. यातुन बांधील व अनिवार्य (mandatory) खर्च रुपये १५८ कोटी वजा जाता निव्वळ **रुपये १०७ कोटी शिल्लक राहतील.**
- स्पील ओव्हर कामाचे दायीत्व - रुपये ७६.३३ कोटी

- **शिल्लक रक्कम (रुपये १०७ कोटी -रुपये ७६.३३ कोटी )= रुपये ३०.६७ कोटी**

- देय कर्ज

| | |
|---|---|
| - IDBI Bank | - रुपये ५.५२ कोटी |
| - पोलिस विभाग | - रुपये १.०० कोटी |
| - रस्ते विकास महामंडळ | - रुपये १.०० कोटी |
| - नगर रचना आस्थापना | - रुपये १.२० कोटी |
| | **एकुण - रुपये ८.७२ कोटी** |

- **शिल्लक रक्कम (रुपये ३०.६७ कोटी - रुपये ८.७२ कोटी )= रुपये २१.९५ कोटी**

- सध्या महानगरपालिका औरंगाबाद पाणी पुरवठा योजना चालवते. त्यासाठी साधारणत: खालीलप्रमाणे खर्च प्रति वर्ष होत आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| i. | कर्मचारी वेतन व भत्ते | - रुपये ७.४० कोटी |
| ii. | विद्युत देयक | - रुपये २७.६० कोटी |
| iii. | पाटबंधारे खात्याकडुन पाणी खरेदी | - रुपये २.४० कोटी |
| iv. | देखभाल दुरुस्ती | - रुपये ६.९५ कोटी |
| v. | रसायन सामुग्री | - रुपये १.४५ कोटी |
| vi. | मशिनरी देखभाल | - रुपये १.८० कोटी |
| vii. | वॉटर सेस | - रुपये ०.१५ कोटी |
| | | **एकुण - रुपये ४७.७५ कोटी** |

या योजनेवरील उपरोक्त प्रमाणे होणारा खर्च, ही योजना Concessionaire कडे हस्तांतरीत झाल्यानंतर महानगरपालिकेला करावा लागणार नाही. त्यामुळे रु.४७.७५ कोटी इतकी रक्कम महानगरपालिका संबंधीत Concessionaire ला द्यावयाच्या AOSG च्या रकमेत टाकू शकेल.

**एकुण शिल्लक राहणारी रक्कम - (रु. २१.९५ कोटी + रु. ४७.७५ कोटी ) = रु.६९.७० कोटी**

- **विकासकास पहिल्या वर्षी देय असलेली रक्कम**

| | | |
|---|---|---|
| i. | Annual Operational Support Grant (AOSG) | - रुपये ६३ कोटी |
| ii. | पाणीपट्टीची रक्कम सुमारे | - रुपये २३.५० ोटी |
| | **एकुण देय** | **- रुपये ८६.५० कोटी** |

वरील आकडेवारी पाहता एकुण द्यावी लागणारी रक्कम रुपये ८६.५० कोटी प्रथम वर्षासाठी असून शिल्लक रुपये ६९.७० कोटी इतकी आहे. म्हणजेच रुपये १६.८० कोटीची तुट आहे. प्रस्तावीत खर्चात चालु आर्थिक वर्षातील रुपये २११ कोटीच्या विकास कामाचा समावेश नाही.

- विकासकास AOSG म्हणुन जे रुपये ६३ कोटी द्यावयाचे आहेत. त्यासाठी कठोर आर्थिक शिस्त निर्माण करण्या बरोबरच खालील उपाय योजना कराव्या लागतील.
  - **i.** प्रशासकीय खर्चात काटकसर करणे.
  - **ii.** आवश्यक / फक्त देखभाल दुरुस्तीची अत्यावश्यक कामे वगळता इतर विकास कामे तुर्त स्थगीत करणे.
  - **iii.** उत्पन्नाचे स्त्रोत बळकट करुन मालमत्ता कर व इतर कर प्रभावी पणे वसुल करणे.
  - **iv.** उत्पन्नाचे नविन स्त्रोत निर्माण करणे.
  - **v.** शासनाकडुन विशेष अनुदानाची मागणी करणे.
  - **vi.** वित्त आयोगाकडुन मिळणाऱ्या अनुदानातुन काही रक्कम नियमितपणे AOSG साठी वापरणे.

यासर्व बाबींवर गंभिरपणे विचार करुन काही कठोर आर्थिक शिस्तीचे निर्णय घेतले गेल्यास AOSG नियमीतपणे अदा करता येईल अन्यथा नाही. तसेच निविदा अटी व शर्ती नुसार वॉटर पेमेंट रिजर्व अकाऊंट स्वतंत्रपणे उघडुन AOSG च्या १.५ (दिड पट) रक्कम प्रमाणात सदर खात्यात जमा करावी लागणार आहे. जर रुपये ६३ कोटीची अदाई नियमीतपणे झाली नाही तर तेवढी रक्कम परस्पर वॉटर पेमेंट रिजर्व अकाऊंट मधुन विकासक काढुन घेऊ (Withdraw) शकतो. या करीता साधारणत: पहिल्या वर्षा करीता महानगरपालिकेस रुपये ९४.५० कोटी जमा करावे लागतील. सदरची रक्कम महानगरपालिकेच्या उत्पन्नातुन जमा करणे तुर्त तरी शक्य दिसत नाही. यासाठी बँके कडुन कर्ज उभारणे आवश्यक राहील. अशा प्रकारचा अभिप्राय मुख्य लेखाधिकारी यांनी दिलेला आहे.

त्यानुसार उपरोक्त प्रमाणे योजनेच्या ठळक बाबीं अंतर्गत मुद्दा क्र. १ ते १६ मध्ये सविस्तर दर्शविल्या प्रमाणे प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

१. या कामासाठी लागणारी पहिल्या वर्षा करीता रु. ६३ कोटी + रु. ९४.५० कोटी अशी एकुण रु.१५७.५० कोटी रक्कमेची तरतुद महानगरपालिकेच्या इतर वार्षिक उत्पन्नातुन अर्थसंकल्पात या प्रकल्पा करीता प्राधान्याने करणे आणि त्यास्तव इतर कामे (देखभाल दुरुस्तीची कामे वगळता) स्थगित करणे.

२. **Subhash Project Marketing Limited (SPML)** या निविदा धारकाने Annual Operational Support Grant (AOSG) म्हणुन पहिल्या वर्षाकरीता मागितलेली रक्कम रुपये ६३ कोटी तसेच पुढील २० वर्षां करीता या AOSG च्या रक्कमेवर दर वर्षी 6 % दराने होणाऱ्या वाढीस (Escalation) मान्यता देणे.

३. **Subhash Project Marketing Limited (SPML)** यांना संपुर्ण Concession Period मध्ये वसुल होणारी पाणीपट्टीची रक्कम देणे.

४. महानगरपालिकेस केंद्र शासन तसेच राज्य शासन यांचे कडुन मिळणारे प्रकल्प अनुदान रु. ३९९.५३ कोटी रक्कम बांधकाम कालावधीमध्ये टप्प्याटप्प्याने Project Grant म्हणुन देण्यास आणि रुपये ३९९.५३ कोटी या Project Grant सह रुपये ७९२.२० कोटींचा प्रकल्प SPML यांचेतर्फे उभारणी करणेस मान्यता देणे.

५. **Subhash Project Marketing Limited (SPML)** यांना औरंगाबाद शहर पाणी पुरवठयाचे संपुर्ण Assets २० वर्षा करीता हस्तांतरीत करणे व त्यांना Concessionaire म्हणुन २० वर्षांकरीता नेमणेस मान्यता मिळणेस्तव प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेसमोर मान्यतेस्तव सादर."

## परिशिष्ट "अ"

### सेवा स्तर गरजा

विकासकाने पुरवायच्या सेवा स्तर गरजांची खालील दोन वर्गवारीमध्ये विभागणी केलेली आहे.

१. **भाग अ - पूर्व COD सेवा स्तर गरजा:-** या सेवा स्तर गरजा प्रकल्पाचे बांधकाम व पुर्नवसन कालावधी करीता म्हणजेच Concession कालावधीतील वर्ष १ ते ३ करीता लागु राहतील.

२. **भाग ब - COD नंतरच्या सेवा स्तर गरजा:-** या सेवा स्तर गरजा प्रकल्पाचे संचलन व देखभाल दुरुस्ती कालावधी करीता म्हणजेच Concession कालावधीतील वर्ष ४ ते २० करीता लागु राहतील.

- औरंगाबाद महानगरपालिका Annual Operational Support Payment समान हप्त्यात प्रति तिमाही अदा करेल.तिमाही हप्ता हा Annual Operational Support Payment च्या २५% इतका असून त्या वर्षासाठी लागु राहील. प्रत्येक तिमाही हप्ता हा दोन भागात विभागलेला आहे.
    १. **निश्चित देयक (Fixed Payment):-** हे एकुण तिमाही Operational Support Payment च्या ७५% इतके असून प्रत्येक तिमाही च्या सुरुवातीस देण्यात येईल. हे देयक कुठल्याही सेवा स्तर गरजांशी निगडीत नाही.
    २. **अनिश्चित देयक (Variable Payment):-** हे एकुण तिमाही Operational Support Payment च्या २५% इतके असून प्रत्येक तिमाही च्या शेवटी देण्यात येईल. हे देयक विकासकाने पुरवावयाच्या सेवा स्तर गरजांशी निगडीत राहील. अनिश्चित देयक हे स्वतंत्र अभियंत्याच्या मान्यतेनंतर अदा करण्यात येईल.
- प्रकल्पाच्या बांधकाम व पुर्नवसन कालावधी म्हणजेच Concession कालावधीतील वर्ष १ ते ३ दरम्यान अनिश्चित देयक (Variable Payment) अदा करण्यासाठी खालील तक्त्यात प्रणाली दर्शवीलेली आहे.

| अ.क्र. | मानक | सेवा स्तर गरजा | | |
|---|---|---|---|---|
| | | वर्ष १ | वर्ष २ | वर्ष ३ |
| १ | शुध्द पाण्याचे उत्पादन | कमीत कमी १३५ द.ल.ली. | कमीत कमी १३५ द.ल.ली. | कमीत कमी १३५ द.ल.ली. |
| २ | घाऊक पाण्याच्या मोजमापा करीता मीटर्स बसविणे. | स्वतंत्र अभियंता व विकासक यांच्या समन्वयाने १००% ठिकाणी बसविणे | या मीटर्स ची नियमीत देखभाल दुरुस्ती | या मीटर्स ची नियमीत देखभाल दुरुस्ती |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ | वितरण व्यवस्थे अंतर्गत घाऊक मीटर्स बसविणे | स्वतंत्र अभियंता व विकासक यांच्या समन्वयाने १००% ठिकाणी बसविणे | या मीटर्स ची नियमीत देखभाल दुरुस्ती | या मीटर्स ची नियमीत देखभाल दुरुस्ती |
| ४ | सेवा पुरविण्याच्या भागाची व्याप्ती | महानगरपालिकेच्या अस्तीत्वातील १००% ग्राहकांना शुध्द पाणी पुरवीणे तसेच महानगरपालिका हद्दीतील नविन ग्राहकांना पाणी पुरविणे | महानगरपालिकेच्या अस्तीत्वातील १००% ग्राहकांना शुध्द पाणी पुरवीणे तसेच महानगरपालिका हद्दीतील नविन ग्राहकांना पाणी पुरविणे | महानगरपालिकेच्या अस्तीत्वातील १००% ग्राहकांना शुध्द पाणी पुरवीणे तसेच महानगरपालिका हद्दीतील नविन ग्राहकांना पाणी पुरविणे |
| ५ | घरगुती ग्राहकांचे सर्वेक्षण [१] | १००% घरांचे | नविन कनेक्शन सह संपुर्ण माहिती. | नविन कनेक्शन सह संपुर्ण माहिती. |
| ६ | ग्राहकांच्या नळ कनेक्शनला जलमापक यंत्रे बसविणे [२] | एकुण ग्राहकांच्या १०% | एकुण ग्राहकांच्या ४०% | एकुण ग्राहकांच्या १००% |
| ७ | ग्राहकांच्या तक्रारी नोंदविणे आणि संनियंत्रण व्यवस्था | ---- | दुसऱ्या वर्षीच्या Concession कालावधीच्या शेवटी प्रत्यक्ष कृतीत आणने | व्यवस्थेची नियमीत देखभाल |
| ८ | संगणकीय देयक आणि वसुलीची व्यवस्था | ---- | दुसऱ्या वर्षीच्या Concession कालावधीच्या शेवटी प्रत्यक्ष कृतीत आणने | व्यवस्थेची नियमीत देखभाल |
| ९ | पाणी पुरवठा | ---- | प्रत्येक ग्राहकाला दररोज पाणी पुरवठा करणे | प्रत्येक ग्राहकाला दररोज पाणी पुरवठा करणे |

बांधकाम आणि पुर्नवसन कालावधीत अदा करावयाचे अनिश्चित देयक खालीलप्रमाणे राहील.

१. **वर्ष १:-** सेवा स्तर मानकांशी कुठलाही संबंध न जोडता.
२. **वर्ष २:-** Concession कालावधीच्या पहिल्या वर्षा करीता ठरविलेले सेवा स्तर मानक पुर्ण झाल्यावर. जर विकासक Concession कालावधीच्या पहिल्या वर्षाचे सेवा स्तर मानक पुर्ण करु शकला नाही, तर महानगरपालिका अनिश्चित देयक राखुन ठेवेल. अशा प्रकारचे दुसऱ्या वर्षा करीता राखुन ठेवलेले अनिश्चित देयक Concession कालावधीच्या पहिल्या वर्षा करीता ठरविलेले सेवा स्तर मानक पुर्ण झाल्यावर अदा करण्यात येईल.
३. **वर्ष ३:-** Concession कालावधीच्या पहिल्या आणि दुसऱ्या वर्षा करीता ठरविलेले सेवा स्तर मानक पुर्ण झाल्यावर. जर विकासक Concession कालावधीच्या पहिल्या आणि दुसऱ्या वर्षाचे सेवा स्तर मानक पुर्ण करु शकला नाही तर महानगरपालिका तीसऱ्या वर्षाचे अनिश्चित देयक राखुन ठेवेल. अशा प्रकारे राखुन ठेवलेले. तीसऱ्या वर्षा करीताचे अनिश्चित

देयक Concession कालावधीच्या पहिल्या आणि दुसऱ्या वर्षा करीता ठरविलेले सेवा स्तर मानक पुर्ण झाल्यावर अदा करण्यात येईल.

टिप:- १. महानगरपालिका घरगुती ग्राहकांच्या सर्वेक्षण करीता अटी व संदर्भ देईल.
२. प्रत्येक नविन कनेक्शन मीटर सह देण्यात येईल.

- प्रकल्पाच्या देखभाल व दुरुस्ती कालावधी म्हणजेच Concession कालावधीतील वर्ष ४ ते २० दरम्यान अनिश्चित देयक (Variable Payment) अदा करण्यासाठी खालील तक्त्यात प्रणाली दर्शवीलेली आहे.

| अ.क्र. | मानक | सेवा स्तर गरजा | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | % | वर्ष ४ | वर्ष ५ | वर्ष ६ | वर्ष ७ ते २० |
| १ | ग्राहकांची व्याप्ती | २५% | सेवा द्यायच्या क्षेत्रामध्ये १००% व्याप्ती | सेवा द्यायच्या क्षेत्रामध्ये १००% व्याप्ती | सेवा द्यायच्या क्षेत्रामध्ये १००% व्याप्ती | सेवा द्यायच्या क्षेत्रामध्ये १००% व्याप्ती |
| २ | ग्राहकांच्या जलमापक यंत्रांची कार्यक्षमता [३] | १०% | एकुण ग्राहकांचे कमीत कमी सरासरी ९५% ग्राहकांचे मीटर्स कार्यरत असावेत. | एकुण ग्राहकांचे कमीत कमी सरासरी ९५% ग्राहकांचे मीटर्स कार्यरत असावेत. | एकुण ग्राहकांचे कमीत कमी सरासरी ९५% ग्राहकांचे मीटर्स कार्यरत असावेत. | एकुण ग्राहकांचे कमीत कमी सरासरी ९५% ग्राहकांचे मीटर्स कार्यरत असावेत. |
| ३ | पाणी व्यय [४] | २५% | जास्तीत जास्त २५% | जास्तीत जास्त २०% | जास्तीत जास्त १५% | जास्तीत जास्त १५% |
| ४ | तक्रार व्यवस्थापन प्रणाली | १०% | किमान ८०% प्राप्त तक्रारी २४ तासात तपासणे आणि तक्रार नोंदणी नंतर ७२ तासात निवारण करणे | किमान ८०% प्राप्त तक्रारी २४ तासात तपासणे आणि तक्रार नोंदणी नंतर ७२ तासात निवारण करणे | किमान ८०% प्राप्त तक्रारी २४ तासात तपासणे आणि तक्रार नोंदणी नंतर ७२ तासात निवारण करणे | किमान ८०% प्राप्त तक्रारी २४ तासात तपासणे आणि तक्रार नोंदणी नंतर ७२ तासात निवारण करणे |
| ५ | पाणी पुरवठा [५] | २०% | सर्वग्राहकांना दररोज पाणी पुरवठा | शेवटच्या ग्राहका पर्यंत २४ तास वर्ष भर | शेवटच्या ग्राहका पर्यंत २४ तास वर्ष भर | शेवटच्या ग्राहका पर्यंत २४ तास वर्ष भर |
| ६ | पाणी पुरवठयाची शुद्धता | १०% | CPHEEO मानकानुसार | CPHEEO मानकानुसार | CPHEEO मानकानुसार | CPHEEO मानकानुसार |

टिप:-

३ या मानकाची तपासणी विकासकाने स्वतंत्र अभियंत्याला सादर केलेल्या तीमाही अहवालानुसार करण्यात येईल. या अंतर्गत शेवटच्या ग्राहकाकडे बसविलेल्या एकुण मीटर पैकी १% नमुना ग्रहीत धरला जाईल.

४ पाणी व्यय म्हणजे उद्भवाच्या ठिकाणी उचलले जाणारे अशध्द पाणी वजा देयकानुसार शेवटच्या ग्राहकाला दिलेले पाणी अधिक अग्निशमन साठी पुरविण्यात आलेले निशुल्क पाणी वापर. पाणी देयकांची गणना पाणी वापर करणाऱ्या ग्राहकांच्या

एकत्रीत बिजकांनुसार (Invoice) तर उद्‌भवाच्या ठिकाणी उचलल्या जाणाऱ्या अशुध्द पाण्याची गणना पाटबंधारे विभागाने दिलेल्या बिजका नुसार राहील.

५ मानकाची गणना स्वतंत्र अभियंता आणि विकासकाने संयुक्तरीत्या ठरविलेल्या ठिकाणच्या पाण्याच्या दाबानुसार राहील.

खालील अटी नुसार संचलन व देखभाल दुरुस्ती कालावधीतील अनिश्चित देयके अदा करण्यात येतील.

१. **अट १:-** बांधकाम व पुर्नवसन कालावधीत म्हणजेच वर्ष १ ते वर्ष ३ मध्ये ठरविलेले सेवा स्तर मानक पुर्ण झाल्यावर जर बांधकाम आणि पुर्नवसन कालावधीमध्ये कुठलेही सेवास्तर मानक विकासकाने पुर्ण केले नाही, तर महानगरपालिका अनिश्चित देयक राखुन ठेवले. हे अनिश्चित देयक Concession कालावधीतील बांधकाम व पुर्नवसनाचे विहित सेवा स्तर मानक पुर्ण झाल्यावर म्हणजेच वर्ष ४ ते वर्ष २० मध्ये अदा करण्यात येईल.

2. **अट २:-** Concession कालावधीतील संचलन देखभाल दुरुस्ती या कालावधीतील म्हणजेच वर्ष ४ ते वर्ष २० मध्ये सेवास्तर गरजा पुर्ण झाल्यावर अनिश्चित देयक प्रत्येक सेवा स्तर गरजेला दिलेल्या टक्केवारी नुसार अदा करण्यात येईल. जर विकासक सेवा स्तर गरजा पुर्ण करु शकला नाही तर विकासकाला अदा करायचे अनिश्चित देयक त्यानुषंगाने महानगरपालिका वजा करेल. Concession कालावधीतील वर्ष ४ ते २० दरम्यान सेवा स्तर गरजा पुर्ण न केल्याने त्यामुळे वजा केलेली रक्कम विकासकाला अदा करण्यात येणार नाही.

टिप:- ६ उदा. समजा विकासकाला अनिश्चित देयक रुपये ५० लक्ष तीमाही Oprational Support Payment लागु असेल आणि तो ग्राहक व्याप्तीचे मानक पुर्ण करु शकला नाही तर महानगरपालिका तीमाही Oprational Support Payment च्या १०% रक्कम म्हणजेच रु. ५ लक्ष वजा करुन उर्वरीत रु. ४५ लक्ष अनिश्चित देयकापोटी तीमाही Oprational Support Payment अदा करेल. जर विकासक कुठलेही सेवा स्तर गरजा पुर्ण करु शकला नाही तर महानगरपालिका संपुर्ण अनिश्चित देयक म्हणजेच रुपये ५० लक्ष जेकी विकासकाला द्यावयाचे आहेत ते स्थगीत करेल.

## परिशिष्ट "ब"

| **Concession कालावधी** | **महानगरपालिकेवर असलेले दायित्व (रु. कोटी मध्ये)** | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | **वार्षीक अनुदान (Annual Grant)** | **स्वतंत्र अभियंता** | **स्वतंत्र लेखा परिक्षक** | **भुसंपादन** | **एकुण** |
| **वर्ष १** | ६३ कोटी | ३.११ | ०.४० | ३०.००[२] | ९६.५१ |
| **वर्ष २** | ६६.७८ कोटी | ३.११ | ०.४० | ०.०० | ७०.२९ |
| **वर्ष ३** | ७०.७९ कोटी | ३.११ | ०.४० | ०.०० | ७४.३० |
| **वर्ष ४** | ७५.०३ कोटी | ०.९९ | ०.४० | ०.०० | ७६.४२ |
| **वर्ष ५** | ७९.५४ कोटी | ०.९९ | ०.४० | ०.०० | ८०.९३ |
| **वर्ष ६** | ८४.३१ कोटी | ०.९९ | ०.४० | ०.०० | ८५.७० |
| **वर्ष ७** | ८९.३७ कोटी | ०.९९ | ०.४० | ०.०० | ९०.७६ |
| **वर्ष ८** | ९४.७३ कोटी | ०.९९ | ०.४० | ०.०० | ९६.१२ |
| **वर्ष ९** | १००.४१ कोटी | ०.९९ | ०.४० | ०.०० | १०१.८० |
| **वर्ष १०** | १०६.४४ कोटी | ०.९९ | ०.४० | ०.०० | १०७.८७ |
| **वर्ष ११** | ११२.८२ कोटी | ०.९९ | ०.४० | ०.०० | ११४.२१ |
| **वर्ष १२** | ११९.५९ कोटी | ०.९९ | ०.४० | ०.०० | १२०.९८ |
| **वर्ष १३** | १२६.७७ कोटी | ०.९९ | ०.४० | ०.०० | १२८.१६ |
| **वर्ष १४** | १३४.३७ कोटी | ०.९९ | ०.४० | ०.०० | १३५.७६ |
| **वर्ष १५** | १४२.४४ कोटी | ०.९९ | ०.४० | ०.०० | १४३.८३ |
| **वर्ष १६** | १५०.९८ कोटी | ०.९९ | ०.४० | ०.०० | १५२.३७ |
| **वर्ष १७** | १६०.०४ कोटी | ०.९९ | ०.४० | ०.०० | १६१.४३ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **वर्ष १८** | १६९.६४ कोटी | ०.९९ | ०.४० | ०.०० | १७१.०३ |
| **वर्ष १९** | १७९.८२ कोटी | ०.९९ | ०.४० | ०.०० | १८१.२१ |
| **वर्ष २०** | १९०.६१ कोटी | ०.९९ | ०.४० | ०.०० | १९२.०० |
| **एकुण रुपये** | **२३१७.४९ कोटी** | **२६.१६** | **०८.००** | **३०.००** | **२३८१.६५ कोटी** |

## परिशिष्ट "क "

**ग्राहकांची थकबाकी वसुल करण्यासाठी द्यावयाचे प्रोत्साहन पर रक्कम**

| **अ.क्र.** | **थकबाकी वसुलीची टक्केवारी** | **प्रोत्साहन** |
|---|---|---|
| १ | ० - ५० % | १५ % |
| २ | ५० - ७५ % | २० % |
| ३ | ७५ % आणि त्यापेक्षा जास्त | ३० % |

परिशिष्ट "ड"

## UIDSSMT अंतर्गत औरंगाबाद महानगरपालिकेस करावयाच्या बंधनकारक सुधारणा (Reforms)

**अ) अनिवार्य सुधारणा.**

- ई - प्रशासन (E- Governance)
- महानगरपालिका लेखे Municipal Accounting / दुहेरी नोंद लेखा पद्धत (Accrual Based Double Entry Accounting System)
- मालमत्ता कर (Property Tax)
- सेवा कर (User Charges)
- शहरी गरीबांसाठी सेवा पुरविण्या करीता निधी उभारण्याची अंतर्गत तरतुद
- शहरी गरीबांसाठी मुलभुत सेवा पुरविणे.

**ब) ऐच्छिक सुधारणा**

- बिल्डींग बायलॉज मध्ये मंजुरीच्या प्रणाली नुसार करावयाच्या सुधारणा
- शहरा अंर्तगत भविष्यातील सर्व इमारतींकरीता पावसाच्या पाण्याचे पुनर्भरण अनिवार्य करण्या करीता बिल्डींग बायलॉज मध्ये सुधारणा करणे. जेणे करुन जलसंधारण कार्यवाही स्विकारल्या जाईल.
- वापरलेल्या पाण्याचा पुर्नवापर करण्याकरीता बायलॉज
- प्रशासकीय सुधारणा
- संरचनात्मक सुधारणा
- पब्लिक प्राइव्हेट पार्टनशिप करीता उत्तेजन देणे.

**संवाद :**

मा.सभापती :विषय क्रमांक 213 हा विषय सभागृहात चर्चेसाठी आलेला आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :शिवजयंती निमित्त सर्वांना शुभेच्छा प्रत्येक पानावर चर्चा होणे अपेक्षित आहे. सदरील प्रोजेक्ट शहरासाठी ऐतिहासिक आहे.

मा.सभापती :पान निहाय चर्चा करावी.

श्री.जगदिश सिध्द :सदरील प्रस्ताव महत्वाचा आहे ऐतिहासीक आहे हे आपले मा.आयुक्त व मा.खासदा यांच्या प्रयत्नाने आला सदरील प्रोजेक्ट 100 टक्के यशस्वी व्हावा अशी अपेक्षा आहे. शहराच्या इतिहासात एकही प्रोजेक्ट असा नाही की पुर्ण झाला झाल्टा ट्रिटमेंट प्लॅन्ट, एएमटी, रॅम्के, सत्यम मनपाचे सात ते आठ प्रोजेक्ट आजपर्यंत पुर्ण झालेले नाही. सदरील प्रोजेक्ट अतिमहत्वाचा आहे. सदरील प्रोजेक्ट अपुर्ण राहू नये अशी सर्व सदस्यांची इच्छा आहे. प्रोजेक्टला मंजूरी देतांना मा.सभापती मा.आयुक्त व स.सदस्य अधिकारी असतिल प्रशासनाने, पदाधिकाऱ्यांना एक विनंती आहे की, बाहेरील एखादा अधिकारी घेऊन प्रोजेक्ट कसा चालू आहे याबाबत 3 महिण्यात एक रिपोर्ट घ्यावा.

मा.सभापती :मागच्या प्रकल्पा प्रमाणे होऊ नये सदरील प्रोजेक्ट यशस्वी होण्यासाठी व कोटयांवधी रूपयांचा नुकसान होऊ नये याची काळजी प्रशासनाने घ्यावी.मंजूरी मिळाल्यास प्रोजेक्ट कसा यशस्वी होईल याबध्दल मत द्यावे प्रत्येक पान नीहाय माहिती व्हावी सविस्तर खुलासा व्हावा. स.सदस्यांना सदरील प्रोजेक्ट विषयी असणाऱ्या शंका प्रशासनाने दूर कराव्यात.

श्री.महेश माळवतकर :शहरातील सर्व जनतेचे सदरील प्रोजेक्टकडे लक्ष लागलेले आहे. पर्यटनाच्या दृष्टीने शहराकडे पाहीले जाते. तंत्रज्ञानामुळे विकास होत चाललेला आहे. परंतु पाणी पुरवठा हा एक दिवसाआड केला जात आहे. पुढील 25 वर्षाचा विचार करून पाणी पुरवठयाची योजनेचा अभ्यास प्रशासन करीत होते. मा.आयुक्त,मा.सभापती यांच्या कार्यकाळात सदरील योजना पुर्णत्वास येण्यासाठी विशेष प्रयत्न केले गेले.श्री.पानझडे यांनी चिंतन अभ्यास करून योजना अंतिम मंजूरीकरीता सभागृहापुढे आलेली आहे.10 लाख जनतेच्या दृष्टीने महत्वाचे 1800 रू पाणीपट्टी एक दिवसाआड पाणी पट्टी समांतर जलवाहीनी कार्यन्वित झाल्यावर पाणीपट्टीमध्ये वाढ होईल का? असा प्रश्न जनतेला पडलेला आहे. याबाबतीतचा खुलासा प्रशासनाने केला पाहीजे.

मा.सभापती :पेजवाईज चर्चा करून त्यास मान्यता देण्यात येईल. सूचना काही मुद्दे असेल तर सदस्यांनी मांडाव्यात.

श्री.विकास जैन :कुठल्या वर्षीची लोकसंख्या गृहीत धरून योजना कार्यान्वित होत आहे.

मा.सभापती :योजनेबाबत माहीती देण्यात यावी.

कार्यकारी अभियंता(पा.पू.) :22 मार्च हा जागतिक जलदीन ऐतिहासीक निर्णयासाठी एकत्र आलो लोकसंख्या सुमारे 25 लक्षसाठी 2041 वर्षापर्यत पाणीपुरवठा गरज लक्षात घेता टप्प्याटप्प्याने या योजनेची निर्मिती केली आहे. सर्वप्रथम 20 वर्षाचे नियोजन असणार आहे. 20 वर्षानंतर हस्तांतर देखभाल दुरूस्ती (ओ ॲन्ड एम) हा नंतर भाग आहे पावर पॉइंन्ट प्रेझेंटेशन तयार आहे या योजनेमध्ये 190 ते 200 एमएलडी पाणी + उरलेले पाणी वाढवुन द्यावयाचे +उरलेले पाणी वाढवुन घ्यायचे आहे शासनाकडुन 400 कोटी अनुदान प्राप्त होणार आहे. त्यातील 143.86 कोटी रूपयांचा पहीला हप्ता प्राप्त झालेला आहे.

मा.सभापती :पेजवाईज शंकाचे निरासन करण्यात यावे. पान क्रमांक 2 बाबत माहिती देण्यात यावी.

श्री.मधुकर सावंत :पान क्र.2 वर 359.67 चा प्रस्ताव आता 792 कोटी झाले त्यावेळेस प्रयत्न केले असते तर जास्त खर्च लागला नसता

कार्यकारी अभियंता(पा.पू.):सन 2005-06 मध्ये सदरील प्रकल्प UIDSSMT या योजनेतुन अनुदान मिळण्यासाठी महानगरपालिकेने रूपये 359.67 कोटीचा प्रस्ताव राज्य शासना मार्फत केंद्र शासनाला सादर केला होता.त्यावेळी माहित नव्हते पी.पी.पी. सन 2009 मध्ये मंजूरी मिळाली म्हणजे तीन वर्षाचा कालावधी लागला.

मा.सभापती : पान क्रमांक 3, 4

श्री.अमित भुईगळ :पान क्रमांक 4 वर जलमाप यंत्र बसविणेसाठी 56.63 कोटी रूपये दर्शविलेले आहे. माहीती देण्यात यावी. ग्राहकाकडून घेणार का ?

कार्यकारी अभियंता(पा.पू.):792 कोटी पैकी 400 कोटी शासन अनुदान उर्वरित विकासकार निविदेच्या अटी शर्तीनुसार 9 निविदाधारकांना सोगण्यात आले होते की, सदरील प्रकल्प राबवितांना कोणते पैसै मिळतील. शासनाचे अनुदान, शासनाकडुन अतिरिक्त 50 टक्के डिएसआर रक्कम, पाणीपट्टीची रक्कम, मिळणार आहे. मिटर बसवुन लाईनपासून ते घरापर्यंत लाईन तयार टाकून द्यावयाची आहे.

श्री.अमित भुईगळ :मिटर बिघडल्यास नादुरूस्त झाल्यास ती रक्कम परत आकरणी करणार आहे काय?मीटर किती वेळा बदलून देणार

मा.सभापती :मिटरचे वेगळी रक्कम आकारणी करणार आहे का.

श्री.रेणुकादास वैद्य :मिटर बसवणार जनतेवर बोझा 5 वर्षात बसवणार जनतेकडून पाणीपट्टीतून वसूल करणार एका नागरिकांवर किती बोजा पडणार आहे.

कार्यकारी अभियंता(पा.पू.)::नैसर्गिक नादुरूस्ती किंवा तुटफुट याची जबाबदारी संबधीत कंपणी घेणार आहे परंतु अनैसर्गिकरिल्या तुटफूटीची जबाबदारी संबधीत नागरीकाची राहणार आहे.मीटरची किंमत 3 ते 4 हजार कंझ्यूमरने आणावे व लावावे पण गोंधळ होईल

श्री.अमित भुईगळ :नैसर्गिकरित्या तांत्रिक बिघाड झाली असल्यास जास्तीचे बिल देत असल्यास त्याचा बोझा नागरीकांवर टाकणार का, त्या मिटरची परत आकारणी करणार. 20 वर्षात तीन वेळा निकामी/नादुरूस्त झाले नादुरूस्ती मिटरमध्ये झाली तर त्याचा बोझा सर्वसामान्य नागरीकांवर पडणार आहे का?

कार्यकारी अभियंता(पा.पू.):मीटरचे लाइफ 7-8 वर्ष आहे मीटरची काळजी कंझ्यूमरने घ्यावयाची सर्व प्रथमतः जेव्हा मिटर बसवु सात ते आठ वर्षामध्ये मिटरचा लागणारा खर्च हयामध्ये धरलेला आहे. त्यानंतर लागणारा खर्च 500 ते 700 रूपये वर्षाला यानुसार टप्प्याटप्प्याने वसुल करणार आहे. 7-8 वर्षानंतर जेंव्हा मीटर बदलून देण्याची वेळ येईल तेव्हा नळ धारक यांनी आपली मान्यता घेवून बसवावे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :जी कंपनी मीटर देणार आहे वॉरटी किती दिवसाची आहे.

श्री.रेणुकादस वैद्य :मेंटनन्ससाठी 20 वर्षाकरिता देण्यात येते मीटर 7-8 वर्षासाठी, असे का.

कार्य.अभियंता(पापू) :साधरणतः 1 वर्षाची वॉरटी असेल. लाइफ संपल्यानंतर नवीन मीटर लावावेच लागेल.तांत्रिक बिघाड झाल्यास मोफत होईल.

मा.सभापती :नैसर्गिक रिल्या नादुरूस्त झाल्यास काय करणार.

कार्यकारी अभियंता(पा.पू.)::रिप्लेसमेंट करून देणार.

मा.सभापती :करारामध्ये सुधारणा करावी लागलीतर सुधारणा करण्यात यावी.

श्री.विकास जैन :मीटर नादुरूस्त असेल तर मॅनीफॅक्चरवर जबाबदारी असावी.

श्री.रेणुकादास वैद्य :करार करतांना काही वर्षाचे करार करण्यात यावे.

मा.सभापती :पान क्रमांक 6

श्री.रेणुकादास वैद्य :पान क्रमांक 6 वर योजनेचा कालावधी नमुद केलेला आहे.गैर अर्थ घेवू नये योजनेचा कालावधी 20 वर्षाचे कॅल्क्यूलेशन करून 20 वर्षाचा कालावधी असून प्रीप्रेटरी पीरीयड 6 महीणे आहे

कार्यकारी अभियंता(पा.पू.):स्थायी समितीने मंजूरी दिल्यानंतर 15 दिवस एलओए द्यावयाचा एलओए दिल्यानंतर 30 दिवसात कंन्सेशंन ॲग्रीमेंन्ट करायचे. ज्या दिवशी concession Agreement होईल त्याच्यापासून सहा महिन्यापर्यंत आपला प्रीप्रेट्री पिरेड आहे. सहा महिने संपल्यानंतर खरी Appointed date मध्ये सगळी सिस्टीम समजुन घेणार आहे. Assest Liability ची माहीती घेणार आहे. Appointed date पासून 20 वर्षाचा कालावधी सुरू होईल.

श्री.रेणुकादास वैद्य :योजनेचा कालावधी 20 वर्षाचा आहे. वर 6 महिन्यांचा कालवधी आहे.

कार्यकारी अभियंता(पा.पू.):6 महिने तयारीचा कालावधी आहे. हा योजनेचा कालावधी नाही.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :आज मंजूरी मिळाल्यानंतर उद्यापासून काम सुरू होणार आहे का?

कार्यकारी अभियंता(पा.पू.):नाही. सदरील कालावधी हा अभ्यासासाठी लागणारा आहे. हा योजनेचा भाग होऊ शकत नाही.

श्री.रेणुकादास वैद्य :7,Independent Engineer and Independent Auditor याचं देयके स्वतंत्ररित्या द्यावयाचे आहे. यासाठी रक्कम कोठुन देणार आहे.महापालिका देणार की एजन्सी देणार

कार्यकारी अभियंता(पा.पू.) :केंद्र शासनाने पी.पी.पी योजनेचे गाईडलाईन त्याप्रमाणे क्रीसील मदत करणार तृतीय पक्ष असावे महानगरपालिका व ठेकेदारास मदत व्हावी केंद्र शासनाने टाकलेल्या अटीप्रमाणे स्वतंत्र अभियंते व स्वतंत्र ऑडीटर बाबत व महानगरपालिकेने केलेल्या करारानुसार देय रकमांच्या 50 टक्के रक्कम महानगरपालिकेने व उर्वरित 50 टक्के रक्कम विकासकाने Independent Engineer and Independent Auditor यांना द्यायचे आहे. प्री मिटींगमध्ये याबाबतची पुर्ण चर्चा घडुन आणलेली आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :परिशिष्ट ब प्रमाणे 34.16 कोटी तडजोडीसाठी ठेकेदारास बोलवावे इंजीनीअर, ऑडीटरला बोलावून कमी करता येईल का पाहावे.

श्री.विकास जैन :केंद्र शासनाचे अनुदान हा या योजनेसाठी महत्वाचा विषय आहे. श्री.खैरे साहेबांच्या प्रयत्नातुन पहिल्या टप्प्याचे अनुदान प्राप्त झालेले आहे.ख-या अर्थाने त्यांचे अभिनंदन करण्यात यावे.

श्री.रेणुकादास वैद्य :अभिनंदन करण्यात यावे.

मा.सभापती :सभागृहाच्या वतीने श्री.चंद्रकांत खैरे साहेबांचे अभिनंदन करण्यात येते.

श्री.विकास जैन :पहिला टप्प्याचे अनुदान आले दुसरा टप्प्याचे अनुदान येणे अपेक्षीत आहे

यासाठी केंद्रशासनाच्या काही अपेक्षा असतील आपण काही तरी अहवाल दिल्यानंतर अनुदान मिळेल.

कार्यकारी अभियंता(पा.पू.) :288 कोटी निधी पैकी 143 कोटी शासनाकडुन मिळाले ते आपल्या बँक खात्यात जमा आहे नियमाप्रमाणे सदरील रक्कम इतरत्र वळती करू शकत नाही. समांतर योजनेसाठी स्वतंत्र खाते उघडण्यात आल तेथे ती रक्कम सुरक्षित आहे. दुस-या हप्त्याचे अनुदान घेणेसाठी पहिल्या हप्त्याचे अनुदान 70 टक्के कन्झ्यूम करून युटीलायझेशन प्रमाणपत्र शासनाकडे सादर करावे लागेल.ते सबमिट केल्यानंतर त्यांनी ज्या अटी शर्ती घातलेल्या आहे की महानगरपालिकेने काय काय केले पाहीजे. युआयडी सिस्टीममध्ये काही रि फॉर्म सजेस्ट केलेले आहे. उदा. कायमस्वरूपी सुधारणा आणि ऐच्छिक सुधारणा,या सुधारणा महानगरपालिकेने करणे अपेक्षित आहेत. सुधारणा संदर्भातला प्रस्ताव सभेसमोर विचारार्थ सादर केलेला आहे.काय काय सुधारणा करावयाच्या त्या सुधारणा महापालिकेने केल्यानंतर केंद्र शासनाचे प्रतिनिधी आल्यानंतर सगळया गोष्टींची पहाणी करून दुसऱ्या टप्प्याचे अनुदान इश्यु होते एवढे सरळ सोपे नाही. 143 कोटी खर्च केले की लगेच 143 पुन्हा मिळेल.त्यासाठी महापालिकेला काही गोष्टी करायच्या आहेत.

श्री.विकास जैन :70 टक्के रक्कम किती महिन्यात खर्च होणार आहे.

कार्यकारी अभियंता(पा.पू.) : ही स्किम उशीरा मंजूर झालेली आहे व अनुदान उशीरा मिळालेले आहे.जवळपास 6-7 वर्षापासून ही योजना चालू आहे. वेगवेगळया राज्यात, शहरात ही योजना चालू आहे. आपल्या पूढे काही लोक गेले आपल्याला उशीरा अनुदान मिळालेले आहे नॅचरली हे कंझ्यूम होण्यास वेळ लागणार आहे. मार्च 2012 पर्यंत 70 टक्के बुकींग झाली पाहीजे. असे नियोजन करणार आहोत. Construction grand आणि संबधीताची रक्कम अशी मिळुन 12 हप्त्यामध्ये तीन वर्षात रक्कम देणार आहोत. एकुण ग्रॅन्ड 399 कोटींचे द्यावयाचे आहे. यात Constriction Grand आणि Contractor चा हिस्सा किती राहील यांचे Combination करून असा प्रयत्न राहील की, Prepretory period मध्ये नियोजन करणार आहे.आपला असा प्रयत्न राहिल की मार्च 2012 पर्यंत शक्यतो म्हणजे पहिले हप्ते हे मोठमोठे होतील म्हणजे सबंधीताचा पैसा व महापालिकेचा पैसा असे लवकरात लवकर 70 टक्के रक्कम खर्च करण्याचा प्रयत्न राहिल.एखादया वेळेस शासनाकडे सदरील योजनेच्या कालावधीसाठी मुदतवाढ करण्याची विनंतीही करू देशामधील अशा प्रकारचा पहिलाच प्रकल्प आहे.

श्री.विकास जैन :वर्षाला किती किलोमिटर लाईन झाली पाहीजे याचे नियोजन झाले असेल.

कार्यकारी अभियंता(पा.पू.) :12 हप्त्यामध्ये रक्कम खर्च होणार आहे यादृष्टीने नियोजन करणार आहे. पहिल्या चार हप्त्यांमध्ये मुख्य पाईपलाईनचे काम सुरू करावे लागणार आहे.त्यात भुंसपादनाचा भाग येणार आहे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :जो पर्यंत केंद्र शासन आणि राज्य शासनाचे जे निर्देश दिलेले आहे त्याचे

काटेकोरपणे अंमलबजावणी करणार नाही तोपर्यंत पुढील अनुदान प्राप्त होणार नाही. दुसऱ्या टप्प्यातील अनुदानासाठी केंद्र शासनाने जे निकष निर्देश दिले त्याची काटेकोरपणे अमलबजावणी करावी लागेल.

श्री.विकास जैन :सदरील प्रोजेक्ट पुर्ण करण्यास केंद्र शासनाने टाईम लिमिट दिलेला आहे काय.

कार्यकारी अभियंता(पा.पू.) : युआयडीएसएसएमटी ही योजना 2012 ला वांईड ऑफ होण्याची शक्यता आहेच परंतु वेगवेगळया पातळीवर जेंव्हा बैठका झाल्या मा.आयुक्त महोदय मी व जे जॉईंट सेक्रेटरी आहे त्यांचेशी बोलणे झाले त्यांचे असे म्हणणे आहे की देशात असे पुष्कळ शहर आहेत की त्यांना हा पैसा देण्यात आलेला आहे वेगवेगळया कारणांमुळे उशीर होत आहे. योजनेस वाढ मिळण्याची शक्यता आहे. त्यासाठीही प्रयत्न केले जात आहे.

श्री.विकास जैन :जसे आताच म्हटले की 2012 ही डेड लाईन म्हटली असे व्हायला नको की नक्षत्रवाडीपर्यत लाईन आली पैसे संपले केंद्र शासन पैसे देत नाही.हा त्रास पुढे होवू नये या संदर्भात आजपासूनच तयारी केली पाहिजे केंद्र शासनाशी चर्चा करणे.

मा.सभापती :प्रत्येक 3 महिण्याला स्थायी समिती समोर अहवाल यायला पाहिजे.

कार्यकारी अभियंता(पा.पू) :जेंव्हा प्रकल्प सुरू होईल कन्सेशन ॲग्रीमेंन्ट होईल आणि दर तीन महिण्याला कुठपर्यत प्रोगेसीव्ह रिपोर्ट सादर करावयाचा असतोस्थायी समितीची मंजूरी मिळाल्यानंतर त्यास एलओए देण्यात येईल. त्यानंतर शासनाकडे अहवाल सादर करू त्यावेळी शासनास विनंती करू की यामध्ये मुदत वाढवून दयावी.

श्री.विकास जैन :महानगरपालिकेचा शेअर्स कोण टाकणार आहे.राज्य शासनाचे शेअर्सचे काय ?

कार्यकारी अभियंता(पा.पू.):दुसऱ्या टप्प्यातील अनुदान केंद्र शासनाकडुन आल्यानंतर राज्य शासन अनुदान देणार आहे.

श्री.विकास जैन :147 मध्ये पहिल्या वर्षी आपण 63 कोटी देणार आहे ठेकेदारास कमी पैसे देणार नाही त्या प्रमाणात कामही झाले पाहीजे.

मा.सभापती :प्रत्येकी तीन महिन्याला स्थायी समितीकडे सदरील योजनेच्या कामकाजाबाबत अहवाल आला पाहीजे.

कार्यकारी अभियंता(पा.पू.):टेंडर च्या कागदपत्रामध्ये कम्प्लसरी आपण केलेलेच आहे पहील्या तीन वर्षाचे कन्ट्रक्शनमध्ये दर महिण्याला त्याने व तीन महिन्याचा प्रोगेसिव्ह रिपोर्ट सादर करणे आवश्यक आहे.उर्वरीत 17 वर्षातही दर महिण्याला व तीन महिण्याचा प्रोगेसिव्ह रिपोर्ट सादर करावयाचा आहे तो स्थायी समितीसमोर सादर करण्यात येईल.

श्री.विकास जैन :कंत्राटदारास 147 + 64 कोटी असे साधारणत: 200 कोटी रूपये देणार आहे.रक्क्म कमी पडू देणार नाही.

कार्यकारी अभियंता(पा.पू.) :टप्प्याटप्प्याने रक्कम देणार आहे.पहिल्या वर्षी त्यांना पैसे कमी पडू देणार नाही.

मा.सभापती :काम झाल्याच्या प्रमाणात रक्कम दिली गेली पाहीजे.

श्री.विकास जैन :200 कोटी आपण तरतूद बजेटमध्ये केली पहिल्या टप्प्यातील कामाचा चांगला प्रोगेसीव्ह पाहिजे तरच केंद्र शासन 100 टक्के अनुदान देईल.

कार्यकारी अभियंता(पा.पू.) :भू संपादनासाठी तरतुद करणे आवश्यक आहे.त्यासाठी वेळ लागणार आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :पहिल्या वर्षीसाठी निधी उपलब्ध असणारच आहे. काम चांगले व जास्त वेळ काम करावे भुसंपादनाचे पैशा अभावी काम थांबले असा प्रकार होवू नये

कार्य.अभियंता(पापू) :अे आणी बी असे दोन प्रकारचे भुसंपादन करणे अे मध्ये पाणीपुरवठयासाठी प्लॅन्ट यासाठीची जागा आपल्या ताब्यात आहे तिसरे जे एमबीआर बांधावयाचा आहे ती जागा ताब्यात आहे.तसेच शहरामध्ये जे 11 ठिकाणी इएसआर आपल्या ताब्यात आहे.शहरामध्ये जे डिस्ट्रीब्युशन करायचे ती जागा आपल्याकडे आहे.बी मध्ये जसे जायकवाडीपासून ते फारोळा ते नक्षत्रवाडी पर्यंत जलवाहिनी टाकणे

मा.सभापती :जे कामे केले त्यात प्राधान्यक्रम ठरवावा शासनाचे अनुदान थांबणार नाही याची काळजी घ्यावी तशी आपण आर्थीक तरतुद ठेवलेली आहे पहिल्या वर्षी अडचण येणार नाही.कोणते काम करायचे ते प्राधान्याने ठरवावे.

श्री.रेणुकादास वैद्य :पहिल्या वर्षात कामाच्या प्रगतीला खिळ बसू नये.

श्री.विकास जैन :योगायोगाने शासनाने दुस-या टप्प्यातील अनुदान दिले नाही तर काय प्रोवीजन राहणार आहे.

कार्य.अभियंता(पापू) :पान क्र. 9 व 8 वर दाखवलेले आहे. त्यांनी चार महिणे काम थांबविण्याचे काहीच कारण नाही.चार महिण्यानंतरही जर पैसे उपलब्ध करून देवू शकलो नाही तर त्यास 15 टक्के व्याज देण्याची तरतूद आहे.वर्षात जी रक्कम दयावी लागणार त्याची तरतूद करावीच लागणार आहे.

श्री.विकास जैन :योजना आपण सुरू करतो पुन्हा ती बंद पडू नये यासाठी अनुदान कसे येणार खर्च कसा करणार माहिती घेत आहोत.

श्री.रेणुकादास वैद्य :पान क्र. 7 वर युनीटी कन्सलटंट म्हणून 3 वर्षासाठी नियुक्ती करीत आहोत. त्यांचा ठराव क्र.30 व 20 वर्षासाठी करारनामा त्यांना 2.35 + प्रोजेक्ट रक्कम +सर्विस चार्जेस.

कार्य.अभियंता(पापू) :त्यांनी काम फायनल केले नाही असे व्हायला नको की त्यांचे बरोबर विश्वासाने करार केला व काम करायचे नाही.पहिल्या तीन वर्षाचे काम प्रोगेसिव्ह पाहिजे जर आपल्याला वाटले बरोबर काम करीत नाही. त्यांना बाजूला करून दुसरे नेमू शकतो.

श्री.रेणुकादास वैद्य :पहिले तीन वर्ष त्यांना पेमेंन्ट करणार त्यानंतर 20 वर्ष करणार

कार्य.अभियंता(पापू) :त्यांना पेमेन्ट करणार नाही जो कुणी इंजिनीअर असेल त्यांना देणार दर 3 वर्षाला आढावा घेणार आहे.डबल डबल पेमेंन्ट होणार नाही त्यांना पहिले 3 वर्ष हे कनस्ट्रक्शन काळ आहे.त्या वेळात हा प्रकल्प उभा राहणार आहे.पीएमटी +ठेकेदार एकच पेमेंन्ट राहील निम्मे ठेकेदार भरेल.

श्री.मधुकर सावंत :पान नंबर 9 मुद्दा 5 वर खुलासा करण्यात यावा.

श्री.रेणुकादास वैद्य :154.50 कोटी रूपये नियुक्ती तारखेपर्यंत मनपा जमा करणार आहे. केंद्र शासनाचे अनुदान 144 कोटी रूपये मिळालेले आहे.ते यात समाविष्ट करणार का.

कार्यकारी अभियंता(पा.पू) : जी 143.86 कोटी रक्कम ती कन्स्ट्क्शन ग्रँड मिळालेली आहे. प्रोजेक्ट उभारणीसाठी सदरील पैसा राहणार आहे स्वतंत्र अशा खात्यावर रक्कम जमा राहणार आहे.अन्युअल आपरेशन मेंटनन्स ग्रॅडही वेगळी आहे. 94.50 कोटी रूपये वॉटर रिझर्व खात्यावर जमा करावे लागणार आहे.

श्री.मधुकर सावंत :पान क्र.9 व मुद्दा क्र.5 वर कन्स्ट्रक्शन पिरेड 20 वर्षाचा असुन दर तीन वर्षांनी 25 टक्के वाढ होणार आहे.ती वाढ कशी होणार आहे .

मा.सभापती :नागरीकांच्या निगडीत प्रश्न असल्याने यावर चर्चा होवून समाधान झाले पाहिजे पत्रकारांनी ही सुध्दा या विषयावर लक्ष दयावे ही विनंती.

कार्यकारी अभियंता(पा.पू.) :सध्याची पाणीपुरवठयाच्या बीलापोटी 1800 रूपये नागरीकांकडून फ्लॅट रेटने वसुली केली जाते.परंतु जेंव्हा ही योजना पुर्ण होईल तेंव्हा नळांना मिटर बसविल्यानंतर घनमिटर व्हॉल्युममॅट्रिक पध्दतीने आकारणी करणार आहे. ते कसे घेणार या बाबत शेडयुल दिले प्रथम तीन वर्ष पाणीपट्टीमध्ये वाढ होणार नाही. ही योजना जवळपास 792 कोटीची आहे त्या कॉन्ट्रक्टरला काय पैसे लागतील तो त्यांचा मुद्या आहे पहिल्या तीन वर्षात अजिबात वाढ होणार नाही. जेंव्हा मीटर बसविले जाईल तेंव्हा व्हॉल्यूममॅट्रिक पध्दतीने आकारणी होईल.यामध्ये वेगवेगळे स्लॅब केले पहिला स्लॅब उदा. शुन्य ते आठ हजार लिटर प्रती महा पहिला स्लॅब आहे.एक हजार लिटर पाण्यामागे 9 रू.आकारणी होईल.महिण्याला 8 हजार लिटर पाणी वापरले तर 72 होतील.असे 01 वर्षचे एकत्रित आकारणी होईल.जे लहान कुटुंब आहे स्लम मध्ये दोन रूम मध्ये राहतात त्यांना सरसकट 1800रू लावतो जे बंगल्यामध्ये राहणाऱ्या 5-6 रूम त्यांनाही 1800/-रू.च आकारतो ही तफावत दूर करण्याचा प्रयत्न आहे.8-17 हजार लिटर पाण्याचा ज्यांचा प्रतीमहा वापर होईल त्यांना 15 रूपये एक हजार लिटरला आकारण्यात येणार आहे. सतरा ते तेवीस हजार लिटरला 23 रूपये दर आकारला जाणार आहे.30-35 टक्के नागरीक पहिल्या स्लॅब मध्ये येतील.

श्री.रेणुकादास वैद्य :सुरूवातीला लहान घरे आहेत त्यांना 800 पर्यंत पाणीपट्टी येईल त्याच भागात नागरीकांची संख्या वाढल्यास पाणी वाटपामूळे या नागरीकांना पाणीपट्टी बील कमी येईल का?

कार्य.अभियंता(पापू) :त्यांनी जेवढे पाणी वापरले तेवढे बील येईल.

मा.सभापती :जे सर्वसामान्य नागरीक आहे त्यांची कॅपेसीटी 500 ते 1000 लिटर पाणी वापरण्याची आहे. सदर नागरीकांना साधारणतः 700 ते 800 रूपये येतील.. सहा वर्षानंतर म्हणजे 9 व्या वर्षी 25 टक्के म्हणजे किती आकारणी केली जाणार आहे.

कार्यकारी अभियंता(पा.पू.):वार्षीक बिलावर 25 टक्के आकारणी केली जाणार आहे. दर तीन वर्षाला वाढणारी 25 टक्के हे तीन वर्षापासून ते 20 वर्षापर्यंत माहीती काढण्यात

आलेली आहे. थोडक्यात सांगायचे तर शुन्य ते आठ हजार लिटर प्रतीमहा पहिला स्लॅब आहे. एवढे पाणी वापरल्यास 9 रूपये दर हजार लिटर मागे आकारणी होईल 19/ 20 व्या वर्षी तो दर 26 रू असेल. 26X8000 लिटर या प्रमाणे पाणीपट्टी येईल .

श्री.विकास जैन :आपण रेट बाबत बोलतो पाणीपुरवठा कसा राहिल

श्री.अमित भुईगळ :पाणी किती मिळणार आहे.

श्री.विकास जैन :नळाला मोटार लावणार तो खर्च वेगळा येणार आहे.

कार्यकारी अभियंता(पा.पू.):63 कोटी मध्ये 25 टक्के रक्कम अटी शर्ती नुसार सर्व्हिस लेवलशी संबधीत राहणार आहे. त्यानुसार रक्कम देणार आहे.75 टक्के फिक्स व 25 टक्के व्हेरीअेबल पेमेंन्ट असणार आहे. शहरातील किमान 7 मी.प्रेशर राहिल पहिल्या मजल्या पर्यंत राहील

श्री.रेणुकादास वैद्य :पाणी किती कालावधीसाठी देणार आहे. 22 फुटापर्यंत विना मोटार व 40 टक्के लोकांना रू 1200 च्या आत देयक येईल का?

श्री.विकास जैन :सर्व प्रथम मोटार बंद झाली पाहीजेत.एवढा मोठा खर्च करीत आहे नागरीकांना पाणी मिळावे.

कार्यकारी अभियंता(पा.पू) :निश्चितपणे मोटर बंद होईल शहरातील कुठल्याही भागात उंच खोल सात मिटरपर्यंत यापध्दतीने पाईपलाईनचे हायड्रॉलीक प्रेशर राहिल विना मोटार पाणी पुरवठा होणार आहे.

श्री.विकास जैन :विना मोटार पुरवठा होणार असे म्हटले नोंद व्हावी महत्वाचे आहे.

मा.सभापती :विना मोटार पाणी पहिल्या मजल्यावर जाणार किती तास पाणी राहील.

कार्यकारी अभियंता(पा.पू) :नियुक्ती अवधी, पहिले कन्स्ट्क्शन पिरेडमध्ये स्टेटमेंन्ट दिलेले आहे.

श्री.विकास जैन :पाणी बिलापेक्षा नागरीकांना लाईट बिल जास्त भरावे लागते.

कार्यकारी अभियंता(पा.पू) :कन्स्ट्रक्शन पिरेडमध्ये पहिले वर्ष संपल्यानंतर डेली पाणीपुरवठा करावा असे अपेक्षित आहे.या कालावधीत जो नॉम आहे 135 लीटर त्याप्रमाणे पाणी दयावे.पुढे 24x7 चे स्वप्न

श्री.विजय वाघचौरे :20 वर्ष जायकवाडीहून पाणी पुरवठा होण्याची क्षमता आहे का ?

कार्यकारी अभियंता(पा.पू) :जायकवाडीपासून तेवढा पाणीपुरवठा होऊ शकतो.

श्री.जगदिश सिध्द :शहराला सव्वातास पाणीपुरवठा होतो. माझ्या वार्डात सव्वातास पाणी येते त्या वेळात पाण्याची आवक ही 900 लिटर एवढी असती. म्हणजे एका महिन्याला किती बिल येणार.

कार्य.अभियंता (पापू) :त्यापेक्षा कमी खर्चात पाणी पडेल.

श्री~जगदीश सिध्द : परतवाडा येथे मिटर बसविलेले आहे. सकाळी व सायंकाळी दोन तास पाणी पुरवठयासाठी सहा महिन्याला 600 रूपये बिल येत होते.

कार्यकारी अभियंता(पा.पू) :परतवाडा येथील भौगोलिक परिस्थिती वेगळी आहे. 45 कि.मी. येथुन पाणी आणावे लागत आहे. 165 मिटर उंचीवर हे शहर आहे. याचा परिणाम होणार आहे. परतवाडा आणि औरंगाबादची तुलना कशी होऊ शकते.

श्री.रेणुकादास वैद्य :30-35 टक्के घरांना 1800 रू पेक्षा कमी पाणीपट्टी येणार दररोज पाणी देणार असे आताच म्हटले

कार्य.अभियंता(पापू) :जर 8 हजार लिटर आता पाणी वापरले तर कमी बील येईल जास्त वापरले तर जास्त येईल

श्री.जगदिश सिध्द :जर हे झालेच नाही तर. चार ड्रम पाणी भरले तर.

कार्यकारी अभियंता(पा.पू) :बिल कमी प्रमाणात येईल.

श्री.विजय वाघचौरे :जनतेने बिल न भरल्यास त्यावर व्याज आकारणी केली जाईल.

कार्यकारी अभियंता(पा.पू) :पाण्याची विभागणी सम प्रमाणात होणार आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :पान नंबर 11 भुसंपादनाचा विषय आहे भुसंपादनास 30 कोटी हवे भुसंपादन एकदम होणार नाही टप्प्या टप्प्याने करावे लागेल मागिल बैठकीत यावर चर्चा झाली होती हा ठराव येईपर्यत प्रशासनाने आजपर्यत काय कार्यवाही केली माहिती दयावी.

कार्यकारी अभियंता(पा.पू) :एकूण 38.50 किलोमीटर मध्ये भुसंपादन करायचे आहे 4.00 मीटरची रूंदी लागणार आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :एखादी इमारत पाडायची किंवा न पाडायची यासाठी कॅवेट दाखल करतो एवढा मोठा विषय असतांना कॅवेट का दाखल नाही.

कार्यकारी अभियंता(पा.पू) :13 नंबरच्या मध्ये 38.50 किलोमीटर एकूण भुसंपादन करायचे आहे त्यापैकी 32.50 कि.मी. च्या लांबीमध्ये संयुक्त मोजणी सर्वेक्षण झाले. यामध्ये सकारात्मक रितीने विचार करण्यात यावा. भूसंपादनामध्ये JMS चा महत्वपूर्ण टप्पा आहे. JMS च्या वेळेस बरेचसे Objection मिटू शकतात.संबधीताच्या म्हणण्यानुसार मार्केट रेट नुसार मोबदला मिळावा हेच त्यांचे म्हणणे आहे. मा.जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत त्यांनी सुचना केली होती आठ ते दहा कोटी रूपये जमा करावे ॲडव्हान्स मध्ये पजेशन मिळेल.

मा.आयुक्त :32.50 किलोमीटर लांबीचे JMS झालेले आहे. जिल्हाधिकारी यांचे समवेत दोन ते तीन वेळेस चर्चा झालेली आहे. प्रकल्प सुरू करण्यापुर्वी काही रक्कम भरावी लागणार आहे.ती भरणा केली की तातडीने पुढील कार्यवाही होईल तातडीने आणि Compulsory Acquisition बाबत चर्चा झालेली आहे. शक्य असेल तर खाजगी वाटाघाटीने प्रश्न सोडवता येईल.जास्त कालावधी जाणार नाही नागरीकांच्या मागणीनुसार मार्केटच्या रेटप्रमाणे रक्कम द्यावी त्यासंबधीत विचार सुरु आहे.कोर्टात कुणी गेले तर तेथेही आपल्याला आपली बाजू मांडता येईल स्कीम करणेही गरजेचे आहे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :महानगरपालिकेच्या वतीने कॅवेट दाखल करण्यात यावे.

श्री.मधुकर सावंत :एखादया जमिनीच्या बाबतीत कोणी कोर्टात गेले त्यांचे म्हणण्या प्रमाणे मोबदला दिला नाही काम करण्यास अडचण येईल अशा वेळी काय करणार आहे.

श्री.रेणुकादास वैद्य : न्यायालयीन प्रक्रीयेची सदर योजनेमध्ये अडचण येवू नये. कॅवेट दाखल करण्यात यावे.

मा.आयुक्त :सर्व स.सदस्यांच्या भावना रास्त आहे. विधीतज्ञाकडुन कायदेशिर सल्ला घेऊन तातडीने कॅवेट दाखल करण्याची कार्यवाही होईल.

मा.सभापती :आजच्या आज कॅवेट दाखल करावे.

श्री.रेणुकादास वैद्य :भुसंपादनासाठी 30 कोटी रकमेची तरतुद झालेली आहे का? तरतुद नसेल झाली तर काय उपाययोजना करणार आहे. जेणेकरून सदर योजनेमध्ये कुठलाही अडथळा निर्माण होणार नाही.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :यासाठी दोन स्वतंत्र अधिकारी नेमण्यात यावेत. या योजनेची माहीती त्या अधिका-यांनी मा.पदाधिकाऱ्यांना मा.आयुक्तांना दयावी भूसंपादनाची जबाबदारी त्यांचेवर देण्यात यावी.भविष्यात श्री.पानझडे म्हणतील हे काम माझेकडे नाही दोन वेगळे अधिकारी नेमावे

श्री.रेणुकादास वैद्य :वेगवेगळे दोन अधिकारी नेमावे भविष्यात ही माझी जबाबदारी नाही असे अधिकारी म्हणतील योजना मोठी आहे जशी योजना आहे त्याप्रमाणे त्यांचे अधिकार वेगवेगळे असतील.30 कोटी कसे उभे करणार खुलासा करावा.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :सहाय्यक संचालक नगररचना व श्री. झनझन हे वेगळे अधिकारी आहेत.अधिकाऱ्यांची नावाची घोषणा करण्यात येऊन त्यांचेवर जबाबदारी टाकण्यात यावी. कॅवेट ताबडतोब दाखल करण्यात यावे.

मा.आयुक्त :भूसंपादनाचा नविन स्वतंत्र कक्ष सुरू करणार आहे. याच कामासाठी स्वतंत्र भुंसपादन अधिकारी महसूल खात्याकडून म्हणजेच विभागीय आयुक्त आपण मागणी करतो आहे आपणांकडे कक्ष राहील.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :तरतुद काय आहे.

मा.आयुक्त : बाजार भावाच्या किंमत लक्षात घेता 30 कोटी रूपये दाखविण्यात आलेली आहे. भुसंपादनासाठी काही कालावधी लागल्यास खाजगी वाटाघाटीने नागरीक पुढे येत असतील आजचा बाजार भावानुसार 30 कोटी रूपये दाखविलेले आहे. भुसंपादन रेग्युलर करायचे म्हटले तर आज एवढया रकमेची गरज नाही. जिल्हाधिकारी यांचे समवेत झालेल्या चर्चेनुसार 65 कोटी रूपये भरून भुसंपादन करणार आहे. याची तरतुद आपल्या उत्पन्नातुन करणार आहेत.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :भुसंपादनाची कार्यवाही सक्त्ीने करायलाच हवी.

मा.आयुक्त :तातडीने भुसंपादन करायचे म्हटल्यास चार महिण्यात भुसंपादन होऊ शकते. जिल्हाधिकारी यांचे म्हणण्यानुार रक्कम भरून तातडीने भुसंपादन होऊ शकते.

श्री.रेणुकादास वैद्य :आपण जेवढे सीरीअस आहोत ते जिल्हाधिकारी राहतिलच असे नांही

श्री.अ.साजेद अ.सत्तार :खाजगी वाटाघाटीने लवकर प्रश्न मार्गी लागेल.

कार्यकारी अभियंता(पा.पू): भुसंपादनाच्या बाबतीमध्ये हा विषय अतिशय महत्वाचा यासाठी आहे जे कंन्सेशन ॲग्रीमेटन राहणार आहे ठेकेदाराबरोबर त्यामध्ये महत्वाची एक अट अशी आहे भुसंपादन दोन वर्षाच्या आत कुठल्याही परिस्थीतीत मी जसे वर्णन केले शेडयुल ए आणि बी प्रकारच्या जागा शेडयुल बी मधील जी जागा विहीत कालावधीत देऊ शकलो नाही तर पेनॉल्टी बसविण्याचे प्रोव्हिजन आहे. त्यासाठी फॉर्म्युला दिलेला आहे. उदा. 30 कोटी गुंतवणुक प्रोजेक्टमध्ये केलेली असेल आणि वेळेवर जमीन देऊ शकलो नाही. त्यास लॅन्ड डिलेव्हरी देऊ शकलो नाही. त्या केसमध्ये दोन ते सव्वादोन कोटींचा फाईन बसु शकतो.

श्री.विकास जैन :30 किलोमिटरचा जेएमएस झालेला आहे.

कार्यकारी अभियंता(पा.पू) :जे एमएस झालेले आहे. परंतु भुसंपादन होणे आवश्यक आहे. भुसंपादन झाले पाहिजे म्हणजे प्रोव्हिजन करणे आवश्यक आहे. जेएमएस झालेले आहे म्हणजे जागा ताब्यात आली आहे असे नाही जागा ताब्यात घेणे आणि ती हस्तांतरीत करणे ही वेगळी प्रक्रीया आहे.

श्री.विकास जैन : भुसंपादनासाठी खाजगी वाटाघाटीवर जास्त भर दिला पाहीजे.

कार्यकारी अभियंता(पा.पू):सदरचा विषय प्राधान्याने सोडविला पाहीजे. दोन वर्षांचा कालावधी ठेवण्यात आलेला आहे. सहा महिन्यांचा कालावधी झाल्यास काही कोटीं रूपये दंडापोटी कंत्राटदाराला द्यावे लागणार आहे. त्यासाठी प्राधान्याने हा प्रश्न सोडविला पाहीजे. अर्थसंल्पामध्ये जायकवाडी ते औरंगाबाद पर्यंत भुसंपादनासाठी स्वतंत्र अशी त्वरीत तरतुद करण्यात यावी.

मा.सभापती :13 व्या वित्त आयोगातुन जे चार रस्ते करणार आहे ते पैसे भुसंपादनासाठी 4 कोटी रूपये जिल्हाधिकारी कार्यालयात जमा करावे अर्थसंकल्पात फक्त जायकवाडी ते शहर भूसंपादनासाठी तरतुद करण्यात येईल.

श्री.विकास जैन :143 कोटी रूपये बँकेत एक वर्षापासून डिपॉझिट ठेवलेले आहे.किती इन्ट्रेस मिळालेला आहे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :भुसंपादनासाठी मा.आयुक्तांनी आदेश देण्यात यावे.

श्री.विकास जैन :आत्तापर्यंत व्याज किती मिळालेले आहे.

कार्यकारी अभियंता(पा.पू):10 ते 12 कोटी रूपये.

श्री.विकास जैन :त्याचा वापर कसा करणार आहे.

कार्यकारी अभियंता(पा.पू):प्रोजेक्टवर वापरणार आहे. भुसंपादनावर सदरील रक्कम वापरता येणार नाही.

श्री.विकास जैन :कन्स्ट्रक्शन साठी रक्कम वापरावे लागणार महापालिकेला 10-12 कोटीचा फायदा होणार आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :पान क्र.15 वर पहिल्या वर्षी 10 टक्के मिटर बसविणार दुस-या वर्षी 40 व तिस-या वर्षी 100 टक्के पहिल्या वर्षी ज्या भागात मीटर बसविणार त्यांना लोकांवर अन्याय व्हायला नको. त्यासाठी जो पर्यंत 100 टक्के मिटर बसत नाही तो पर्यंत जे 1800रू प्रमाणे पाणीपट्टी आकारण्यात यावी.

कार्य.अभियंता(पापू) :कोणत्या तरी भागापासून सुरूवात करावी लागणारच आहे सर्व मिटर बसविण्यासाठी तीन वर्षाचा कालावधी लागणार आहे.जर पहिले मिटर बसविलेले असेल तर त्याचा उपयोग काय?

श्री.रेणुकादास वैद्य :10 टक्के नागरीकांकडे मिटर बसविले जाणार आहे त्यांना मिटर प्रमाणे बिल भरावे लागणार आहे आणि उर्वरित 90 टक्के नागरीकांना फ्लॅटरेटने मुबलकपणे पाणी वापरायला मिळणार ही पध्दत कोणती..

कार्यकारी अभियंता(पा.पू):24 तास पाणी असणार नाही.कमीच पाणी असणार आहे.

श्री.रेणुकादास वैद्य : 10 टक्के लोकांना वेगळा न्याय व 90 टक्के लोकांना वेगळा न्याय. मिटर बसविण्याची कार्यवाही तेजीने करण्यात यावी ज्या वेळेस 100 टक्के मिटर बसवेल त्यावेळी मिटर प्रमाणे सर्वांना बिल आकारण्यात यावे

कार्यकारी अभियंता(पा.पू.):दिड लाख मिटर बसविण्यासाठी वेळ लागणार आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :सदरील काम हे एजन्सीचे आहे.

कार्यकारी अभियंता(पा.पू.):नॅचरल कालावधी द्यावा लागेल. नसता प्रोजेक्ट फेल होतात.

श्री.रेणुकादास वैद्य :सदरील विषय अतिशय महत्वाचा आहे. सर्वांना समान न्याय द्यावा लागणार आहे. एकाला एक न्याय व दुस-याला दुसरा न्याय हे योग्य नाही.

मा.सभापती :ज्या वार्डात अंतर्गत पाईपलाईन पहिले पुर्ण होईल तेथुन सुरूवात करता येईल.पाणी भरपूर येईल मीटर प्रमाणे बील येईल त्या नागरीकांना सुध्दा त्रास होणार नाही.

कार्य.अभियंता(पा.पू) : हे नक्कीच होऊ शकते.ज्या ठिकाणी आपले नेटवर्क सुधारेल त्याठिकाणी मीटर प्रमाणे पाणी येईल.

श्री.नासेर खान :आज काही भागात पाणी येत नाही तेथे पाईपलाईनही नाही त्यांना मुबलक पाणी येईल का

कार्यकारी अभियंता(पा.पू): सदरील प्रोजेक्टमध्ये 1289 किलोमिटर लाईन 4 इंच व्यासापासून टाकण्यात येणार आहे.

श्री.नासेर खान :झोपडपट्टी गुंठेवारी भाग यामध्ये लाईन नाही

कार्यकारी अभियंता :तेथे होईल

श्री..रेणुकादास वैद्य :पान क्रमांक 15 मध्ये बांधकाम आणि पुर्नवसन कालावधीत अदा करावयाचे देयक यामध्ये सेवा स्तर मानकांशी कुठलाही संबध न जोडता देयक देण्यात येईल.

कार्यकारी अभियंता(पा.पू):ही निवीदेची अटच होती. पहिले तीन वर्ष आपण त्यांना रिलेट करणार नाही. तीन वर्षानंतर प्रोजेक्ट पुर्ण होणार आहे. प्रोजेक्ट पुर्ण झाल्यावर त्यांचेकडुन अपेक्षा करू शकतो.

श्री.रेणुकादास वैद्य: :पहिल्या वर्षी काम करत असतांना जर त्यांचे कडून काम पूर्ण ज्ञाले नाही तर देयक देण्यात येतील हे कसे अपेक्षीत करणार आहोत.

कार्य.अभियंता (पापू) :4 ते 20 वर्ष मानक सेवा स्तर गरजा दिलेल्या आहेत.

श्री.रेणुकादास वैद्य :सेवास्तर मानक पुर्ण झाल्यास बील देणार असेल व तिन वर्षातच योजनेत गडबड झाली पाईप योग्य वापरले नाही लेवल बरोबर आली नाही , खोदाई बरोबर झाली नाही कनेक्शनमध्ये प्रॉब्लेम आला याची जबाबदारी कोण घेणार आहे.

कार्य.अभियंता(पापू) : 1 ते 6 पॅरामीटर्स आहेत कॉन्ट्रक्टवर जबाबदारी राहणार

मा.आयुक्त :बांधकाम व पुर्नवसन कालावधी अदा करावयाची अनिश्चित देयक खालील प्रमाणे राहील असे दिले सेवा स्तर मानकांशी कुठलाही संबध न जोडता असे पहिल्या वर्षी दिले आहे दुस-या वर्षापासून मात्र संगळयांशी संबध जोडलेले आहे

कार्यकारी अभियंता(पा.पू):पहिल्या तीन वर्षी लवचिक आहे. पहिल्या वर्षी कमीत कमी 135 लिटर पाणी दिले पाहीजे.

श्री.रेणुकादास वैद्य :पहिल्या वर्षीचा जो कालांतर आहे त्यास सेवा स्तर मानकांश लावणार नाही आणि त्यास बिल देणार आहे ते कितपत योग्य आहे. याचा खुलासा करण्यात यावा.

कार्य अभियंता(पा.पू). :देयक देणार म्हणजे आपली योजनाच ते चालविणार आहे जी योजना आहे ती तो चालविणार आहे.जवळपास 45-48 लक्ष रूपये खर्च जो आहे तो त्यास करावाच लागणार आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :आमचे सजेशन आहे की त्यांनी पहिल्या वर्षी सुध्दा सेवा स्तर मानकानुसार काम करावे जेणे करून काम योग्य होईल यात काहीही अडचण नाही हे ठेकेदारास सुध्दा मान्य असेल हे तर कुणीही मान्य करायला पाहिजे.पहिल्या वर्षीचा हा मेजर पिरेड आहे.

कार्यकारी अभियंता(पापू):श्री.दिवेकर ॲडव्हाएझर यांच्याशी चर्चा झाली आहे.पहिले वर्षी सिस्टीम लवचिक आहे. काम नाही केले काही चुका केल्यास कन्स्ट्रक्शन ग्रॅड रोखण्याची प्रोव्हीजन मनपाला आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :महानगरपालिकेचे त्यावर नियंत्रण हवे.

श्री.विकास जैन :1289 कि.मी.लाईन 11 टाक्या करणार म्हटले 70 टक्के शहरामध्ये लाईन अस्तित्वात आहे. 40-50 टक्के नवीन पाईप लाईन टाकण्यात आलेली आहे. लाईन टाकण्याचे नियोजन झाले का?

कार्यकारी अभियंता(पा.पू.):हैड्रॉलिक मॉडेल संबधी काम संबधीत एजन्सी करणार आहे. सदरील काम मोठयाप्रमाणात आहे. शहरात पी.व्ही.सी,एसी, आरसीसी लाईन आहेत. प्राधान्याने सदरील लाईन बदलणार आहे.

मा.सभापती :गळतीचे प्रमाण सध्या किती आहे.

कार्यकारी अभियंता : फीजीकल गळती धरत नाही कॅलक्युलेशन प्रमाणे नॉन रिव्हेन्यु वॉटर म्हणजे एक प्रकारे गळती असते. ज्याचे प्रत्यक्ष बिलींग करत नाही. असे पाणी त्याचे प्रमाण 50 टक्के आहे.

मा.सभापती :सदरील योजनेमध्ये किती गळती अपेक्षित आहे.

कार्यकारी अभियंता :यामध्ये दर्शिविलेले आहे.

मा.सभापती :गळतीचे प्रमाण वास्तवात किती असणार आहे.

कार्यकारी अभियंता :CPHEO प्रमाणे 15 टक्के गळती मान्य आहे. भारतामध्ये कुठल्याही शहरात 15 टक्के गळती झालेली नाही. 15 टक्के विषयी प्रीमिटींगमध्ये नेहमी वाद होत असे. थोडा रिलॅक्स करा परंतु आपण रिलॅक्स करू शकत नाही. भारत सरकारने घालुन दिलेले मानक आहे म्हणून 15 ठेवलेले आहे प्रॅक्टीकली शक्य झाले नाही तर 25 टक्के जे व्हेरीबल पेमेंन्ट आहे त्यामध्ये मार्कस् दिलेले आहे रक्कम कापण्यात येणार आहे.

श्री.विकास जैन :शहरात 1289 कि.मी. पाईपलाईन आहे किती कि.मीटर लाईन पडणे अपेक्षीत आहे कुठलेही डिझाईन झालेले नाही.

कार्यकारी अभियंता :हैड्रॉलिक मॉडल तयार झाल्यानंतर नविन वस्त्यांमध्ये नविन पाईप लाईन येणार आहे.

श्री.विकास जैन :अशा किती वस्त्या आहेत.शहरात लाईन मोठया प्रमाणात आहे

कार्यकारी अभियंता :30 टक्के शहरात पाईप लाईन नाही.

श्री.प्रल्हाद निमगांवकर :जुन्या लाईनचे काय करणार आहे.

कार्यकारी अभियंता :ज्या ठिकाणी एसी,पीव्हीसी,आरसीसी लाईन आहे त्यामध्ये करणार आहे.

श्री.विकास जैन :जिथे डि.आय आहे तीथे काय करणार.

कार्यकारी अभियंता :समजा 200 मी.मी. व्यासाची डिआय पाईप लाईन आहे. हैड्रॉलिक मॉडल प्रमाणे डी.आय. आवश्यक ते करण्यात येईल

श्री.विकास जैन :जुन्या पाईपलाईन काढणार आहे त्याचे काय करणार आहे.

कार्यकारी अभियंता :सेवास्तर गरजा लावण्यात आलेल्या आहे कंत्राटदाराची रिस्क आहे.

श्री.विकास जैन :200ची लाईन प्रपोझ केली तर आपली ऑलरेडी 200 ची डीआय पाईप लाईन आहे.

कार्यकारी अभियंता :त्याबाबतीत मनपाचे सक्तीचे व्हिझीलन्स असले पाहीजे.

मा.सभापती :शहरामध्ये गुंठेवारी भाग आहे.तेथे सुध्दा ही पाईपलाईन करणार आहे.

कार्यकारी अभियंता :गुंठेवारी भाग असेल तरीही लाईन टाकावी लागणार आहे.त्या भागातील नागरीकांनी रक्कम (टॅक्स) अदा करायची आहे.

मा.सभापती :जनता पैसे भरण्यास तयार आहे मुबलक पाणी दिले जावे.

श्री.नासेर खान :जो पर्यंत लाईन टाकून कनेक्शन दिले जाणार नाही. तो पर्यंत नविन मिटर दिले जाणार का?

कार्यकारी अभियंता :56 कोटीमध्ये फक्त मीटर बसविणेच नाही तर प्रत्येक घराला नविन कनेक्शन दिले जाणार आहे.

श्री.जगदिश सिध्द :नागरीकांना चार्जेबल आहे काय?

कार्यकारी अभियंता :नागरीकांना चार्जेबल आहे. त्या ठिकाणी विशिष्ट प्रकारचे पाईप व मीटर मनपाच्या नियंत्रणाखाली लावले जाणार आहे. मिटर आणि पाईप लाईनसाठी जेवढा खर्च आहे तेवढा खर्च द्यावा लागणार आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :ज्यांना लाईन बदलावी लागणार त्यांना भुर्दंड पडणार आहे काय?

कार्यकारी अभियंता :मोठा भुर्दंड पडणार आहे. घराच्या भागात लाईन आणुन देण्यात येणार आहे. त्यापुढील व्यवस्था स्वतः करायची. घरामध्ये मिटरबॉक्स असणार आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :परिशिष्ट क ग्राहकांची थकबाकी वसुल करण्यासाठी द्यावयाचे प्रोत्साहनपर रक्कम थकबाकी वसुलीची टक्केवारी तीन टप्प्यामध्ये करण्यात आलेली आहे. 0 ते 50 टक्के ही मनपाची स्थिती होती त्यात प्रोत्साहनपर देण्याची गरज नाही. 50-75 टक्के् व त्यापेक्षा जास्त आहे त्यावर प्रोत्साहनपर देण्यात यावे.

कार्यकारी अभियंता :पान क्र.18 वर आहे सध्या मनपाच्या वसुलीवर मनपाची यंत्रणा काम करते. कन्स्ट्रक्शन ॲग्रीमेंटनुसार संबधीतास पाणीपट्टीची रक्कम द्यावयाची आहे.महापालिकेने पाणीपट्टी वसुलीसाठी खर्च करायचा नाही. संबधीताने बिलींग, वसुली करण्यात यावी. मनपाची पाणीपट्टी वसुली समाधानकारक नाही. संबधीताने पाणीपट्टी वसुली ही स्वतःची यंत्रणा वापरून थकबाकी आणली तर वसुली चांगली होईल.जी वसुली होणार आहे ती त्यांनी यंत्रणेमार्फत करायची आहे वसुली ते करणार 85 टक्के वसुली मनपाची व 15 टक्के संबधीताची राहणार आहे.

श्री.विकास जैन :एखाद्या ग्राहकास पैसे देण्यास उशीर झाला तर काय कार्यवाही होणार आहे.

श्री.नासेर खान :ज्यांनी थकबाकी भरली नाही तर त्यांना कनेक्शन देणार नाही का?

कार्यकारी अभियंता(पापू) :वॉटर बायलॉज सर्वसाधारण सभेची मंजूरी घेतल्यानंतर शासनाची मंजूरी घेणार आहे.कन्सेशन ॲग्रीमेंन्ट होण्यापूर्वी वॉटर बायलॉजचे 90 टक्के काम झालेले आहे. वॉटर बायलॉजमध्ये सर्व बाबींचा उल्लेख केलेला आहे.

श्री.विकास जैन :भविष्यात नागरीकातर्फे स.सदस्य बोलतील त्यांचेत व प्रशासनामध्ये वाद होवू नये .

कार्यकारी अभियंता :वॉटर बायलॉजचे काम 90 टक्के पुर्ण झालेले आहे पुढील सर्वसाधारण सभेपुढे वॉटर बायलॉज सादर करणार आहे. वॉटर बायलॉज झाल्याशिवाय कन्स्ट्रक्शन ॲग्रीमेंट करता येणार नाही. कुणावर कायदेशीर कार्यवाही करता येणार नाही.

श्री.विकास जैन :संपुर्ण प्रोजेक्टवर नियंत्रण कुणाचे राहणार आहे.

कार्यकारी अभियंता :संपुर्ण प्रोजेक्टमध्ये स्वतंत्र अभियंता ही संस्था आहे. ती एक अथॉरिटी असणार आहे आणि महानगरपालिकेचे संपुर्ण नियंत्रण त्यावर असणार आहे. लवादाकडे केव्हा जाणार जेव्हा मनपा आणि संबधीमध्ये वाद होईल तेव्हा स्वतंत्र अभियंता ही निर्णय देईल जेव्हा दोघांना ती मान्य नसेल तेव्हा लवादाकडे जाण्याचे प्रावधान या करारामध्ये आहे. लवाद कसा नेमायचा हे ही दिलेले आहे. तीन लोकांचे पॅनल असणार आहे. पहिला महानगरपालिकेचा चॉईसचा नेमेल दुसरा सदस्य कंत्राटदाराच्या चॉईसचा व तीसरा सदस्य मनपा आणि कंत्राटदार यांच्या संमतीने निवडेल.

श्री.विकास जैन :महापालिकेचा म्हणजे प्रशासनाचे राहतील का ?

कार्य.अभियंता(पापू) :कुणाला नेमायचा हा आपला अधिकार आहे.

श्री.अमित भुईगळ :अधिका-यामधून नेमायचे झाल्या शहर अभियंता यांचा समावेश करावा त्यानंतर सभेपुढे आल्याशिवाय ते नाव प्रशासनाने कमी करू नये. स्थायी समिती सर्वसाधारण सभेशिवाय काढू नये.

मा.सभापती :शहर अभियंता हे यात असणारच आहे. असणार आहे की, नाही याचा खुलासा करण्यात यावा.

कार्यकारी अभियंता :जी टेक्निकल विंग आहे त्यात शहर अभियंता हे प्रमुख आहेत. त्यामुळे हा प्रकल्प शहर अभियंता यांच्या मार्गदर्शनाखाली पुर्णत्वास येणार आहे.

मा.सभापती :माजी आयुक्तांनी AMT मध्ये संबधीत समोरच्या व्यक्तीस अधिकचे अधिकार दिलेत. त्यानंतर ही सिस्टीम बिघडली. तसे या सिस्टीममध्ये होऊ नये. काही बदल करायचा असल्यास सर्वोच्च सभागृहापुढे आणण्यात यावे. स्थायी समितीपुढे आल्याशिवाय कुठलाही बदल करण्यात येऊ नये.

कार्य.अभियंता(पापू) :मुळात कन्सेशन ॲग्रीमेंन्टमध्ये कुणालाच बदल करता येत नाही.पब्लीक डाकूमेंन्ट आहे

श्री.मधुकर सावंत :कन्सेशन ॲग्रीमेंटवर दोन स्थायी समितीच्या सदस्याच्या स्वाक्षरी असावी. ते दोन सदस्य कोण हे आत्ताच घोषित करावे.

मा.सभापती :कन्सेशन ॲग्रीमेंट मध्ये नंतर बदल करता येणार नाही ज्याप्रमाणे एमटीचे झाले आहे तसे होता कामा नये. यामध्ये काम करणाऱ्या कोणत्याही अधिकाऱ्याने परस्पर निर्णय घेऊ नये.

कार्यकारी अभियंता :कन्सेशन ॲग्रीमेंट स्वाक्षरी झाल्यास नंतर निर्णय घेता येत नाही. ते पब्लिक डॉक्युमेंट म्हणुन इंटरनेटवर प्रकाशित करणार आहे.

मा.सभापती :सभागृहाच्या वतीने मा.आयुक्तांना विनंती करण्यात येते की, कार्यकारी अभियंता श्री.पानझडे यांना या प्रकल्पाची पुर्ण माहीती झालेली आहे. त्यामुळे त्यांचे अभिनंदन करून त्यांना हया प्रोजेक्टपासून बाजुला करण्यात येऊ नये. परिपुर्ण माहीती असलेल्या अधिकाऱ्यास प्रोजेक्ट पासून दुर केल्यास याचा विपरीत परिणाम प्रोजेक्टवर होणार आहे. त्यामुळे शेवटपर्यत त्यांना ठेवण्यात यावे. गरज भासल्यास दुसरा अधिकारी सपोर्टेड म्हणुन ठेवण्यात यावा.

श्री.विकास जैन :पत्राच्या माध्यमातुन दोन स्थायी समितीच्या सदस्यांचे नांवे मा.आयुक्तांना कळविण्यात यावे. मा.सभापती यांचाही यामध्ये सहभाग राहीला पाहिजे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :मा.सभापती यांच्या अधिकारातील प्रश्न आहे कोणत्या सदस्यांना घ्यावे हे त्यांनी त्यांच्या अधिकारात ठरवावे.

श्री.विकास जैन :मा.सभापती तसेच दोन स.सदस्य व दोन पेक्षा अधिक सदस्यांचा समावेश असेल तर त्यांचा समावेश मा.सभापतीचा करण्यात यावा.

कार्यकारी अभियंता(पापू) :लवाद नेमण्याचे नियम आहेत त्याप्रमाणे कार्यवाही करणार आहे. लवाद मंडळ नेमण्याच्या ॲक्टनुसार करारामध्ये समावेश केलेला आहे. त्यानुसार लवाद नेमण्यात येणार आहे. तीन लोकांचे पॅनल/मंडळ असणार आहे. पहिला महानगरपालिकेचा चॉईसचा नेमेल दुसरा सदस्य कंत्राटदाराच्या चॉईसचा व तीसरा सदस्य मनपा आणि कंत्राटदार यांच्या संमतीने निवडेल. त्यांच्यापुढे ती केस जाणार आहे. लवादच्या ॲक्टनुसार हे सर्व होणार आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :1300 कि.मि.ची नविन पाईप लाईन टाकणार आहे. नागरीकांकडून सध्या 1800 रूपये पाणीपट्टी घेण्यात येत आहे. तीन वर्षानंतर बीलाची आकारणी करणार आहोत. त्यातील 40 ते 45 टक्के नागरीकांना 1800 पेक्षा कमी रक्कम पडणार आहेत. एक दिवसाआड पाणी नागरीकांना दिले जाते ती अडचण दुर होणार आहे. रोज पाणी नागरीकांना मिळणार आहे. गुंठेवारी/स्लम भागातील जनतेला लाईनचा व पाण्याचा प्रश्न सुटणार आहे. नविन कनेक्शन संबधीत एजन्सी नागरीकांच्या दरवाजापर्यंत देणार आहेत. म्हणून ही योजना अतिशय चांगल्या पध्दतीची आहे. ही योजना मंजूर व्हावी म्हणून शिवसेना,भाजपा युतीने वचननाम्यामध्ये याचा उल्लेख केला होता. माझी विनंती आहे की, प्रशासनाने ज्या गोष्टी सांगीतल्या त्या पध्दतीने नागरीकांचे समाधान होईल या प्रकारची योजना असल्यामुळे यास मंजूरी देण्यास हरकत नाही.

श्री.विकास जैन :शहर हे टॅंकरमुक्त होणार आहे हे निश्चित. सदरील शहर हे महाराष्ट्रातील पहिले टॅंकरमुक्त शहर राहणार आहे.

कार्यकारी अभियंता(पापू) :काही दिवशी समस्या उद्‌भवल्यास अपवादात्मक स्थितीत टॅंकरची गरज पडणार आहे.

श्री.महेश माळवतकर :गेल्या बऱ्याच वेळा पासून समांतर जलवाहीनीवर चर्चा करण्यात येत आहे. कार्यकारी अभियंता यांनी या संदर्भांत योग्य ते मार्गदर्शन केलेले आहे. नागरीकांना कमी दरात पाणी मिळणार आहे तसेच ज्या नागरीकांना

पाण्याची लाईन नव्हती पाणी मिळत नव्हते त्यांना देखील पाणी मिळणार आहे. सदरील योजना पुर्णत्वास करण्याकरीता जे प्रयत्न केलेत त्याबद्दल मा.सभापती यांचे अभिनंदन करण्यात येते.

श्री.रेणुकादास वैद्य :कार्यकारी अभियंता श्री.पानझडे यांनी वर्षेभरापासून सदर योजनेसाठी काम केलेले आहे. त्यांचे मा.आयूक्त यांचे मन:पुर्वक अभिनंदनाचा ठराव पारित करण्यात यावा.

श्री.विकास जैन : मा.आयुक्तांचेही अभिनंदन करण्यात यावे. तसेच या योजने संबधी मा.खासदार श्री.चंद्रकांत खैरे, केंद्रीय मंत्री श्री.शरद पवार, तसेच ज्यांनी या योजनेसाठी निधी आणण्यास सहकार्य केले त्या सर्वांचे अभिनंदन करण्यात यावे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :मा.सभापतींना अधिकार द्यावेत.

श्री.मधुकर सावंत :या योजनेमुळे शहर टँकरमुक्त होणार आहे.गुंठेवारी भागातही मुबलक पाणी मिळणार आहे नियमित पाणीपुरवठा होणार आहे. त्यामुळे सदरील विषय सभागृहाने मंजूर करावा.

श्री.विकास जैन :ज्यांचे अभिनंदन केले त्यांना तसे लेखी पत्राद्वारे कळविण्यात यावे.

मा.सभापती :सर्वांचे अभिनंदन करण्यात येते. तसेच सर्व स.सदस्यांचेही अभिनंदन करण्यात येते. आपल्या सर्वांच्या कार्यकाळात सदर योजना मार्गी लागत आहे. जनतेचे पाण्यामुळे हाल होत होते. समांतर जलवाहीनीच्या माध्यमातुन गुंठेवारी/स्लम तसेच शहरातील जनतेला नियमित 24 तास स्वच्छ पाणी पुरवठा होणार आहे. सन 2001 पासून शहराला एक दिवसाआड पाणी देण्यात येते व पाणीपट्टी ही पुर्ण वर्षेभराची वसुली करण्यात येते. येत्या तीन वर्षांत 24 तास शहराला पाणी मिळणार आहे. सदरील ऐतिहासिक प्रस्ताव जागतीक स्तरावरचा आहे सदरील ऐतिहासिक दिनी ऐतिहासिक ठराव मंजूर करतांना आनंद होत आहे. सर्व स.सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन त्यांच्या मंजूरीनुसार सदरील ठराव मंजूर करण्यात येतो.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार, औरंगाबाद शहराची समांतर पाणी पुरवठा योजना पीपीपी तत्वावर राबविण्याच्या निविदा कार्यवाही अंतर्गत प्राप्त दोन निविदांपैकी कमी दर असलेले निविदाधारक Subhash Project Marketing Limited (SPML) यांना संपुर्ण २० वर्षाच्या Concession Period करीता Concessionaire (विकासक) म्हणुन नेमण्यास मान्यता देण्यात येते. उपरोक्त प्रस्तावातील योजनेच्या ठळक बाबीं अंतर्गत मुद्दा क्र.१ ते १६ मध्ये सविस्तर दर्शविल्याप्रमाणे कार्यवाहीस मान्यता देण्यात येते. या अंतर्गत निविदा अटी व शर्ती नुसार पुढील २० वर्षा करीता अंतिम केलेल्या पाणी पट्टीच्या दराने Appointed date पासून पुढे पाणीपट्टीची रक्कम वसुल करण्यास मान्यता देण्यात येते. या वाढीव दराने पाणीपट्टीची वसुली विकासकास महानगरपालिकेने जर करु दिली नाही तर निविदा अटी व शर्तीनुसार पाणीपट्टीच्या फरकाची रक्कम स्वत:च्या मिळकती मधुन महानगरपालिकेला विकासकासाठी उघडलेल्या Collection Account मध्ये भरावी लागेल. अग्निशमन सेवा वगळता इतर कोणत्याही कारणासाठी, कोणत्याही संस्था, व्यक्ति यांना नि:शुल्क पाणी पुरवठा करता येणार नाही. जर महानगरपालिकेच्या

आदेशानुसार असा नि:शुल्क पाणी पुरवठा विकासकास करावा लागला तर अशा पाणी पुरवठ्याचे देयक त्या वेळेच्या प्रचलित दरानुसार महानगरपालिकेने विकासकास देणे लागेल. या कार्यवाहीस ही सभा मान्यता देत आहे. या प्रकरणी Annual Operational Support Grant (AOSG) म्हणुन पहिल्या वर्षाकरीता रक्कम रुपये ६३ कोटी तसेच पुढील उर्वरित Concession Period करीता या AOSG च्या रक्कमेवर दरवर्षी ६% दराने होणाऱ्या वाढीस (Escalation) मान्यता देण्यात येते. या कामासाठी लागणारी पहिल्या वर्षा करीता रु. ६३ कोटी + रु. ९४.५० कोटी Water Payment Reserve Account करिता सुरक्षा रक्कम म्हणून ठेवावयाची रक्कम अशी एकुण रु.१५७.५० कोटी रक्कमेची तरतुद महानगरपालिकेच्या इतर उत्पन्नातुन या प्रकल्पा करीता अर्थसंकल्पात प्राधान्याने करावी. पाणी पुरवठयाची भांडवली खर्चाची कोणतीही कामे यापुढे प्रस्तावीत करु नयेत. पाणी पुरवठा विभागाच्या ज्या कामांचे कार्यादेश अद्याप झालेले नाहीत अशी सर्व कामे रद्द करावीत. निविदेच्या अटी व शर्तीनुसार Collection Account, Water Payment Account, Water Payment Reserve Account तसेच Independent Engineer आणि Independent Auditor यांच्या वार्षीक देयकांची रक्कम जमा करण्यासाठी वेगवेगळी स्वतंत्र बँक खाती उघडण्यास मान्यता देण्यात येते. या संबंधी बँकेत स्वतंत्र खाते उघडण्याची कार्यालयीन कार्यवाही लेखा विभागाने १५ दिवसांचे आत करावी. निविदा अटी व शर्तीनुसार Independent Engineer करीता बांधकाम कालावधी मध्ये २.३५% of Project Cost + Service Tax आणि संचलन /देखभाल दुरुस्ती कालावधीमध्ये ०.२५% of Project Cost + Service Tax तसेच Independent Auditor करीता संपुर्ण Concession Period मध्ये ०.१०% of Project Cost + Service Tax याप्रमाणे वार्षिक देयकांच्या ज्या रक्कमा असतील त्या रकमांच्या ५०% रक्कम महानगरपालिकेने Independent Engineer आणि Independent Auditor यांना द्यावयाची आहे. त्यामुळे प्रत्येक आर्थिक वर्षाच्या सुरुवातीला सदर रक्कम स्वतंत्र संयुक्त बँक खात्यामध्ये जमा करावयाच्या कार्यवाहीस मान्यता देण्यात येते. या संबंधीची कार्यवाही लेखा विभागाने प्राधान्याने व तातडीने दरवर्षी आर्थिक वर्षाच्या पहिल्या महिन्यात करत जावी. महानगरपालिकेस केंद्र शासन तसेच राज्य शासन यांचे कडुन मिळणारे प्रकल्प अनुदानाची रु.३९९.५३ कोटी ही रक्कम बांधकाम कालावधीमध्ये टप्प्याटप्प्याने Project Grant म्हणुन Concessionaire ला देण्यास आणि रुपये ७९२.२० कोटींचा हा प्रकल्प Concessionaire SPML यांचेतर्फे Public Private Partnership या तत्वावर उभारणी करणेस मान्यता देण्यात येते. तसेच Concessionaire यांना औरंगाबाद शहर पाणी पुरवठयाचे संपुर्ण Assets २० वर्षां करीता (Concession Period) हस्तांतरीत करण्यास मान्यता देण्यात येते. Appointed Date च्या आधीची थकीत पाणीपट्टीची रक्कम (Arrears) निविदा अटी व शर्तीनुसार विकासकाला Incentive देऊन विकासका मार्फत वसुली करण्याच्या कार्यवाहीस ही सभा मान्यता देत आहे. विद्युत देयकामध्ये दरवर्षी १०% वाढ व पाटबंधारे खात्याला द्यावयाच्या पाणी खरेदी देयकामध्ये दरवर्षी १५% वाढ होईल असे निविदेमध्ये गृहीत धरलेले असुन ही वाढीव रक्कम विकासकानेच भरणे बंधनकारक आहे. जर या पेक्षा अधिक दर (१०% आणि १५% पेक्षा जास्त) वाढल्यास त्यावरील फरकाची रक्कम महानगरपालिकेला भरावी लागणार असुन या भविष्यातील वाढीव रक्कम भरणेच्या कार्यवाहीस मान्यता देण्यात येते. जर शासनाकडुन मिळणारे प्रकल्पाचे अनुदान काही कारणांमुळे उशीरा प्राप्त झाले व Project Milestone नुसार Project Grant देण्यास महानगरपालिकेतर्फे उशीर झाला तर अशा परिस्थितीमध्ये विकासक प्रकल्पासाठी स्वत: रक्कम उभारेल व प्रकल्पाच्या कामांमध्ये खंड पडू देणार नाही याची दक्षता घेईल. विकासकाने उभारलेल्या अशा रकमेसाठी उशीर झालेल्या कालावधीसाठी विकासकास १५% व्याज देणे महानगरपालिकेला बंधनकारक राहील. यास ही

सभा मान्यता देत आहे. एखाद्या परिस्थितीमध्ये शासनाकडुन पुढील अनुदान मिळाले नाही तर ही रक्कम विकासक स्वत: उभारेल. अशा रक्कमेची परतफेड करण्यासाठी महानगरपालिका विकासकाला प्रत्यक्ष ही रक्कम देईल किंवा या रक्कमेपोटी भरपाई म्हणून पाणीपट्टीचे दर वाढवुन देईल किंवा Concession Period वाढवुन देईल. मात्र वाढीव Concession Period हा जास्तीत जास्त दहा वर्षापेक्षा अधिक असणार नाही. विद्युत देयक कृषीदराने आकारणेसंबंधी शासनाशी पत्रव्यवहार सुरु असून भविष्यात शासनाने त्यास मान्यता दिल्यास विद्युत देयकाच्या फरकाची रक्कम विकासकाने महानगरपालिकेस द्यावी. त्याचप्रमाणे केंद्र शासन/राज्य शासन किंवा वित्त आयोगाकडून वेळोवेळी भविष्यात प्राप्त होणारे अनुदान या प्रकल्पासाठी महानगरपालिकेचा हिस्सा (Contribution) म्हणून वापरण्यास किंवा AOSG ची रक्कम मनपा तर्फे Concessionaire ला देण्यासाठी वापरता येईल. अशा कार्यवाहीसही ही सभा मान्यता देत आहे. या निविदे मध्ये समाविष्ट असलेल्या कामांव्यतीरीक्त Additional Work करणे आवश्यक असेल आणि हे Additional work करणे विकासकास भाग पडले तर महानगरपालिका आयुक्तांच्या मान्यतेने विकासक Change in Scope नुसार असे काम करु शकतो. अशा कामांसाठी येणारा खर्च निविदा अटी व शर्तीनुसार महानगरपालिकेने त्या त्या वर्षीच्या दरसुची नुसार / बाजार भावानुसार (ज्या बाबी दरसुची मध्ये समाविष्ट नसतील त्या बाबींसाठी) विकासकाला देणे बंधनकारक असून यास ही सभा मान्यता देत आहे. तीन वर्षाच्या बांधकाम कालावधीमध्ये विकासकाला १२ Milestone मध्ये प्रकल्पाचे बांधकाम पूर्ण करावयाचे आहे. जर निविदा अटी व शर्तीनुसार एखाद्या Milestone अंतर्गत नमुद कामे पूर्ण झाली नाहीत तर महानगरपालिका विकासकाला अशी कामे पूर्ण करण्याकरीता ९० दिवसाचा कालावधी देईल. जर या ९० दिवसाच्या कालावधीमध्ये विकासक काम पूर्ण करण्यास असमर्थ ठरला तर महानगरपालिका सुरक्षा रक्कमेच्या १% इतकी रक्कम किंवा त्याचा भाग दर आठवड्याला दंड म्हणुन कपात करेल. अशा कारणांमुळे जर विकासक ३ वर्षामध्ये बांधकाम पूर्ण करुन नविन योजना कार्यान्वीत करु शकला नाही तर महानगरपालिका सुरक्षा रक्कमेतून १% किंवा त्याचा भाग प्रति आठवडा यानुसार जास्तीत जास्त १०% पर्यंत रक्कम कपात करेल. निविदा अटी व शर्तीनुसार या कार्यवाहीस ही सभा मान्यता देत आहे. निविदेच्या अटी व शर्तीनुसार IIPDF योजनेची केंद्र शासनाला द्यावयाची रक्कम रुपये ९२,०४,०००/- आणि महाराष्ट्र जीवन प्राधिकरण पुणे यांना प्रकल्प मुल्यांकन तपासणी पोटी शुल्क रुपये ८२,४६,०००/- द्यावयाचे असून याप्रमाणे एकुण रक्कम रुपये १,७४,५०,०००/- Concessionaire कडुन महानगरपालिकेत जमा झाल्यानंतर त्या-त्या शासकीय यंत्रणेस परत करण्यासही ही सभा मान्यता देत आहे. विकासक बांधकाम कालावधीमध्ये शहरातील अस्तित्वातील सर्व ग्राहकांच्या नळजोडण्या Medium Density Poly Ethelene (MDPE) पाईपने बदलणार आहे आणि नविन जोडण्या देणार आहे तसेच प्रत्येक नळजोडणीला स्वतंत्र जलमापक यंत्र (Consumer Meter) बसविणार आहे. योजना कार्यान्वीत झाल्यानंतर सदरचा खर्च विकासक ग्राहकांकडुन पुढील पाच वर्षांमध्ये समान हप्त्यात वसुल करणार आहे. या कार्यवाहीस ही सभा मान्यता देत आहे. तसेच जलमापक यंत्राचे आयुष्यमान संपल्यानंतर संबंधीत ग्राहकांना स्वखर्चाने जलमापक यंत्र लावावे लागणार आहे. जलमापक यंत्राचा कालावधी निश्चित करावा व या कालावधीत तांत्रिक बिघाड झाल्यास विकासकाने विनामुल्य दुरुस्ती करावी किंवा जलमापक यंत्र बदलून द्यावे. नागरीकांना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही याची दक्षता घ्यावी. तसेच हायड्रॉलीक प्रेशरने ७ मीटर (२२ फुट) उंचीपर्यंत योग्य दाबाने पाणी पुरवठा करणे विकासकास बंधनकारक राहिल. त्यासही ही सभा मान्यता देत आहे. केंद्र शासनाच्या UIDSSMT योजने अंतर्गत महानगरपालिकेने शासना सोबत करारनामा केलेला असून शासनाच्या मार्गदर्शक सुचना व अटी - शर्तीनुसार महानगरपालिकेस विविध सुधारणा (Reforms)

राबविणे बंधनकारक असून या सुधारणा महानगरपालिकेने प्राधान्याने राबवाव्यात. सुधारणा राबविण्यासाठी आवश्यकतेनुसार अर्थसंकल्पात तरतुद करावी. या सुधारणा राबविण्यासाठी उप-आयुक्त दर्जाच्या एका स्वतंत्र अधिकाऱ्याची नेमणुक करण्यात यावी. यासाठी नेमणुक झालेल्या अधिकाऱ्याने इतर संबंधीत सर्व विभागांशी योग्य समन्वय ठेऊन सुधारणा राबविण्याची अंमलबजावणी करावी. त्यासाठी महापालिका आयुक्तांनी दर पंधरा दिवसांनी स्वत: आढावा घेत जावा आणि दर तीन महिन्यांनी प्रगती अहवाल स्थायी समिती सभेला सादर करीत जावा. निविदा अटी व शर्ती नुसार वितरण व्यवस्थेमध्ये फक्त DI पाईप ऐवजी Combination of HDPE + DI Pipe वापरण्यास "केंद्र व राज्य शासनाकडुन आवश्यक ती मान्यता प्राप्त करणे, अशा बदलामुळे महानगरपालिकेस कोणताही आर्थिक भार सोसावा न लागणे, विकासकाने द्यावयाच्या सेवा सुविधांचा स्तर हा Service Level Requirment नुसार असणे आणि शासनाने अशा बदलास मान्यता न दिल्यास वितरण व्यवस्थेत फक्त DI पाईप वापरणे" अशा अटींवर विकासकास वितरण वाहिन्या टाकणेस मुभा देण्यात आलेली असुन या कार्यवाहीसही ही सभा मान्यता देत आहे. भुसंपादनासाठी आवश्यक असलेल्या रकमेची तरतुद अर्थसंकल्पात प्राधान्याने ठेऊन भुसंपादन कार्यवाहीस गती देणे व जलवाहिनी टाकण्यासाठी जागा ताब्यात घेण्याच्या कार्यवाहीसही ही सभा मान्यता देत आहे. भुसंपादनासाठी आवश्यक अशी जितकी काही रक्कम लागणार आहे त्या रकमेपैकी भागश: रक्कम म्हणून रुपये ५ कोटी तातडीने जिल्हाधिकारी औरंगाबाद यांच्याकडे जमा करण्यास मान्यता देण्यात येते. लेखा विभागाने या संबंधी तातडीने कार्यवाही करावी. सदर भुसंपादनाचे काम अतिशय महत्वाचे असून जर वेळेच्या आत भुसंपादन झाले नाही आणि त्यामुळे निविदा अटी-शर्तींप्रमाणे महानगरपालिकेतर्फे विकासकास Penalty म्हणून काही रक्कम द्यावी लागल्यास महानगरपालिकेचे मोठे आर्थिक नुकसान होऊ शकते; म्हणून भुसंपादनाच्या या कामासाठी महापालिका प्रशासनाने विशेष भुसंपादन अधिकाऱ्याची नेमणुक करावी. त्यास्तव शासनाकडे त्वरीत पाठपुरावा करावा. वित्तीय संस्थांकडुन या पीपीपी प्रकल्पासाठी विकासकास कर्ज मिळणेसाठी (Project Bankable होण्यासाठी) महानगरपालिकेच्या हितास बाधा न पोहचु देता Concession Agreement मध्ये काही फेरबदल / सुधारणा करावयाच्या असल्यास त्यासाठी आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद यांना प्राधिकृत करण्यात येते. केंद्र शासनाच्या Department of Economical Affairs and Asian Development Bank यांच्या संयुक्त विद्यमाने नेमण्यात आलेल्या क्रिसील या संस्थेच्या मदतीने Concession Agreement Bankable होणेसाठी प्रशासनाने कार्यवाही करावी. तथापी या फेरबदलासाठी स्थायी समितीची मान्यता घ्यावी लागेल. तसेच या प्रकल्पासंबंधी राज्य शासन, केंद्र शासन, वित्तीय संस्था किंवा कोणत्याही सरकारी यंत्रणेकडे पाठपुरावा करणे, निधी प्राप्त करणे, प्रकल्प यशस्वी होण्याकरीता तसेच प्रकल्प सुस्थितीत, विना अडथळा सुरु राहण्यास, यशस्वीरित्या प्रकल्प पुर्णत्वाकडे जाण्यासाठी वगैरे कार्यवाही करणेसाठी आणि Concession Period दरम्यान योग्य ते कालानुरुप व परिस्थितीजन्य निर्णय महानगरपालिकेच्या हितास बाधा न येऊ देता घेण्यासाठी आयुक्त, औरंगाबाद महानगरपालिका यांना प्राधिकृत करण्यासही ही सभा मान्यता देत आहे. सदर प्रकल्प हा अतिविशिष्ट व शहराच्या भवितव्याच्या दृष्टीने ऐतिहासिक ठरणारा असल्यामुळे अशा महत्वाच्या प्रकल्पाचे Concession Agreement व्यवस्थित व्हावे याकरिता Concession Agreement करते वेळेस स्थायी समितीचे दोन सदस्य व सभापती, स्थायी समिती श्री.राजू शिंदे यांची साक्षीदार म्हणून स्वाक्षरी घेणे बंधनकारक राहील. कार्यकारी अभियंता श्री.पानझडे यांनी स्थायी समितीमध्ये सदर प्रकल्पाची व्यवस्थित व समाधानकारक माहिती सादर केली. सदस्यांनी उपस्थित केलेल्या सर्व शंकांचे निरसन त्यांनी समाधानकारकरित्या केले. या प्रकल्पाचा अभ्यास त्यांनी व त्यांचे सहकारी श्री.फालक

यांनी उत्कृष्टरित्या केल्याचे दिसून येत आहे. या सभागृहातर्फे श्री.पानझडे व श्री.फालक यांचे अभिनंदन करण्यात येते. सदर प्रकल्प उभारणीसाठी सुरुवातीपासून कार्यकारी अभियंता श्री.एस.डी.पानझडे आणि श्री.के.एम.फालक (प्रभारी उप-अभियंता) यांनी परिश्रम घेतले आहेत. या प्रकल्पाबाबत त्यांना आता संपूर्ण माहिती झालेली आहे. त्यामुळे इत:पर हा प्रकल्प पुर्ण होईपर्यंत या दोन्ही अभियंत्यांची बदली इतरत्र करु नये. त्यांनी ह्या प्रकल्पाचे काम सदर प्रकल्प पूर्णत्वास जाईपर्यंत पहावे. या अभियंत्यांची बदली या प्रकल्पावरुन इतरत्र करावयाची झाल्यास त्यासाठी सर्वसाधारण सभा आणि स्थायी समितीची मान्यता घेणे बंधनकारक राहिल. तांत्रिक विभागाचे प्रमुख म्हणुन या प्रकल्पाच्या तांत्रिक बाबींची जबाबदारी शहर अभियंता यांचेवर राहील.

Concession Period च्या २० (वीस) वर्षांमध्ये प्रत्येक वर्षी द्यावयाची Annual Operational Support Grant (AOSG) ची रक्कम, Water Payment Reserve Account मध्ये त्या त्या वर्षी Security म्हणुन जमा ठेवावयाची रक्कम आणि स्वतंत्र अभियंता व स्वतंत्र लेखा परिक्षक यांच्या त्या त्या वर्षाची देयकांची रक्कम इत्यादी देय असलेल्या अशा सर्व देयकांकरीता रकमेची तरतुद पुढील २० वर्षांपर्यंत (Concession Period) त्या त्या वर्षी महानगरपालिकेच्या इतर वार्षीक उत्पन्नांच्या स्त्रोतांमधुन या प्रकल्पा करीता दरवर्षी प्राधान्याने अर्थसंकल्पात करीत जावी. यासाठी महापालिका आयुक्त आणि लेखा विभागाने विशेष दक्षता घ्यावी. Annual Operational Support Grant (AOSG) च्या रकमेची तरतुद करुन झाल्यानंतर उर्वरित तरतुद/रकमेतुन करीत जावी. या संबंधी पुढील कार्यवाही आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांनी करावी. या संबंधी तसेच उपरोक्त प्रमाणे ज्या-ज्या अधिकाऱ्यांवर हा प्रकल्प यशस्वी होणेसंबंधी जबाबदारी सोपविली आहे त्या संबंधीचे स्थायी आदेश (Standing Orders) आयुक्त, महानगरपालिका यांनी निर्गमित करावेत. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**चर्चा :**

श्री.जगदिश सिद्ध :विषय पत्रिकेवरील इतर विषय मंजूर करावे.

श्री.विकास जैन :विषय मंजूर करण्यात यावे.

**विषय क्र. 214 :** (दि. 14/03/2011 रोजीच्या सभेतील स्थगित करण्यात आलेला विषय क्र. 174)

कार्यकारी अभियंता (वार्ड ब आणि क) यांनी प्रस्ताव सादर करीत आहे की, वार्ड क्र.2 अंतर्गत येणाऱ्या पिसादेवी रोडवरील सुखना नदीपर्यंत ड्रेनेज लाईन टाकणे या कामाचे रू.19,39,953/- चे अंदाजपत्रकास मान्यता होऊन कामाच्या निविदा मागविण्यात आल्या असता एकूण दोन (2) निविदा प्राप्त झाल्या प्राप्त निविदापैकी सर्वात कमी दराची निविदा ही शेख कन्स्ट्रक्शन यांची असून ती अ.प. दरापेक्षा 4.5% जास्त दराची आहे. त्यावर मा.आयुक्त महोदय यांनी सदरील कामास अंदाजपत्रकीय दराने मान्यता देऊन मा.स्थायी समिती समोर मान्यतेस्तव सादर करण्यासाठी शिफारस केली आहे.

तथापी शेख कन्स्ट्रक्शन यांची अ.प. रक्कम रू.19,39,953/- चे काम अ.प. दराने करण्याची निविदा दरास मा.स्थायी समितीसमोर प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

मा.सभापती : विषय क्रमांक 214 व 215 मंजूर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.2 अंतर्गत येणाऱ्या पिसादेवी रोडवरील सुखना नदीपर्यंत ड्रेनेज लाईन टाकणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी कमी दराचे निविदाधारकाशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार सदरील काम शेख कन्स्ट्रक्शन यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. 215 :</u>** (दि. 21/02/2011 रोजीच्या सभेतील स्थगित करण्यात आलेला विषय क्र. 153)

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, टाऊन हॉल इमारत परिसरातील विद्युत डि.पी. व फोरपोल स्ट्रक्चर शिफ्ट करण्यासाठीचे अंदाजपत्रक सन 2006-07 सा.बां. विभागाच्या दरसुची नुसार रक्कम रू.7,23,851/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत येवून त्यास प्रशासकीय मान्यता घेण्यांत आली. सदर कामासाठी निविदा मागविण्यांत आल्या असता सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दराने मे सत्यम वायर्स यांची निविदा असून सदर निविदा मान्य करण्यांत येवून मे.सत्यम वायर्स यांच्याकडून सदरचे काम सुरू करण्यांत आलेले आहे.

महानगरपालिकेच्या इआरपी संगणक विभाग व विविध अधिकारी / पदाधिकारी दालनात बसविण्यांत आलेल्या एअर कंडिशनमुळे विद्युत भारमध्ये वाढ होत असल्याने पॅनल बोर्ड व मेन स्वीचचे नुतणीकरण करणे आवश्यक असल्याने सदर कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.4,83,750/- एवढ्याने वाढ होत आहे. त्यामूळे सदर कामाचे सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रू.12,07,601/- एवढ्याचे होते.

करीता वाढीव कामाच्या अंदाजपत्रकास तसेच ह्या कामाचे ठेकेदार मे.सत्यम वायर्स यांच्याकडून अंदाजपत्रकीय दरानुसार काम करून घेण्याच्या कार्योत्तर मान्यतेस्तव प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, टाऊन हॉल इमारत परिसरातील विद्युत डि.पी. व फोरपोल स्ट्रक्चर शिफ्ट करण्यासाठी व महानगरपालिकेच्या इआरपी संगणक विभाग व विविध अधिकारी / पदाधिकारी दालनात बसविण्यांत आलेल्या एअर कंडिशनमुळे विद्युत भारमध्ये वाढ होत असल्याने पॅनल बोर्ड व मेन स्वीचचे नुतणीकरण करणेच्या अतिरिक्त कामासाठीच्या सुधारीत रक्कम रू.12,07,601/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर काम मे.सत्यम वायर्स यांच्याकडून अंदाजपत्रकीय दरानुसार काम करून घेण्यास सर्वानुमते कार्योत्तर मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. 216 :</u>** (दि. 21/02/2011 रोजीच्या सभेतील स्थगित करण्यात आलेला विषय क्र. 136)

मा.आयुक्त महोदय, महानगरपालिका, औरंगाबाद यांचे मान्यतेन्वये उपआयुक्त (सिडको), महानगरपालिका, औरंगाबाद हे प्रस्ताव सादर करीत आहे की, मो.विश्रांतीनगर जयभवानीनगर येथील सौ.निर्मला दत्ता काळे यांची इमारत ज्याचे क्षेत्रफळ 85.02 चौ.मी. असून शाळेकरीता भाड्याने घेणे बाबत मा.शिक्षणाधिकारी यांनी या विभागास दि.10/06/2010 रोजी संचिका दर निश्चितीसाठी पाठविण्यात आली असता सदर जागेचे सिध्द शिघ्र गणकानुसार दर रू.215/- प्रती चौ.मी. प्रती महा आकारणे योग्य. करिता प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

श्री.विजय वाघचौरे : 216 विषय रद्द केला होता परत परत का येतो.

मा.सभापती : विषय क्रमांक 216 व 217 मंजूर. ऐनवेळचे विषय मंजूर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मो.विश्रांतीनगर जयभवानीनगर येथील सौ.निर्मला दत्ता काळे यांची इमारत ज्याचे क्षेत्रफळ 85.02 चौ.मी. रू.215/- प्रती चौ.मी. प्रतीमाहप्रमाणे शाळेकरीता भाड्याने घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. 217 :</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, IHSDP योजनेंतर्गत एकूण रू.3.66 कोटी शिल्लक निधी तातडीने लागणार नसल्यामूळे त्यापैकी रू.2.00 कोटी निधी मुदत ठेव स्वरूपात तीन (3) महिन्याकरीता गुंतवणुक करणे व महानगरपालिकेच्या भविष्य निर्वाह निधीच्या बचत खात्यातील

रू.1.50 कोटी रक्कम पाच (5) वर्ष मुदतीच्या कालावधीसाठी गुंतवणूक करणे आहे. गुंतवणुक करण्याच्या दिवशी तुलनात्मकदृष्ट्या ज्या बँकेचे व्याज दर सर्वात जास्त असेल त्या बँकेस गुंतवणुक करणे करीता प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, IHSDP योजनेंतर्गत एकूण रू.3.66 कोटी शिल्लक निधी मधील रू.2.00 कोटी निधी मुदत ठेव स्वरूपात तीन (3) महिन्याकरीता गुंतवणुक करणेस व महानगरपालिकेच्या भविष्य निर्वाह निधीच्या बचत खात्यातील रू.1.50 कोटी रक्कम पाच (5) वर्ष मुदतीच्या कालावधीसाठी गुंतवणुक करण्याच्या दिवशी तुलनात्मकदृष्ट्या ज्या बँकेचे व्याज दर सर्वात जास्त असेल त्या बँकेस गुंतवणूक करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

ऐनवेळचे विषय

**विषय क्र. 218 :**

कार्यकारी अभियंता, वार्ड ब व क, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहे की, केंद्र शासनाच्या UIDSSMT योजने अंतर्गत मंजुर झालेली औरंगाबाद समांतर पाणी पुरवठा योजना PPP तत्वावर राबविणे बाबत महानगरपालिकेने निर्णय घेतलेला असुन PPP तत्वावरील निविदा कार्यवाही सुरु झालेली आहे. निविदा कार्यवाही दोन टप्पयांमध्ये असुन टप्पा-१ RFQ ची निविदा प्रक्रिया पूर्ण झालेली आहे. टप्पा -२ RFP ची निविदा कार्यवाही सुरु आहे.

केंद्र शासनाने रुपये ३५९.६७ कोटी रकमेच्या योजनेस मान्यता दिलेली असुन केंद्र शासनाचे ८०% अनुदान अनुज्ञेय आहे. त्यापेकी ५०% रुपये १४३.८६ कोटी रकमेचे अनुदान दिनांक ०३.११.२००९ रोजी औरंगाबाद महानगरपालिकेस प्राप्त झालेले आहे. केंद्र शासनाच्या UIDSSMT योजनेच्या मार्गदर्शक तत्वानुसार औरंगाबाद महानगरपालिकेने केंद्र शासना सोबत Reforms राबविण्या संदर्भाने करारनामा (MoA) केलेला आहे. UIDSSMT अंतर्गत करावयाच्या सुधारणा महानगरपालिकेस बंधंनकारक आहे. सदरील Reforms राबवुन त्याचा प्रगती अहवाल दर तीन महीन्यांनी शासनास सादर करावयाचा आहे.

त्याचप्रमाणे राज्य शासनाच्या महाराष्ट्र सुजल निर्मल अभियानांतर्गत आणि महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान कार्यक्रमातंर्गत शासनाचे अनुदान मिळवावयाचे आहे. त्यास्तव औरंगाबाद महानगरपालिकेने सुधारणा (Reform) कार्यक्रम राबविणे संदर्भात कार्यवाही करणेसाठी देखील सर्व विभागांमध्ये समन्वय साधणे, Reforms & MoA Monitoring & Implimentation Assistance करीता सल्लागाराची नेमणुक करण्याच्या दृष्टीने निविदा सुचना दिनांक ०७.०६.२०१० रोजी प्रसिध्द करण्यात आली होती. या अंतर्गत दोन कोऱ्या निविदांची विक्री झाली व यापैकी एक निविदा प्राप्त झाली आहे. विहीत निविदा कार्यक्रमानुसार दिनांक २९.०६.२०१० रोजी सदर निविदा उघडली असता खालील यंत्रणेचे दर प्राप्त झाले.

| Sr. No. | Name of Agency | Rate Quoted |
|---|---|---|
| 1 | CRISIL Infrastructure Advisory, a division of CRISIL Risk & Infrastructure Solution Ltd. | Rs. 7.03 Lakhs Per Month i.e. Rs. 84,36,000 Per Year. (Inclusive of all taxes) |

उपरोक्त प्रमाणे एकाच यंत्रणेने निविदा सादर केल्यामुळे संबंधितांना मा.आयुक्त यांचे दालनात दिनांक ०६.०७.२०१० रोजी वाटाघाटी करीता बोलावण्यात आले.संबंधित यंत्रणेशी चर्चा केल्यानंतर विषयांकीत काम सर्व करांसहीत रक्कम रुपये ६.७२ लक्ष प्रति माह म्हणजेच रुपये ८०,६४,०००/- वर्ष प्रमाणे करण्यास तयार असल्याबाबत क्रिसील संस्थेने सहमती दर्शविली होती. त्यानंतर पुन्हा Crisil संस्थेने दिनांक २२.१२.२०१० रोजीच्या पत्रानुसार सुधारीत दर म्हणजे सर्व करांसहीत रु. ५,५०,०००/- प्रति महिना म्हणजेच रुपये ६६,००,०००/- प्रति वर्ष प्रमाणे सदरचे काम करण्यास लेखी सहमती दिलेली आहे. या अंतर्गत उपरोक्त संस्थेची कार्यव्याप्ती दर्शविणारी माहिती (Scope of Work ) सोबत जोडलेली आहे.

औरंगाबाद शहराची भविष्यातील पाण्याची गरज पाहता समांतर पाणी पुरवठा योजना राबविणे करीता तसेच महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान कार्यक्रम आणि महाराश्ट्र सुजल निर्मल अभियाना अंतर्गत त्याचप्रमाणे महाराष्ट्र शासनाकडुन आगामी १३ व्या वित्त आयोगाच्या शिफा रशीनुसार प्राप्त होणारे अनुदान महानगरपालिकेस मिळण्यासाठी शासनाच्या सुचनांनुसार Reforms राबविणे बंधनकारक आहे. त्याशिवाय कुठल्याही प्रकारचे अनुदान महानगरपालिकेस मिळणार नाही. करीता सल्लागारामार्फत सदरील Reforms राबविण्यासाठी सहाय्य घेण्याचा प्रस्ताव मा.आयुक्त महोदय यांनी मा.स्थायी समिती सभेसमोर सादर करण्याची शिफारस केली आहे.

करीता CRISIL Infrastructure Advisory, a division of CRISIL Risk & Infrastructure Solution Ltd. यांची निविदा रुपये ५,५०,०००/- प्रतिमहिना म्हणजेच रुपये ६६,००,०००/- प्रति वर्ष या दराने खर्चाचा प्रस्ताव मा. स्थायी समिती सभेसमोर विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

## Reforms and MoA Monitoring & Implementation Assistance करीता क्रिसील संस्था करणार असलेल्या कामाची व्याप्ती (Scope of Work)

**कार्यव्याप्ती तीन भागात विभागली आहे.**

अ) प्रकल्प राबविण्यासाठी सहाय्य.

ब) Reform राबविण्यासाठी सहाय्य.

क) UIDSSMT नुसार मदत.

### <u>अ) प्रकल्प राबविण्यासाठी सहाय्य.</u>

महानगरपालिका UIDSSMT अंतर्गत पाणी पुरवठयाचा प्रकल्प राबविणार आहे. या प्रकल्पासाठी विहीत मुदतीत निधी उपलब्ध होण्याकरीता (Reforms ) सुधारणा प्रकल्प विहीत वेळेत पूर्ण होणे गरजेचे आहे.

निविदा पद्धतीने महानगरपालिका सदर प्रकल्प राबविणार आहे. प्रकल्प राबवितांना सल्लागार सहाय्य म्हणुन क्रिसील खालील कामे करणार आहे.

१. महानगरपालिकेत विविध विभाग प्रमुखांच्या संपर्कात राहुन त्यांच्या सल्ल्याने व सहकार्याने UIDSSMT ने मंजुर केलेल्या प्रकल्पांकरीता वेळापत्रक व कृती आराखडा तयार करणे.
२. विभागास प्रकल्प राबविण्यास / सुरु करण्यास सहकार्य /मार्गदर्शन करणे.
३. प्रकल्प राबविण्याकरीता प्रकल्पांतर्गत असलेले संभाव्य अडथळे / धोके ओळखुन त्यावर उपाय योजना सुचविणे.
४. केंद्रीय नगर विकास खाते व SLNA यांचे निर्देशानुसार व मागणीनुसार विहीत प्रपत्रात प्रकल्प आराखडे तयार करणे.
५. विभागप्रमुख व PMC सोबत समन्वय साधुन प्रकल्प पुर्णत्वास नेणे व MIS घेणे.
६. औरंगाबाद महानगरपालिका PPP तत्वावर कोणकोणते विविध प्रकल्प राबवु शकते ते शोधणे आणि त्याबाबत सल्ला देणे. यासाठी Performance Based Contracts Model तयार करणे.
७. UIDSSMT ने घालुन दिलेल्या अटी / शर्ती / बंधने इत्यादी नुसार प्रकल्पाचा आढावा घेऊन आवश्यक सुधारणांसह प्रकल्प पुर्ण करणे. याबाबत काही अडचणी उद्‌भवल्यास त्यावर उपाय योजना सुचविणे.
८. महानगरपालिकेच्या विविध प्रकल्पांसाठी विविध संस्थांकडुन / स्त्रोतांद्वारे निधी प्राप्तीसाठी आवश्यक असलेल्या कार्यालयीन औपचारिकता पुर्ण करणेसाठी महानगरपालिकेस सहाय्य करणे.
९. UIDSSMT अंतर्गत केंद्रीय नगरविकास खाते व महाराष्ट्र शासना सोबत पत्र व्यवहारासाठी व उद्दीष्टपुर्तीसाठी महानगरपालिकेस सहाय्य करणे.

१०. केंद्रीय नगर विकास खाते व SLNA समोर महानगरपालिकेच्या वतीने प्रतिनिधीत्व करणे व या यंत्रणांना प्रकल्पाची स्थिती व सुधारणा संबंधाने वेळोवेळी अद्यावत माहिती देणे.

११. महानगरपालिकेच्या कर्मचारी / अधिकारी यांना विविध क्षेत्रात असलेल्या कुशल मार्गदर्शकांमार्फत अद्यावत ज्ञान/ माहिती तसेच इतर संस्था / ठिकाणी सुरु असलेल्या उत्कृष्ट कार्यपद्धती (Best Practice) बाबत माहिती दणे.

**<u>ब) सुधारणा राबविण्यासाठी सहाय्य</u>**

महानगरपालिकेस ऐच्छीक आणि बंधनकारक असलेल्या सुधारणा (Reforms) राबवावयाच्या आहेत. या बाबत महानगरपालिकेने शासनास आश्वासित केले आहे. ई- गव्हर्नन्स, म्युनिसिपल अकाऊंटिंग, मालमत्ता कर, पाणी पट्टी, इतर सेवाकर, शहरातील गरीबांसाठी अर्थसंकल्पात पुरेशा निधीची तरतुद करणे व त्यांचेसाठी मुलभुत सोयी सुविधा देणे इत्यादी सुधारणा या बंधनकारक सुधारणा आहेत. ऐच्छिक सुधारणा या विहीत कालावधीत करावयाच्या असुन राज्य शासनाच्या निर्देशा प्रमाणे करावयाच्या आहेत. याबाबत महानगरपालिकेने काम सुरु केले आहे. परंतु या सुधारणा UIDSSMT च्या आराखडयानुसार योग्य पद्धतीने करावयाच्या आहेत. क्रिसीलच्या कार्यव्याप्ती मध्ये सुधारणा राबविण्या संदर्भाने खालील बाबींचा समावेश असेल.

**<u>बंधनकारक सुधारणा (Reforms):-</u>**

**<u>लेखा विषयक सुधारणा.</u>**

यामध्ये सध्याच्या लेखा पद्धती ऐवजी दुहेरी नोंद लेखा पद्धती स्विकारणे व त्यानुसार काम करणे तसेच अर्थसंकल्प विषयक सुधारणा राबविणेचा समावेश आहे.

या दृष्टीने दुहेरी नोंद लेखा पद्धती स्विकारण्यासाठी क्रिसील खालील उद्धिष्ट ठेवुन काम करेल.

१. दुहेरी नोंद लेखा पद्धती स्विकारण्यासाठी सद्यस्थिती व त्यासाठी आश्वासीत केलेले वेळापत्रक याचे निर्धारण करणे - या निर्धारण प्रक्रियेमध्ये खालील बाबींचा समावेश असेल उदा: दररोजच्या जमा खर्चाची नोंद ठेवणे, अहवालांचा मेळ घालणे, बँक खात्यांचा मेळ घालणे, मालमत्तेची किंमत ठरविणे, प्रारंभिक शिल्लकेचा तक्ता तयार करणे भविष्यात सदर कार्य पार पाडणाऱ्या कर्मचाऱ्यांना दर्जेदार प्रशिक्षण देण्याची जबाबदारी या निर्धारण प्रक्रियेमध्ये आहे.

२. वरील निर्धारणावर आधारीत व कृती आराखडा औरंगाबाद महानगरपालिकेस सादर करणे.

३. यानंतर क्रिसील लेखा विषयक सुधारणांच्या प्रगतीची नियमीत देखरेख करेल.

दुसऱ्या भागात अर्थसंकल्पीय सुधारणा Outcome Budget तयार करणे व शहरी गरीबांसाठी स्वतंत्र अर्थसंकल्पीय तरतुद ठेवणे याचा समावेश आहे.

अर्थसंकल्पीय सुधारणा राबविण्याकरीता क्रिसील इन्फ्रास्ट्रक्चर्स ॲडव्हायझरी संस्थेच्या कामाची व्याप्ती खालीलप्रमाणे असेल.

१. अस्तीत्वातील पद्धतीचा अभ्यास करुन अर्थसंकल्प संरचना व कार्यप्रक्रिया समजून घेणे.

२. शहरी गरीबांसाठी अर्थसंकल्पीय तरतुदीसह UIDSSMT ने सुचविलेलया सर्व पद्धतीचा समावेश करुन महानगरपालिके करीता अर्थसंकल्प नियमावली तयार करणे.

३. अर्थसंकल्प संरचना व कार्यप्रक्रियाचे पुनर्विलोकन करुन तपासणी करणे.

४. कृती अर्थसंकल्प, अनेक वर्षासाठी अर्थसंकल्प व भाग अर्थसंकल्प रचना प्रणाली स्वीकारण्यासाठी मार्गदर्शक सुचना तयार करणे.

५. कार्य, सेवा, विभाग व जमा खर्च बाजु इत्यादी संदर्भाने महानगरपालिकेच्या झोन, वार्ड निहाय माहिती सुलभतेने लवकर मिळणे करीता अर्थसंकल्पीय संरचनेत क्रमवारी देण्याबाबत शिफारस करणे.

६. संगणकीय ऑन लाईन प्रणाली द्वारे अर्थसंकल्पीय अधिकाराची माहिती करुन घेण्यासाठी मार्गदर्शक सुचना तयार करणे.

७. अर्थसंकल्प दस्तावेज व अर्थसंकल्पावर आधारीत इतर अहवाल सहज सुलभतेने अंमलात आणण्यासाठी मार्गदर्शक तत्वे तयार करणे.

८. भाग व सल्ले विषयक अर्थसंकल्प आणि निश्पत्ती अर्थसंकल्प अंमलात आणण्यासाठी कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्याची तरतुद करणे.

## ई -प्रशासनः-

क्रिसील इन्फ्रास्ट्रक्चर ॲडव्हायझरी यांना खालीलप्रमाणे काम करावयाचे आहे.

१. **औरंगाबाद महानगरपालिके करीता ई - प्रशासनाची स्थिती ठरविणे - राष्ट्रीय ई-प्रशासन नियमावलीशी सद्यस्थिती तुलना करणे जेणे करुन अंमलात आणावयाचे नियोजन विकसीत करता येईल.**

सदर कार्यक्रम क्रिसील हाती घेईल व त्यासाठी खालीलप्रमाणे काम करेल.

१. ई - प्रशासनाची नॅशनल मिशन मोड प्रोजेक्ट नियमावलीशी आधारीत प्रत्येक मोडयुलच्या Functional Requirement Specifications चे विश्लेषण करणे.
२. अस्तीत्वातील मोडयुलच्या सॉफ्टवेअरचा उपयोग व त्याची योग्यता विचारात घेण्यात येईल.
३. महानगरपालिकेच्या विविध विभागांमध्ये वापरात असलेल्या माहिती तंत्रज्ञान संदर्भाने महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांसोबत चर्चा सत्रांचे आयोजन करणे.
४. उत्कृष्ट ई - प्रशासन पद्धतीसाठी आवश्यक असणाऱ्या बाबींशी अस्तीत्वातील पद्धतींची तुलना करुन त्यामध्ये असलेला फरक ओळखणे.

२. **अंमलबजावणीचे नियोजन करणे.**

उपरोक्त निर्धारणावर आधारीत व महानगरपालिकेच्या गरजेनुसार अंमलबजावणी नियोजन अहवाल तयार करण्यात येईल. अंमलबजावणी नियोजन अहवाल हे महानगरपालिके करीता दिर्घ मुदत व अल्प मुदतीसाठी रचना कौशल्य सुचवेल तसेच हे साध्य करण्यासाठी कोणती पद्धत अवलंबवयाची याची शिफारस करेल.

३. **विविध ई -प्रशासन सेवांमध्ये पी.पी.पी. पर्यायांचा शोध घेणे.**

क्रिसील संस्था औरंगाबाद महानगरपालिका करीता नागरी केंद्र, पी.पी.पी. तत्वावरील ई- निविदा सारख्या ई-प्रशासनातील इतर पी.पी.पी. पर्यायांचा शोध घेईल व सदर पर्यायांची अंमलबजावणी करण्यासाठी मार्ग सुचवेल.

## मालमत्ता कर सुधारणा

केंद्रीय नगर विकास खात्यासोबत केलेल्या करारनाम्यामध्ये औरंगाबाद महानगरपालिकेने खालील मुख्य लक्ष्य येत्या काही वर्षामध्ये अमंलात आणण्याबाबत आश्वासीत केले आहे.

१. मालमत्ता करासंदर्भाने स्वयंनिर्धारण पद्धतीकडे जाणे व मालमत्ता करासाठी अस्वेच्छाधीन पद्धतीची उभारणी करणे.
२. GIS आधारीत मालमत्ता कर पद्धतीचा वापर करणे.
३. वसुलीचे प्रमाण ९०% पर्यंत नेणे आणि एकुण थकबाकी व चालु मागणीचे प्रमाण १०% खाली आणणे.

औरंगाबाद महानगरपालिकेने मालमत्ता कर सर्वेक्षण व GIS संदर्भाने कार्य हाती घेतले आहे. यामध्ये वसुलीची कार्यक्षमता वाढविण्यासाठी वसुलीच्या प्रयत्नांमध्ये सुधारणा करणे आणि निर्धारण व वसुलीच्या बाबी बळकट करण्याकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

१. **वसुलीचे प्रमाण वाढविणे व थकबाकी कमी करणे.**

महानगरपालिकेतील मालमत्ता कराच्या अस्तीत्वातील पद्धतींचा आढावा घेऊन हे काम सुरु करण्यात येईल. थकबाकी कमी करणे व वसुलींची कार्यक्षमता वाढविणे या बाबी साध्य करण्यासाठी उपरोक्त पुनर्विलोकनचा विचार करता कार्यालयीन रचनेचे फेरसंकल्पन करण्यात येईल. नविन रचनांच्या पर्यायांबाबत

महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांसोबत चर्चा केली जाईल. महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधुन नविन रचनेचे संकल्पन केले जाईल. अशा प्रकारच्या बदलाने या सुधारणे अंतर्गत त्वरीत महसुलात वाढ होईल.

**वसुलीची कार्यक्षमता सुधारणे.**

नविन व्यवहार्य रचनेचा भाग म्हणून, जी कामे नेहमीची व दैनंदीन व्यवहारातील असतील व ज्यामध्ये महानगरपालिकेच्या अंमलबजावणीची आवश्यकता नाही, अशी कामे बाहेरुन करुन घेण्याबाबत तुलनात्मक विचार करण्यात येईल. याचा मुख्य हेतु हा कर्मचाऱ्यांवरील कामाचा ताण कमी करणे हा असून त्यामुळे सदर कर्मचारी निर्धारण व अंमलबजावणीकडे विशेष लक्ष देतील. बाहेरच्या स्त्रोताकडुन कामे करुन घेण्याच्या रचेनेचे कार्यक्षम संकल्पन करण्यात येईल व विहीत निविदा पद्धतीचा अवलंब करुन अंमलबजावणी करण्यात येईल .

या अंतर्गत महानगरपालिकेच्या अस्तीत्वातील कर्मचाऱ्यांची अति महत्वाच्या व व्यावसायीक मालमत्ताकडे लक्ष देणे तसेच थकबाकी कमी करणे इ. बाबीकडे विशेष लक्ष देण्यासाठी नियुक्ती करता येईल.

**नागरीकांकरीता स्वेच्छा अनुपालन सुधारणे**

सदर काम हे स्वयंनिर्धारण पद्धतीखाली वैधानिक बदल करण्याशी जोडलेले आहे. व स्वयंनिर्धारणाकडे जाण्यासाठी सुरु करण्यात येईल. नागरीकांना करावयाचे स्वयंनिर्धारण हे सुलभ व्हावे व त्यास नागरीकांमध्ये प्रसिद्धी मिळावी तसेच एकमेकांसोबत संवाद साधण्याच्या युक्त्यांचे संकल्पन करण्याच्या बाबींचा यामध्ये समोवश आहे.

**उपभोक्ता शुल्क**

पाणी पुरवठा, मलनि:सारण व घनकचरा संदर्भाने उपभोक्ता शुल्क हे प्रामुख्याने Non tax Based महसुलाचे प्रमुख भाग आहेत.

बिलींग व वसुलीच्या पद्धती मजबुत करण्यासाठी संकल्पन करणे व वसुलीची कार्यक्षमता वाढविण्यासाठी महानगरपालिकेस मदत करणे याकडे क्रिसील इन्फ्रास्ट्रक्चर ॲडव्हायझरी लक्ष देईल. या भागातील कामाची व्याप्ती खालीलप्रमाणे असेल.

**पाणी पुरवठा व मलनि:सारण सेवांकरीता**

**पाणी पुरवठा व मलनि:सारण कृतींचे पुनर्विलोकन करणे:-** सर्वप्रथम महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा व मलनि:सारण कृतींचे पुनर्विलोकन करण्यात येईल. यामध्ये देत असलेल्या सेवांच्या विविध घटकांचा समावेश असेल. करांमध्ये प्रस्तावीत करावयाची कर वाढ ही सेवा मानकांमध्ये सुधारणा करण्याशी संबंधित असल्याने पुनर्विलोकन करणे महत्वाचे आहे.

**पाणी पुरवठा व मलनि:सारण सेवांवरील कर संरचना व बिलींग पद्धतींचे पुनर्विलोकन करणे:-** यामध्ये पाणी पुरवठा व मलनि:सारण सेवांकरीता असलेल्या अस्तित्वातील करसंरचनेचे पुनर्विलोकन करण्यात येईल. परिमाणावर आधारित किंवा पलॅट रेट किंवा इतर दर याप्रमाणे बिलींग पद्धतीचे विश्लेषण करण्यात येईल.

-पाणी पुरवठा व मलनि:सारण सेवा देण्यासाठी लागणाऱ्या किंमतीचा अंदाज ठरविणे- सर्व प्रथम पाणी पुरवठा व मलनि:सारण सेवा देण्यासाठी लागणाऱ्या खर्चाचा / किंमतीचा अंदाज ठरविण्यात येईल. आजची किंमत व या सेवा देण्यासाठी भविष्यात लागणारी किंमत याचाही अंदाज ठरविण्यात येईल.

-या सेवा देण्यासाठी केलेली मागणी योग्य आहे काय हे तपासणे- पाणी पुरवठया करीता केलेली मागणी ही सेवा देण्यासाठी लागणाऱ्या खर्चाची वसुली होण्यासाठी पुरेशी आहे काय याबाबत तपासणी करण्यात येईल. असे नसेल तर शहरात अनेक अनाधिकृत नळ जोडण्या असतील किंवा पाणी पट्टीचे आकारलेले दर कमी असतील किंवा दोन्ही एकत्रित कारणे असू शकतात. सर्वसाधारण पद्धत वापरुन व संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा करुन शहरात असलेल्या अनाधिकृत नळ जोडण्या घेण्यामागची कारणे काय असतील यावर तर्क काढण्यात येईल. जर पाणी पट्टीचे दर कमी आहेत हे कारण असेल तर, वेगवेगळ्या वर्गातील ग्राहकांकडुन योग्य दर आकारण्याबाबत क्रिसील शिफारस करेल

-वसुली कार्यक्षमता सुधारणे - फक्त चांगली टेरीफ संरचना पुरेशी नाही तर त्यासोबत महसुल वसुलींची कार्यक्षमता उंचावणे हे काम महानगरपालिकेसाठी सारखेच महत्वाचे आहे. याकरीता विभागाची महसुल वसुली कार्यक्षमता सुधारण्यासाठी क्रिसील नियोजन करेल.

**घनकचरा व्यवस्थापन करीता**

घनकचरा व्यवस्थापन करीता खालीलप्रमाणे कामे हाती घेण्यात येतील.

-घनकचरा व्यवस्थापनाची कृती, टेरीफ संरचना व बिलींग पद्धतींचे पुनर्विलोकन करणे:- प्रथम घनकचरा व्यवस्थापन कृतीचा आढावा घेण्यात येईल. या मध्ये देत असलेल्या सेवांच्या विविध घटकांचा समावेश असेल. प्रस्तावित करावयाची करवाढ ही सेवा मानकांमध्ये सुधारणा करण्याशी संबंधित असल्याने पुनर्विलोकन करणे महत्वाचे आहे. असे चार्जेस वसुल करण्याच्या पद्धती व हे चार्जेस मालमत्ता कराचा भाग आहेत काय याबाबतही आढावा घेण्यात येईल.

-घनकचरा व्यवस्थापन सेवा देण्यासाठी लागणाऱ्या किंमतीचा अंदाज ठरविणे:- प्रथम घनकचरा व्यवस्थापन सेवा देण्यासाठी लागणाऱ्या खर्चाचा / किंमतीचा अंदाज ठरविण्यात येईल. आजची किंमत व ही सेवा देण्यासाठी भविष्यात लागणारी किंमत याचाही अंदाज ठरविण्यात येईल.

-ही सेवा देण्यासाठी केलेली मागणी योग्य आहे काय हे तपासणे- सेवा देण्यासाठी लागणाऱ्या खर्चाची वसुली होण्यासाठी केलेली मागणी पुरेशी आहे काय याबाबत क्रिसील तपासणी करेल. जर टेरीफ कमी आहे हे कारण असेल तर वेगवेगळया वर्गातील ग्राहकांकडुन योग्य दर आकारणी करण्याबाबत क्रिसील शिफारस करेल.

-वसुली कार्यक्षमता सुधारणे - विभागाची महसुल वसुली कार्यक्षमता सुधारण्यासाठी क्रिसील नियोजन करेल.

**पाणी पुरवठा, मलनि:सारण व घनकचरा व्यवस्थापन सेवांबाबत Subsidy impact Assessment Study च्या हमी बाबत.**

महानगरपालिका पुरवित असलेल्या सेवांवरील सबसिडींबाबत Impact Assessment करण्याची औरंगाबाद महानगरपालिकेची जबाबदारी आहे. क्रिसील संस्था महानगरपालिकेच्या सध्याच्या टेरीफ पॉलीसीवर आधारीत Financial impact Assessment करेल. यामध्ये पाणी पुरवठा, घनकचरा व्यवस्थापन व मलनि:सारण सेवांचे भाग अंतर्भुत असतील.

**प्रशासकीय सुधारणा**

प्रकल्प व सुधारणा राबविण्यासाठी औरंगाबाद महानगरपालिकेवर बऱ्याच नविन मागण्या लादल्या गेल्या आहेत. यामध्ये नागरीकांचा सहभाग व पारदर्शीपणा गुंतवणे अपेक्षित आहे. त्याचसोबत नागरी सेवांची गरज व शहरातील गरीबांच्या उपजिवीके संदर्भाने गरज या बाबींची जबाबदारी असणे अपेक्षित आहे. या नवीन मागण्या करीता महानगरपालिका स्वत: नवीन कौशल्य विकसीत करेल.

या मागण्यांचे प्रकार व तात्काळ आवश्यकता विचारात घेता महानगरपालिकेला स्वत: संस्थेचे सामर्थ्य वाढविणे आवश्यक आहे. सदर काम हे तीन प्रकारे होणे अपेक्षित आहे.

१. योग्य मार्ग निवडणे - या नवीन आव्हानांना सामोरे जाण्यासाठी औरंगाबाद महानगरपालिकेला योग्य असे सामर्थ्यकौशल्य विकसीत करणे आवश्यक आहे. सध्याच्या पद्धती न बदलता फक्त संस्थे अंतर्गत कार्यशाळा आयोजीत करणे पुरेसे नाही. सहभाग व पारदर्शकता यांची आवश्यकता पाहता नागरी संस्थांचे जाळे विकसीत करणे जास्त योग्य आहे. अशाच प्रकारे भांडवली गुंतवणुकीसाठी महानगरपालिकेच्या पद्धतींचा पुनर्विचार होणे आवश्यक आहे.

२. मार्ग योग्य करण्यासाठी संस्थेची संरचना विकसीत करणे- सदर कार्ये अंमलात आणण्यासाठी महानगरपालिकेला योग्य संरचना विकसीत करणे आवश्यक आहे. उदा. नागरीकांशी संवाद साधण्यासाठी सामाजीक कौशल्याची आवश्यकता आहे. हे सुरु करण्याची गरज आहे. नागरीकांशी संवाद साधण्याचे नवीन कार्य परिणामकारक होण्यासाठी महानगरपालिका संस्थेच्या संरचनेशी जोडले जाणे गरजेचे आहे.

३. निवडलेला मार्ग अंमलात आणण्यासाठी लोकांचे कौशल्य मजबुत करणे- महानगरपालिकेला त्यांच्या कार्यरत कर्मचाऱ्यांचे कौशल्य वाढविणे गरजेचे आहे. त्याचसोबत नवीन भरती किंवा आऊट सोर्सींग द्वारे नवीन कौशल्य वाढविणे गरजेचे आहे.

UIDSSMT अंतर्गत प्रशासकीय सुधारणा राबविणे औरंगाबाद महानगरपालिकेची जबाबदारी आहे. सदर प्रशासकीय सुधारणा या अधिक चांगल्या मानवी उपाय व्यवस्थापन व आस्थापना खर्च कमी करणे याकडे वाटचाल करणाऱ्या असाव्यात. औरंगाबाद महानगरपालिकेने सदर प्रशासकीय सुधारणा अंमलात आणण्याचे आश्वासीत केले आहे. तसेच Capacity Enhancement Needs Assessment चा अभ्यास हे स्वतंत्र कार्य करण्याची हमी आहे. अशाप्रकारे अभ्यास करण्यासाठी खालीलप्रमाणे काम करणे आवश्यक आहे.

१. खाली दिलेल्या विशिष्ट भागांवर लक्ष केंद्रीत करुन औरंगाबाद महानगरपालिकेच्या संस्था नियोजनाचे पुनर्विलोकन करणे- (अ) पायाभुत सुविधा वाढविण्यासाठी भांडवली गुंत्तवणूक (ब) सहभाग नियोजन व पारदर्शकता सह नागरीकांशी संवाद. महानगरपालिकेच्या आजच्या अस्तित्वातील जबाबदाऱ्यांचे पुनर्विलोकन करणे व अशाप्रकारच्या नियोजनामुळे जबाबदारीमध्ये होणाऱ्या वाढीचा विचार करणे.

२. औरंगाबाद महानगरपालिका, महाराष्ट्र शासन व केंद्रशासन यांनी स्वाक्षरी केलेल्या करारनाम्याचे आणि उपरोक्त क्षेत्रातील जबाबदाऱ्यांबाबत महानगरपालिकेने केलेल्या आश्वासनांचे पुनर्विलोकन करणे.

३. महानगरपालिका संस्थेची संरचना, कर्मचारी संस्था व उपलब्ध कौशल्य यांचे पुनर्विलोकन करणे.

४. गुंतवणुक नियोजन, प्राप्ती व नागरी संवाद या संदर्भाने उपरोक्त प्रमाणे केलेल्या नियोजनाची अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक असलेल्या महानगरपालिकेच्या अस्तीत्वातील कार्यप्रक्रियांचा आढावा घेणे.

५. महानगरपालिकेचे सल्लागार, कंत्राटदार, विकासक व नागरीक यांचे प्रतिनिधी असे बाहेरचे Stakeholders व महानगरपालिकेचे कर्मचारी यांच्या बैठका घेणे. या बैठकांद्वारे महानगरपालिकेच्या Strength & Limitations बाबत माहिती होईल. तसेच उपरोक्त क्षेत्रातील नियोजनावर प्रभाव पडेल.

६. पर्याय विकसीत करणे व करावयाच्या कृतीची शिफारस सुचविणे.

७. घेतलेल्या आढाव्यानुसार, वरील सर्व क्षेत्रात कामे विहित वेळेत पुर्ण करण्यासाठी महानगरपालिकेचे रचना कौशल्य ओळखणे. राजकीय, सामाजीक व कर्मचारी यांचेकडुन स्विकारल्या जाणारे पर्याय ओळखुन अशा पर्यायांचे तुलनात्मक मुल्यांकन करणे. महानगरपालिकेच्या मुख्य प्रतिनीधी सोबत कार्यशाळेचे आयोजन करुन अति योग्य कौशल्य ओळखणे.

८. व्यवहार्य व कृती जन्य असा कृती आराखडा विकसीत करणे. प्रस्तावीत बदल तसेच जबाबदाऱ्या अंमलात आणण्यासाठी लागणाऱ्या काल मर्यादेचा सविस्तर समावेश सदर कृती आराखडयामध्ये असेल.

९. कृती आराखडा महानगरपालिकेच्या आराखडयास मदत करणारा तसेच संस्थेची संरचना आणि पद्धत व कर्मचाऱ्यांची क्षमता विहित वेळेत वाढविणारा असेल.

## ऐच्छिक सुधारणा :-

ऐच्छिक सुधारणा या सुधारणा कालावधी मध्ये विखुरलेल्या असून यापैकी काही राज्य शासनाशी संबंधीत आहेत. यामध्ये क्रिसील खालीलप्रमाणे ऐच्छिक सुधारणा अंमलात आणण्यासाठी मदत करेल.

**१. परवानगी प्रक्रिया कार्यक्षम करण्यासाठी बांधकाम नियमावली सुधारीत करणे.**

यामध्ये क्रिसील संस्था बाधंकाम परवान्या संबंधी च्या सध्याच्या पध्दतीचा अभ्यास करेल व यामध्ये असलेल्या कमतरतांच्या संदर्भाने सुधारणा सुचवेल. याबाबतीत मालमत्ताधारकांची कार्यशाळा आयोजीत करुन परवाना पध्दतीबाबत सुचना मागविण्यात येतील. मसुदा प्रस्ताव राज्य शासनाकडे अंतिम मंजुरीसाठी पाठविण्यात येईल व त्यानंतर महानगरपालिकेच्या विकास नियंत्रण नियमावलीमध्ये त्याचा समावेश करण्यात येईल.

**२. सांडपाण्याच्या पुर्नवापराबाबत नियमावली.**

यामध्ये क्रिसील सांडपाण्या संदर्भाने इतर शहरांमध्ये असलेल्या नियमावलीचा अभ्यास करेल व त्यामध्ये असलेल्या आढळुन आलेल्या बाबींचा अहवाल सादर करेल. त्यानंतर पुढचा अभ्यास करण्यासाठी महानगरपालिका स्वतंत्र तांत्रिक सल्लागाराची नेमणूक करेल.

**<u>मॉडयुल -३ UIDSSMT योजने करीता सहाय्य.</u>**

या मॉडयुलची कार्यवाही वरील कार्यवाही सोबत करण्यात येईल. याअंतर्गत UIDSSMT योजनेशी संबंधीत MIS व अहवाल सादरीकरण करण्याकरीता महानगरपालिकेला सहाय्य करेल. या अंतर्गत क्रिसील संस्थेची कार्यव्याप्ती खालीलप्रमाणे असेल.

१. UIDSSMT योजने अंतर्गत मंजुर प्रकल्प व सुधारणा संदर्भाने नियमीत MIS व प्रगती अहवाल तयार करणे.

२. महानगरपालिकेच्या जबाबदार विभाग प्रमुखांच्या संपर्कात राहुन महानगरपालिके अंतर्गत खालील सुधारणांकरीता कृती आराखडयाचा मसुदा तयार करणे.

(अ) उपभोक्ता शुल्क - सेवास्तर उंचावणे, हिशोब बाहय पाण्याचे प्रमाण कमी करणे, महानगरपालिकेने दिलेल्या सुट (Subsidy) ची तपासणी व देखभाल दुरुस्ती करीता लागणाऱ्या खर्चाची वसुली करण्यासाठी कालावधी ठरविणे.

(ब) शहरी गरीबांकरीता निधी उभारण्यासाठी अंतर्गत व्यवस्था करणे - गरीबांकरीता स्वतंत्र आर्थिक तरतुद निर्माण करणे.

(क) शहरातील गरीबांना मुलभुत सेवा देण्याची तरतुद करणे -लाभ धारकांची माहिती व त्या अनुषंगाने कार्य करणे यासाठी स्वतंत्र संस्था नेमण्यासाठी सहाय्य करणे.

(ड). परवानगी प्रक्रिया अधिक कार्यक्षम करण्यासाठी बांधकाम नियमावली सुधारीत करणे- या कामासाठी स्वतंत्र संस्था नेमण्यासाठी सहाय्य करणे.

३. केंद्रीय नगर विकास खात्या कडुन मंजुर करुन घ्यावयाच्या उर्वरित प्रकल्पांकरीता सल्ला देणे.

४. प्रकल्प संकल्पनार्थींना सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी महानगरपालिकेच्या आर्थिक क्षमता विषयक माहिती पुरविणे.

नोट:- स्वतंत्र प्रकल्पाची गरज प्रकल्प सल्लागारा मार्फत पुर्ण करण्यात येईल. यामध्ये महानगरपालिकेची होणारी भांडवली गुंतवणुक व त्यासाठी लागणाऱ्या देखभाल दुरुस्ती खर्चा बाबत क्रिसील संस्था महानगरपालिकेची आर्थिक क्षमता तपासेल.

५. केंद्रीय नगर विकास खाते व स्टेट लेव्हल नोडल एजन्सी यांचेकडे महानगरपालिकेच्या वतीने प्रतिनिधित्व करणे व संस्थाना प्रकल्पांची स्थीती व सुधारणांबाबत माहिती देऊन निधी उपलब्धतेसाठी सहाय्य करणे.

टिप:- या संस्थाकडे पाठपुरावा करण्याची जबाबदारी महानगरपालिकेकडे राहील.

**उद्देश आणि पध्दती.**

प्रकल्प अंमलबजावणी सहाय्य यामध्ये प्राथमिक दृष्टया सुधारणाची अंमलबजावणी करणे, UIDSSMT योजने अंतर्गत प्रकल्पावर लक्ष केंद्रीत करणे आणि महानगरपालिकेने आश्वासित केलेल्या सुधारणांचे उद्दीष्ठ साध्य करण्यास महानगरपालिकेस सहाय्य करणे याचा समावेश असेल. या व्यतिरिक्त

प्रकल्प अंमलबजावणी सहाय्य यामध्ये केंद्रीय नगर विकास विभाग व स्टेट लेव्हल नोडल एजन्सी यांचेकडे महानगरपालिकेच्या वतीने प्रकल्पाच्या प्रगती विषयी अहवाल देणे व प्रकल्प अंमलबजाणीसाठी निधी मिळण्यासाठी प्रयत्न करणे याचा समावेश असेल.

नेमुन दिलेल्या कामाबाबत महत्वपूर्ण रचना कौशल्य खालीलप्रमाणे असेल.

१. महानगरपालिकेस या क्षेत्रातील तज्ञांमार्फत सुधारणांची अंमलबजावणी करणेसाठी सल्ला देणे आणि महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांना अर्थसंकल्पीय सुधारणा, मालमत्ता कर अंमलबजावणी व वसुली या बाबत प्रशिक्षीत करणे.
२. महानगरपालिकेच्या प्रत्येक दिवसाचे व्यवस्थापन व कार्यपध्दती बाबत देखभाल करण्यासाठी महानगरपालिकेला दोन कर्मचारी देणे. क्रिसील कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देईल, त्यांच्या कामांचे नियोजन तयार करेल व त्यांचे Output तपासेल.
३. क्रिसील संस्थेने नेमलेल्या कर्मचाऱ्यांमार्फत मुख्य बदल करणे (जसे की, विधी मंडळ, महसुल विभागाची फेर रचना, बाहेरुन करावयाची कामे.)

प्रकल्प अंमलबजावणी सहाय्याची प्रक्रिया खालीलप्रमाणे असेल.

**टप्पा -१ आरंभ**

या स्तरावर UIDSSMT योजने अंतर्गत सविस्तर प्रकल्प अंमलबजावणीचे आणि करावयाच्या सुधारणांच्या अंमलबजावणीचे पृथ:करण करण्यात येईल. या अंतर्गत खालील कामांचा समावेश राहील.

- संबंधीत विभाग प्रमुखांशी चर्चा करुन करावयाच्या कार्याची सद्यस्थिती मुल्यांकन करणे.
- सुधारणा मसुदा, प्रकल्प, केंद्रीय नगर विकास आणि एस.एल.एन.ए. यांच्या गरजेनुसार अभ्यास करणे.
- केंद्रीय नगर विकास विभागाकडे सादर केलेल्या व प्रलंबित बाबींची अद्यावत माहिती घेणे.

यामुळे प्रकल्प अंमलबजावणी पथकास प्रकल्पाची सद्यस्थिती व प्रकल्पाचा कृती आराखडा तयार करण्यास मदत होईल. सद्यस्थिती व कार्यव्याप्ती सह असलेला आरंभ अहवाल या नंतर सादर करण्यात येईल.

आरंभ अहवाला अगोदर आरंभ अहवालाचे सादरीकरण विभाग प्रमुख यानां प्रकल्प अंमलबजावणी पथकास सविस्तर कृती आराखडया सह करण्यात येईल.

**टप्पा - २ आवश्यक भागांकरीता प्राधान्याने कार्यवाही करणे.**

अहवालात सुचविलेल्या आवश्यक बाबीं नुसार प्रकल्प अंमलबजावणी पथक हे प्राधान्याने कार्यवाही करेल. यामध्ये केंद्रीय नगर विकास, एस.एल.एन.ए. ला प्रलंबित माहिती देणे व विलंब न होऊ देण्याची काळजी घेणे या बाबींचा समावेश राहील.

## प्रकल्पः-

- प्रकल्प राबविणारे पथक हे संबंधीत विभागाशी समन्वय साधुन अपेक्षा व नियोजनानुसार पारदर्शिकता निर्माण करेल.
- प्रकल्प अंमलबजावणी पथक प्रकल्पाच्या प्रगतीकडे लवकरात लवकर लक्ष केंद्रीत करेल.
- प्रकल्प लेखे नियमीत करणे, प्रकल्प लेखे अंतर्गत खर्च एकत्रित करणे. UIDSSMT प्रकल्प निधी व इतर अर्थसंकल्पीय कामे आणि खर्च इत्यादी बाबींची पडताळणी करणे.
- आश्वासीत विहित वेळेत प्रकल्प पुर्ण करण्यासाठी पुढील दोन ते तीन महिन्यांचे ध्येय प्रकल्प अंमलबजावणी पथक ठरवेल.
- प्रकल्पाची नेमुन दिलेली उपांगे व उर्वरित उपांगासाठीच्या सद्यस्थितीची माहिती समन्वय साधुन संबंधीत विभागाला व अधिकाऱ्याला प्रकल्प अंमलबजावणी पथक सादर करेल.

- प्रकल्प अंमलबजावणी मध्ये होणारा विलंब शोधुन विहीत वेळेत प्रकल्प पूर्ण होण्यासाठी प्रकल्प अंमलबजावणी पथक उपाय सुचवेल.
- केंद्रीय नगर विकास व एस.एल.एन.ए.यांना सादर करावयाचे मासिक व त्रैमासिक प्रगती अहवाल प्रकल्प अंमलबजावणी पथक तयार करेल.
- विहित मर्यादेनुसार निधी उपयोगीता स्थिती तयार करण्यात येईल.
- केंद्रीय नगर विकासने मंजुर केलेले व सध्या सुरु न झालेल्या प्रकल्पा करीता असे प्रकल्प अंमलबजावणी करीता वेळापत्रक तयार करण्यासाठी मदत करेल.

## सुधारणा:-

लेखा विषयक व मालमत्ता कर या सुधारणा प्राधान्याने प्रकल्प अंमलबजावणी पथका मार्फत हाती घेण्यात येतील. मालमत्ता कर व लेखा विषयक सुधारणा अंमलबजावणी मध्ये मजबुत स्थिती प्राप्त झाल्या नंतर उर्वरित दोन क्षेत्रातील सुधारणा हाती घेण्यात येतील.

यामध्ये विविध विभाग प्रमुखांसोबत अभ्यास, मुल्यांकन, चर्चा व आढावा अशी कामे व सुधारणा राबविण्यासाठी नियोजन यांचा समावेश असेल.

**टप्पा - ३ सातत्याने पाठपुरावा करणे.**

यात महानगरपालिकेच्या विविध विभाग निहाय क्षेत्रांच्या प्रगतीवर देखरेख करणे व नियोजनानुसार तफावत ओळखणे याचा समावेश असेल. संबंधीत विभागामार्फत सुधारणांची अंमलबजावणी विहित वेळेत व नियोजनाप्रमाणे होते किंवा कसे याबाबत प्रकल्प अंमलबजावणी पथकाचे प्रतिनिधी पाठपुरावा करतील. सुधारणा राबविण्यासाठी क्षमता वाढविण्याकरीता मालमत्ताकर व लेखे विषयक सुधारणातील तज्ञा मार्फत महानगरपालिका कर्मचाऱ्यांना व इतर Stake Holder यांना प्रशिक्षण देण्याचा यात समावेश असेल.

**टप्पा - ४ स्थितपुर्ण स्थिती प्राप्त करणे.**

ही स्थिती प्रकल्प अंमलबजावणी कार्यवाही व्यवस्थित सुरु झाल्यावर प्राप्त होईल. यानंतर महानगरपालिका प्रशिक्षीत कर्मचारी व अधिकारी प्रकल्प अंमलबजावनी पथकाने केलेली कार्यवाही पुढे राबविण्यास समर्थ राहतील.

**टिप :-**

सदर कामाचा मुळ प्रस्ताव (Scope of work ) हा इंग्रजी भाषेतून आहे. सदर प्रस्तावाचा स्वैर अनुवाद मराठी भाषेतून उपरोक्त प्रमाणे दिला आहे. प्रत्यक्ष कार्यवाही करीत असताना अथवा कामा बाबत एखादया शब्दाचा अर्थ लावावयाचा झाल्यास इंग्रजी भाषेतील मुळ प्रस्ताव (Scope of work ) पाहून त्यानुसार कार्यवाही करण्यात येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, केंद्र शासनाने समांतर पाणी पुरवठा योजनेस मान्यता दिली असून केंद्र शासनाच्या UIDSSMT योजनेच्या मार्गदर्शक तत्वानुसार औरंगाबाद महानगरपालिकेने केंद्र शासना सोबत Reforms राबविण्या संदर्भाने करारनामा (MoA) केलेला असल्याने UIDSSMT अंतर्गत करावयाच्या सुधारणा महानगरपालिकेस बंधंनकारक असून राज्य शासनाच्या महाराष्ट्र सुजल निर्मल अभियानांतर्गत आणि महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान कार्यक्रमातंर्गत शासनाचे अनुदान मिळविण्याकरीता, औरंगाबाद महानगरपालिकेने सुधारणा (Reform) कार्यक्रम राबविणे संदर्भात कार्यवाही करणेसाठी सर्व विभागांमध्ये समन्वय साधणे, Reforms & MoA Monitoring & Implimentation Assistance करीता सल्लागाराची नेमणुक करण्याकरीता प्राप्त निविदाधारकाशी झालेल्या वाटाघाटी अंती ठरल्याप्रमाणे CRISIL Infrastructure Advisory, a division of CRISIL Risk & Infrastructure Solution Ltd. यांची निविदा रुपये ५,५०,०००/- प्रतिमहिना म्हणजेच रुपये ६६,००,०००/- प्रति वर्ष या दराची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 219 :**

कार्यकारी अभियंता (वॉर्ड इ आणि फ) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, केंद्र शासनाच्या व महाराष्ट्र एनर्जी डेव्हलपमेंट (मेडा) पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने शासनाच्या उर्जा बचत धोरणानुसार प्रायोगिक तत्वावर औरंगाबाद महानगरपालिका हद्दीमध्ये हर्सुल टी पॉईन्ट ते सिडको एन-7 या सर्व्हीस रोडवर LED पथदिव्यांचा प्रकल्प राबविण्यासाठी रक्कम रू.22,34,500/- चे अनुदान प्राप्त झालेले असून हे काम महाराष्ट्र एनर्जी डेव्हलपमेंट, पुणे यांच्या देखरेखीखाली मनपा पुर्ण करणार आहे. या कामासाठी प्रथम निविदा मागविण्यात आल्या असता निविदेतील अटी व शर्तीनुसार ठेकेदारांनी कागदपत्र व एलईडी फिटींगचा नमुना (Sample) सादर न केल्यामुळे सदर कामाची फेरनिविदा सुचना जा.क्र.मनपा/ई-निविदा/106/11 दिनांक 14/3/2011 अन्वये प्रसिध्दीस देण्यात आली असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण तीन निविदांची विक्री झाली व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण तीन ठेकेदारांनी निविदा सादर केल्या. त्यांचा तुलनात्मक तपशील पुढील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| 1. | मे.असन्सो लाईट्स | - 4.77% अं.प.दरापेक्षा कमी दराने |
| 2. | मे.नॅचरल इन्फोकॉम अँड इंजिनिअरींग प्रा.लि. | - 2% अं.प.दरापेक्षा कमी दराने |
| 3. | प्रग्या इलेक्ट्रीकल्स | - निविदेतील अटी व शर्तीनुसार कागदपत्रांची पुर्तता न केल्यामुळे निविदा उघडण्यात आलेली आहे. |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा 4.77% कमी दराने मे.असन्सो लाईटस् यांची निविदा आहे.

तरी अंदाजपत्रकीय दरापेक्षा 4.77% कमी दराची निविदा विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे केंद्र शासनाच्या व महाराष्ट्र एनर्जी डेव्हलपमेंट (मेडा) पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने शासनाच्या उर्जा बचत धोरणानुसार प्रायोगिक तत्वावर औरंगाबाद महानगरपालिका हद्दीमध्ये हर्सुल टी पॉईन्ट ते सिडको एन-7 या सर्व्हीस रोडवर LED पथदिव्यांचा प्रकल्प राबविण्यासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा 4.77% कमी दराची मे.असन्सो लाईटस् यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

याच बरोबर मा.सभापती यांनी राष्ट्रगीताने सभा संपल्याचे घोषित केले.

**नगर सचिव**

महानगरपालिका औरंगाबाद